# बाल न्याय
# (मुलांची काळजी व संरक्षण)
# अधिनियम, २०१५



## – मनोगत –

रिसोर्स सेल फॉर जुवेनाईल जस्टीस (RCJJ) हा टाटा सामाजिक विज्ञान संस्थान – मुंबई यांचा प्रकल्प असुन विधी संघर्षग्रस्त बालक आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांकरीता बाल न्याय अधिनियम २०१५ केंद्रस्थानी मानुन महाराष्ट्रात मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, अमरावती व यवतमाळ येथे बाल न्याय व्यवस्थे समवेत कार्यरत आहे.

बालकांसंदर्भात विविध प्रश्न व समस्या समाजात आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी विविध बालकांसंदर्भात कायदे व नियम शासनाने तयार केलेले आहेत. परंतु सदर कायद्यांची अंमलबजावणी तेवढ्याच संवेदनशिलतेने होणे गरजेचे आहे. बाल न्याय अधिनियम २०१५ या कायद्याची माहिती सोप्या स्वरुपात कायद्याशी संबंधीत अधिकारी, कर्मचारी, शासकीय व खाजगी संस्था, बालकांसंदर्भात काम करणारे कार्यकर्ते यांच्यापर्यंत पोहचावी या उद्देशाने सदर कायदा मराठीमध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

या माहिती पुस्तिकेसाठी किरकोळ फौजदारी कायदे (सुधारित सहावी आवृत्ती २०१७), चौधरी लॉ पब्लिशर्स या पुस्तकातील पान क्रमांक ५२१ ते ५८४ चा संदर्भ घेण्यात आलेला आहे. या पुस्तिकेचा उपयोग आपणा सर्वांना नक्कीच होईल अशी आशा आम्ही बाळगतो.

या पुस्तिकेत समाविष्ट कायद्याबाबत माहितीचा व मजकूराचा आधार हा कायदेशीर प्रकरणांसाठी अपेक्षित नाही. त्यासाठी मुळ शासकीय अधिनियम व पुस्तकाचा संदर्भ घ्यावा ही अपेक्षा.

दि. २१/०२/२०१८

द्वारा
रिसोर्स सेल फॉर जुवेनाईल जस्टीस (RCJJ)
टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, मुंबई

# बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५

**(सन २०१६ चा महा. अधिनियम क्र.२) : दि. ३१ डिसेंबर २०१६**

अभिकथित आणि कायद्याशी संघर्ष करताना आढळलेली बालके आणि काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेली मुले यांच्यासाठी मूलभूत गरजा पुरवून योग्य ती काळजी, संरक्षण, विकास व उपचार आणि समाजात पुन्हा एकात्मीकरण करणे, याची तरतूद करुन त्यांच्या विकासविषयक गरजा पुरवून आणि त्यांच्या संबंधातील प्रकरणांचा निवाडा करताना व ती निकालात काढताना मुलांचे सवोत्तम हितसंबंध जपले जाण्यासाठी त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवून त्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी आणि तत्संबंधातील आणि तदनुषंगिक बाबींसाठी संबंधित पुरविलेल्या प्रक्रियेद्वारे आणि प्रस्थापित संस्था व मंडळे यांच्याद्वारे त्यांच्या संबंधातील कायद्याचे एकत्रीकरण करणे व त्यात सुधारणा करणे याकरिता अधिनियम,

**ज्याअर्थी,** संविधानात, अनुच्छेद १५ चा खंड (३), अनुच्छेद ३९ चे खंड (ड़) आणि (च), अनुच्छेद ४५ आणि ४७ यांसह, विविध तरतुदींमध्ये, राज्यांकडे अधिकार आणि कर्तव्ये म्हणून राज्यांवर, मुलांच्या सर्व गरजा भागविण्यात आल्या आहेत आणि त्यांचे मूलभूत मानवी हक्क पूर्णत: सुरक्षित आहेत याची सुनिश्चिती करण्याची प्राथमिक जबाबदारी लादली आहे.

**आणि ज्याअर्थी** भारत सरकारने संयुक्त राष्ट्राच्या महासभेत, ११ डिसेंबर, १९९२ रोजी मुलांच्या हक्कासंबंधी मंजुरी दिलेली, अभिसंधी अंगिकार करुन मुलांचे सवोत्तम हित साधण्यात सर्व भागीदार राज्यांनी अनुसरावयाची ठराविक मानके विहित केली आहेत;

आणिा ज्याअर्थी मुलांच्या हक्कासंबंधीच्या अभिसंबंधीमध्ये विहित केलेली मानके, बाल न्याय प्रशासन, १९८५ साठीचे संयुक्त राष्ट्रांचे मानक किमान नियम (बीजिंग नियम), बालकांना त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यापासून संरक्षण देण्याकरिता संयुक्त राष्ट्रांचे नियम (१९९०) मुलांचे संरक्षण आणि सहकार याबाबत हेग अभिसंधीमध्ये झालेले आंतरदेशीय दत्तक विधान (१९९३) आणि इतर सर्व संबंधित आंतरराष्ट्रीय विलेख लक्षात घेऊन, बालकांच्या संबंधात विद्यमान कायदा हा अभिकथित आणि कायद्याशी संघर्ष करतांना आढळलेली बालके आणि काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेली मुले यांच्यासाठी अगदी योग्य असा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० हा पुनर्अधिनियमित करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :–

## प्रकरण एक
## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती –** (१) या अधिनियमास ''बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५'' असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरुन संपूर्ण भारतभर आहे;

(३) केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल;

(४) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही असले तरी, या अधिनियमाच्या पुढील तरतुदी,–

(एक) आशंका, स्थानबद्धता, शिक्षा, शास्ती वा कारावास, पुनर्वसन आणि कायद्याची संघर्ष करणाऱ्या मुलांचे समाजात पुनर्एकात्मीकरण करणे,

(दोन) मुलांची काळजी घेणे व संरक्षण करणे यांची गरज असताना त्याचेबाबतीत पुनर्वसन, दत्तकविधान, पुनर्विलीनीकरण आणि पुन:स्थापन यासंबंधी असलेल्या कार्यपद्धती आणि न्यायनिर्णय किंवा आदेश;

यांचेसह अंमलात येईल.

**२. व्याख्या.** – या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, –

(१) ''परित्यक्त मूल'' म्हणजे जे मूल जैविक पालकांनी किंवा दत्तक पालकांनी सोडून दिलेले आहे; की जे समितीने चौकशीअंती 'परित्यक्त मूल' असे जाहीर केलेले आहे;

(२) ''दत्तकविधान'' म्हणजे अशी प्रक्रिया की ज्याद्वारे मूल जे आपल्या जैविक पालकांशी आपले सर्व हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या यांनी बांधले गेलेले असते त्यांचेपासून कायमचे विभक्त (वेगळे) केले जाऊन दत्तक घेणाऱ्या पालकाचे कायदेशीर मूल होते;

(३) ''दत्तकविधान नियमन'' म्हणजे दत्तकविधानाबाबत केंद्र सरकारकडून अधिकार आणि अधिसूचना देऊन तयार केलेले (बेतलेले) नियमन;

(४) ''प्रशासक'' म्हणजे ज्यावर न्यायदंडाधिकार सोपविलेले आहेत असा राज्याच्या उपसचिवापेक्षा कमी दर्जा नसलेला जिल्हा पातळीवरील प्राधिकारी;

(५) ''उत्तर रक्षा (नंतरची काळजी घेणे)'' म्हणजे ज्यांनी वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली आहेत; परंतु अद्याप एकवीस वर्षे पूर्ण झालेली नाहीत आणि ज्यांची समाजातील मुख्य प्रवाहात जोडणीसाठी (मिळण्यासाठी) संस्थांची काळजी घेणे सोडलेले आहे; अशा व्यक्तींना वित्तीय किंवा अन्य मार्गांनी आधार देणे;

(६) ''अधिकृत विदेशी दत्तकविधान अभिग्रहण'' म्हणजे त्या देशाच्या केंद्रीय प्राधिकरणाने किंवा त्या देशाच्या सरकारी विभागाने केंद्रीय दत्तकविधान संसाधन प्राधिकरणाकडे शिफारस केलेल्या अनिवासी भारतीय किंवा समुद्रापार असलेल्या भारतीय नागरिकास किंवा मूळ भारतीय वंशाच्या व्यक्तीसाठी किंवा विदेशी भावी दत्तकविधान करु इच्छिणाऱ्या पालकांसाठी दत्तकविधानाचे अधिकृत काम करणारी विदेशी सामाजिक अभिकरण (एजन्सी) किंवा बालकल्याण अभिकरण होय;

(७) ''प्राधिकरण'' म्हणजे कलम ६८ अन्वये घटित केलेले केंद्रीय दत्तकविधान संसाधन प्राधिकरण;

(८) ''भीक मागणे'' याचा अर्थ, –

(एक) एखाद्या सार्वजनिक ठिकाणी भीक मागणे किंवा ती घेणे अथवा भीक मागण्यासाठी व ती घेण्यासाठी कोणत्याही बहाण्याने असो, कोणत्याही खाजगी जागेमध्ये प्रवेश करणे,

(दोन) भीक मिळविण्याच्या किंवा उकळण्याच्या उद्देशाने कोणतेही क्षत, जखम, इजा, व्यंग्य, किंवा रोग – मग तो स्वत:चा असो वा अन्य कोणत्याही व्यक्तीचा किंवा एखाद्या प्राण्याचा असो – उघड्यावर टाकणे किंवा त्याचे प्रदर्शन करणे, असा आहे;

(९) ''मुलाचे सर्वोत्तम हित'' म्हणजे मुलाचे बाबतीत कोणताही निर्णय घेण्याचा पायाभूत आधार की ज्यामुळे त्याचे मूलभूत हक्क व गरजा पुरविणे, ओळख, सामाजिकदृष्ट्या भले होणे आणि शारीरिक, भावनिक आणि बौद्धिक विकासाची पूर्तता होण्यासाठी सुनिश्चितीकरण करणे होय.

(१०) ''मंडळ'' याचा अर्थ कलम ४ अन्वये घटित झालेले ''बाल न्याय मंडळ'' असा आहे;

(११) ''केंद्रीय प्राधिकरण'' म्हणजे हेग अभिसंधी (कन्वेशन) मध्ये, आंतरदेशीय दत्तकविधान (१९९३) अन्वये बालकांचे संरक्षण आणि सहकार्य याबाबत शासनाच्या विभागाकडून मान्यताप्राप्त असे प्राधिकरण होय;

(१२) ''मूल'' म्हणजे ज्याने वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली नाहीत अशी व्यक्ती;

(१३) ''कायद्याशी संघर्ष करणारे मूल'' म्हणजे ज्याच्यावर एखादा अपराध केला असल्याचा आरोप आहे आणि असा अपराध केल्याच्या तारखेस ज्याने वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली नाहीत असे मूल (अपचारी बालक) होय;

(१४) ''काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेले मूल'' याचा अर्थ, –

(एक) ज्यास कोणतेही घर किंवा राहण्याचे ठराविक ठिकाण किंवा वसतिस्थान नसल्याचे आणि चरितार्थाचे वरकरणी कोणतेही साधन नसल्याचे आढळून आले आहे; किंवा

(दोन) जे त्यावेळी अंमलात असलेल्या कामगार कायद्याच्या विरोधात काम करतांना आढळून आले आहे किंवा भीक मागतांना किंवा रस्त्यावर राहतांना आढळून आले आहे; किंवा

(तीन) जे एखाद्या व्यक्तीबरोबर (मग ती त्या मुलाची पालक असो वा नसो) राहत असेल आणि अशा व्यक्ती, –

(अ) मुलास मुलांच्या संरक्षणासाठी त्यावेळी लागू असलेल्या नियमाचा भंग करुन वागविले असेल किंवा जखमी केले, शोषण केले, पीडित केले, दुर्लक्षित केले, गैरफायदा घेतला किंवा क्षुब्ध केले असेल, किंवा

(ब) मुलास ठार मारण्याची किंवा इजा पोहोचविण्याची धमकी दिली असेल आणि त्या व्यक्तीकडून त्या धमकीचे पालन केले जाण्याची वाजवी शक्यता असेल किंवा

(क) इतर कोणत्याही मुलास किंवा मुलांना ठार मारेल असेल, गैरफायदा घेतला असेल किंवा दुर्लक्षित केले असेल आणि त्या व्यक्तीकडून संदर्भिय मुलाच्या बाबतीत ठार मारण्याची, क्षुब्ध केले जाण्याची, गैरफायदा घेतला जाण्याची किंवा दुर्लक्षित केले जाण्याची वाजवी शक्यता असेल, किंवा

(चार) जे मानसिकदृष्ट्या आजारी आहे किंवा ज्यांचे जगणे मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या आव्हान आहे किंवा जे जीवघेण्या किंवा असाध्य रोगाने ग्रासले आहे, ज्याला कोणाचा आधार नाही किंवा कोणी काळजी घेणारे नाही किंवा मातापिता किंवा पालक काळजी घेण्यास असमर्थ आहेत, असे मूल जर मंडळाला आढळले किंवा समितीला आढळले तर; किंवा

(पाच) ज्यास मातापिता किंवा पालक आहे आणि असा मातापिता किंवा पालक हा समितीला किंवा मंडळाला मुलाची काळजी घेण्यास व सुरक्षित संरक्षण देण्यास आणि मुलाचे भले करण्यास अयोग्य किंवा असमर्थ असल्याचे आढळले आहे; किंवा

(सहा) ज्यास मातापिता नाहीत आणि ज्याची काळजी घेण्यास कोणीही इच्छुक नाही किंवा ज्याच्या मातापित्यांनी त्याचा परित्याग केला आहे किंवा सोडून दिले आहे; किंवा

(सात) जे हरविलेले किंवा पळून आलेले आहे किंवा ज्याची विहित पद्धतीने वाजवी चौकशी करुनही त्याच्या मातेचा वा पित्याचा शोध लागू शकला नाही; किंवा

(आठ) ज्याचे लैंगिक दुरुपयोगाच्या प्रयोजनासाठी किंवा अवैध कृत्यांसाठी, अर्वाच्य शिवीगाळ, छळ किंवा शोषण केले जात आहे किंवा केले जाण्याची शक्यता आहे; किंवा

(नऊ) जे दुबळे असल्याचे आढळून आले आहे आणि ज्यास अंमली पदार्थाच्या दुरुपयोगासाठी किंवा अपव्यापारात गुंतवले जाण्याची शक्यता आहे; किंवा

(दहा) ज्याचा गैरवाजवी लाभासाठी दुरुपयोग केला जात आहे किंवा केला जाण्याची शक्यता आहे; किंवा

(अकरा) जे कोणत्याही सशस्त्र संघर्षास, नागरी विक्षोभास वा नैसर्गिक आपत्तीस बळी पडले आहे; किंवा

(बारा) ज्यावर लग्नाचे वय होण्यापूर्वीच लग्नाची भयावह (न पेलणारी) जोखीम येऊन पडलेली आहे आणि असा लग्नसोहळा पार पाडण्यास ज्याचे मातापिता कुटूंबातील सदस्य, पालक आणि इतर कोणतीही व्यक्ती जबाबदार आहे.

(१५) ''मुलांशी मैत्रीपूर्ण संबंध'' याचा अर्थ कोणतीही वर्तणूक, वागणे, सराव, प्रक्रिया, दृष्टिकोन, पर्यावरण किंवा उपचार की जी मानवी, सहृदय विचारात घेण्यास योग्य आणि मुलाचे सर्वोत्तम हिताची असेल.

(१६) ''मूल दत्तकविधानास कायद्याने स्वतंत्र असणे'' म्हणजे कलम ३८ अन्वये समितीने चौकशी करुन अशा रीतीने

जाहीर केलेले मूल;

(१७) ''बाल कल्याण अधिकारी'' म्हणजे असा अधिकारी की जो बालगृहाशी समितीने दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यासाठी संलग्न आहे किंवा मंडळाने अशी जबाबदारी पार पाडण्यासाठी अधिसूचित केलेला अधिकारी;

(१८) ''बाल कल्याण पोलीस अधिकारी'' म्हणजे कलम १०७ च्या पोट–कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला अधिकारी;

(१९) ''बाल गृह'' म्हणजे कलम ५० मध्ये उद्धृत केलेल्या हेतूने नोंदविलेले आणि राज्य शासनाने स्वत: होऊन किंवा स्वयंसेवी किंवा अशासकीय संस्थेद्वारे प्रत्येक जिल्ह्यात किंवा जिल्ह्यांच्या गटामध्ये स्थापित केलेले किंवा चालविलेले बालगृह;

(२०) ''बाल न्यायालय'' म्हणजे आयोगाच्या बाल हक्क संरक्षण अधिनियम, २००५ (२००६ चा ४) अन्वये स्थापित केलेले न्यायालय किंवा लैंगिक अपराधांपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी अधिनियम, २०१२ (२०१२ चा ३२) अन्वये स्थापित केलेले विशेष न्यायालय, जेथे अस्तित्वात आहेत तेथे आणि जेथे कोठे अशी न्यायालये पदनिर्देशित केलेली नसतील तेथे उपरोक्त अधिनियमान्वये सत्र न्यायालयांच्या अधिकारितेमधील परिक्षेत्रामध्ये संबंधित अपराधांचा निवाडा करण्यात येतो असे न्यायालय;

(२१) ''मुलांची काळजीवाहू संस्था'' म्हणजे बालगृह, निवारागृह, निरीक्षणगृह, विशेष गृह, सुरक्षित जागा, विशेष दत्तकविधान अभिकरण आणि अधिनियमान्वये मान्यताप्राप्त यथायोग्य सोयीसुविधा असलेली मुलांची काळजी आणि संरक्षणाची गरज पुरविणारी संस्था;

(२२) ''समिती'' म्हणजे कलम २७ अन्वये घटित केलेली बाल कल्याण समिती;

(२३) ''न्यायालय'' म्हणजे दिवाणी न्यायालय – ज्याला दत्तकविधानाबाबतच्या आणि पालकत्वासंबंधीच्या बाबतीत अधिकारिता दिलेल्या असून त्यामध्ये जिल्हा न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, शहर पातळीवरची दिवाणी न्यायालये यांचा अंतर्भाव होतो;

(२४) ''शारीरिक दंड'' म्हणजे कोणत्याही एखाद्या व्यक्तीने बालकाला सदृष्य मूर्त देहास त्याच्या अपराधानुसार मुद्दाम होऊन किंवा शिस्त बाणावी या हेतूने किंवा मन बदलावे यासाठी वेदना स्वरुपात दंड देणे;

(२५) ''बालकल्याण सेवा'' म्हणजे अडचणीतील/संकटग्रस्त बालकांसाठी त्यांचेपर्यंत पोहोचणारी २४ तास आणीबाणी सेवा – की जी आकस्मिक किंवा जी दूरस्थ काळजी आणि पुनर्वसनाच्या सेवा पुरविते;

(२६) ''जिल्हा बाल संरक्षण युनिट'' म्हणजे कलम १०६ अन्वये राज्य सरकारने जिल्ह्यासाठी एक बालसंरक्षण युनिट; की जे जिल्ह्यामध्ये या अधिनियमाची निग्रहाने अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आणि जिल्ह्यातील बालसंरक्षणाचे बाबतीत व इतर उपाय करण्यासाठी स्थापित केले आहे;

(२७) ''योग्य सुविधा'' म्हणजे कलम ५१ च्या पोट–कलम (१) अन्वये कथित हेतूसाठी उचित अशी यथास्थिती समिती किंवा मंडळाने मान्यता दिलेली शासनाच्या संघटनाने/आस्थापनेने चालविलेली किंवा मान्यताप्राप्त स्वयंसेवी किंवा अशासकीय आस्थापनेने चालविलेली, विशिष्ट हेतूने त्या विशिष्ट मुलाची तात्पुरती जबाबदारी स्वीकारण्यास तयार केलेली सुविधा;

(२८) ''योग्य व्यक्ती'' म्हणजे एका विशिष्ट हेतूने मुलाची जबाबदारी घेण्यास तयार आहे आणि मुलास ताब्यात घेण्यासाठी आणि त्याची काळजी घेण्यासाठी जी या हेतूने चौकशीअंती योग्य असल्याचे अशा सक्षम प्राधिकरणास, यथास्थिती समिती किंवा मंडळास आढळून आले आहे अशी कोणतीही व्यक्ती;

(२९) ''पोषणकर्ता'' म्हणजे समितीने मुलाची पर्यायी काळजी घेण्याच्या हेतूने निवडलेल्या, योग्यता/अर्हताप्राप्त, मान्यताप्राप्त

आणि पर्यवेक्षित अशा कुटूंबाच्या घरगुती वातावरणामध्ये नेमणूक करणे की जे कुटूंब त्याच्या जैविक कुटूंबापेक्षा वेगळे आहे.

(३०) ''पोषणकर्ते कुटूंब'' म्हणजे कलम ४४ अन्वये संगोपनासंबंधी काळजी घेण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण गट यांस योग्य असल्याचे आढळले आहे असे कुटूंब;

(३१) ''पालक'' म्हणजे मुलाशी संबंधित त्याचे नैसर्गिक पालक किंवा समितीच्या वा मंडळाच्या मते यथास्थिती इतर कोणीही व्यक्ती की जी या प्रक्रियाकाळात त्या मुलाचा प्रत्यक्ष ताबा घेते – की जे समिती वा मंडळाला मान्य आहे;

(३२) ''पोषणकर्ता गट'' म्हणजे कुटूंबवत आणि संप्रदाय अधिष्ठित (समस्या) उकल करण्यासाठी काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या परंतु मातापित्यांच्या काळजीविना असलेल्या मुलांना वैयक्तिक काळजी आणि संगोपन करण्याच्या संवेदनेने आणि ओळख देण्याचा हेतू पुरविण्यासाठी कुटूंबासारखी काळजी घेण्याची सुविधा देणे;

(३३) ''भयंकर अपराध'' यामध्ये भारतीय दंड विधान संहिता किंवा इतर कोणत्याही त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार कारावासाची किमान शिक्षा सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची कैद अशी आहे;

(३४) ''आंतरदेशीय दत्तकविधान'' म्हणजे भारतातील मुलाचे अनिवासी भारतीय किंवा मूळचा भारतीय किंवा विदेशी व्यक्तीकडून झालेले दत्तकविधान;

(३५) ''बालक'' म्हणजे अठरा वर्षे वयाच्या आतील मूल;

(३६) ''अंमली औषधीद्रव्य'' आणि ''मन:प्रभावी पदार्थ'' या शब्दांना अमली औषधीद्रव्य व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१) यामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले आहेत, ते अर्थ असतील;

(३७) 'नाहरकत प्रमाणपत्र' म्हणजे केंद्रीय संसाधन प्राधिकरणाकडून कथित हेतूसाठी आंतरदेशीय दत्तकविधानासाठी देण्यात आलेले प्रमाणपत्र;

(३८) ''अनिवासी भारतीय'' म्हणजे जो भारतीय पारपत्रधारक आहे आणि सध्या एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी देशाबाहेर राहत आहे;

(३९) ''अधिसूचना'' म्हणजे भारत सरकारच्या किंवा यथास्थिती राज्य शासनाच्या राजपत्रामध्ये अधिसूचना म्हणून प्रकाशित केलेले आणि येणेप्रमाणे यथोचित 'जाहीर व्हावे' म्हणून कळविलेले परिपत्रक/अधिसूचना होय.

(४०) ''निरीक्षण गृह'' म्हणजे कलम ४७ च्या पोट–कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या हेतूसाठी प्रत्येक जिल्ह्यात किंवा जिल्ह्यांच्या गटामध्ये स्वत: राज्य शासनाकडून किंवा स्वयंसेवी किंवा अशासकीय संस्थेकडून स्थापित केलेले आणि चालविलेले तसेच अधिकृत नोंदणी केलेले निरीक्षण गृह होय.

(४१) ''खुला निवारा'' म्हणजे कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये त्यामध्ये उल्लेख केलेल्या हेतूंसाठी अधिकृत नोंदणी केलेले राज्य शासनाने स्वत: किंवा स्वयंसेवी किंवा अशासकीय संस्थेकडून स्थापन केलेले व चालविलेले मुलांच्या सुविधेचे स्थान;

(४२) ''अनाथ'' म्हणजे असे मूल की, –

(एक) जे जैविक मातापिता किंवा दत्तकविधानकृत किंवा कायदेशीर पालकाविना आहे; किंवा

(दोन) ज्याचा कायदेशीर पालक त्याला घेण्यास इच्छुक नाही किंवा त्या बालकाची काळजी घेण्यास सक्षम नाही;

(४३) ''समुद्रापलीकडील भारतीय नागरिक'' म्हणजे जी व्यक्ती, नागरिकत्व अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५७) अन्वये नोंदणीकृत आहे;

(४४) ''मूळ भारतीय व्यक्ती'' म्हणजे ज्याचे वंशपरंपरागत पूर्वज भारतात होते किंवा जो भारत देशाचा होता आणि जो

सध्या केंद्र सरकारचे मूळ भारतीय म्हणून दिलेले पत्र धारण करतो;

(४५) ''क्षुल्लक अपराध'' यामध्ये भारतीय दंडविधान संहिता, १८६० (१८६० चा ४५) किंवा इतर कोणत्याही त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार कारावासाची कमाल शिक्षा तीन वर्षापर्यंतची कैद अशी आहे याचा अंतर्भाव होतो.

(४६) ''सुरक्षिततेचे ठिकाण'' म्हणजे असे कोणतेही ठिकाण किंवा संस्था, पोलीस ठाणे किंवा तुरुंग नसलेली, की जी वेगळी स्थापित केलेली आहे किंवा निरीक्षणगृहाशी जोडलेली आहे किंवा यथास्थिती विशेष गृह आहे, की जिची प्रभारी व्यक्ती ही एखाद्या आरोपित वा कायद्याशी संघर्ष करणाऱ्या बालकाचा स्वेच्छापूर्वक तात्पुरता स्वीकार करण्यास आणि त्याची काळजी घेण्यास तयार आहे आणि ते मूल सक्षम प्राधिकरण, यथास्थिती मंडळ किंवा बालन्यायालय यांचेकडून चौकशीमध्ये आणि पुढील पुनर्वसनाच्या दृष्टीने त्या कालावधीसाठी अपराधी आढळलेले आहे आणि ज्याचा हेतू आदेशामध्ये नमूद केलेला आहे.

(४७) ''विहित'' म्हणजे या अधिनियमाच्या नियमानुसार नेमून दिलेले;

(४८) ''पर्यवेक्षण अधिकारी'' अपराधी पर्यवेक्षण अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) अन्वये राज्य शासनाने पर्यवेक्षण अधिकारी म्हणून नेमणूक केलेला अधिकारी किंवा राज्य शासनाचा जिल्हा बाल संरक्षण युनिटने नेमणूक केलेला कायदा व पर्यवेक्षण अधिकारी होय.

(४९) ''भावी दत्तकग्रहण पालक'' म्हणजे कलम ५७ मधील तरतुदीनुसार जी व्यक्ती किंवा ज्या अनेक व्यक्ती ते मूल दत्तक घेण्यास पात्र आहेत;

(५०) ''सार्वजनिक ठिकाण'' या शब्दाला, अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०४) यामध्ये जो अर्थ नेमून दिला असेल, तोच अर्थ असेल;

(५१) ''नोंदणीकृत'' म्हणजे कलम ४१ अन्वये अधिकृत व नोंदणीकृत तात्पुरत्या किंवा दूरच्या काळापर्यंत मुलांना राहण्याची काळजी घेण्याची सेवा पुरविण्याच्या तत्त्वावर असलेली निरीक्षण गृहे, विशेष गृहे, सुरक्षिततेचे ठिकाण, बालगृहे, खुली निवास स्थाने, विशेषकृत दत्तकविधान अभिकरण (एजन्सी) किंवा योग्य सुविधा किंवा इतर कोणतीही संस्था की जी विशिष्ट गरजेपोटी तयार केली गेलेली आहे वा मुलांची काळजी घेणारी अशी अभिकरणे वा सुविधा की ज्या राज्य शासनाने वा स्वयंसेवी वा अशासकीय संस्थांनी चालविली आहेत;

(५२) ''नातेवाईक'' म्हणजे मुलासंबंधी दत्तकविधानाच्या हेतूसाठी म्हणजे पैतृक काका, काकू किंवा मातृक मामा, मामी किंवा वडिलांकडून आजी, आजोबा किंवा आईकडून आजी, आजोबा होत;

(५३) ''राज्य अभिकरण'' म्हणजे कलम ६७ नुसार दत्तकविधान आणि संबंधित बाबींसाठी काम करणारी राज्य शासनाने उभी केलेले राज्य दत्तकविधान संसाधन अभिकरण (एजन्सी);

(५४) ''गंभीर अपराध'' यामध्ये भारतीय दंडविधान संहिता, १८६० (१८६० चा ४५) किंवा इतर कोणत्याही त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार कारावासाची शिक्षा ही तीन ते सात वर्षे अशी आहे याचा अंतर्भाव होतो;

(५५) ''बालकासाठी विशेष पोलीस पथक'' म्हणजे कलम १०७ अन्वये मुलांना हाताळण्यासाठी पदनिर्देशित केलेले जिल्ह्याचे वा शहराचे किंवा यथास्थिती इतर कोणतेही पोलीस पथक जसे रेल्वे पोलीस;

(५६) ''विशेष गृह'' कलम ४८ अन्वये राज्य शासनाकडून किंवा स्वयंसेवी किंवा अशासकीय संस्थेकडून स्थापित व नोंदणीकृत संस्था, की जी कायद्याशी संघर्ष करणाऱ्या मुलांना राहत्या घराची आणि पुनर्वसनाची सेवा पुरविते की जी मंडळाच्या आदेशाने चौकशीद्वारे अपराध केल्यानंतर अशा संस्थांकडे पाठविली जातात;

(५७) ''विशेष दत्तकविधान अभिकरण (एजन्सी)'' म्हणजे अशी एक संस्था की जी राज्य शासनाने किंवा अशासकीय संस्थेने स्थापन केलेली आहे आणि तिला कलम ६५ अन्वये दत्तकविधानाच्या हेतूने समितीच्या आदेशाने अनाथ,

परित्यक्त आणि सोडून दिलेल्या मुलांना अधिकृत राहण्यासाठी ठरवून दिलेली आहे;

(५८) ''पुरस्कृत करणे/प्रायोजित करणे'' म्हणजे मुलाच्या वैद्यकीय, शैक्षणिक आणि वैकासिक गरजा भागविण्यासाठी त्याच्या कुटूंबाला पूरक असा आधार देणे वा आर्थिक वा अन्य प्रकारे तरतूद करणे;

(५९) ''संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात'' राज्य शासन म्हणजे घटनेच्या कलम २३९ अन्वये राष्ट्रपतींनी नेमलेला संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक होय;

(६०) ''सोडून दिलेले मूल'' म्हणजे मातापित्यांनी वा पालकांनी आपल्या नियंत्रणाबाहेरील शारीरिक, भावनिक आणि सामाजिक घटक – कारणांसाठी समितीकडे सोपूवन सोडून दिलेले आणि तसे समितीने जाहीर केलेले मूल;

(६१) या अधिनियमात वापरलेले परंतू व्याख्या न केलेले सर्व शब्द आणि शब्दप्रयोग यांना अनुक्रमे त्या त्या संहितेमध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असतील.

***

## प्रकरण दोन

## मुलांची काळजी घेण्याची आणि संरक्षणाची सर्वसाधारण तत्त्वे

**३. अधिनियमाची अंमलबजावणी करतान पाळावयाची सर्वसाधारण तत्त्वे –** केंद्र सरकार, राज्य सरकार, मंडळ आणि इतर अभिकरणे यांनी सदरील अधिनियम अमलात आणताना पुढील मुलभूत तत्त्वांचे मार्गदर्शन घेण्यात यावे, अर्थात –

(एक) निरपराधित्व गृहीत धरण्याचा सिध्दान्त :– कोणतेही मूल वयाच्या अठरा वर्षापर्यंत कोणत्याही दुष्ट भावापासून किंवा अपराधी हेतूपासून दूर असे निरपराधी असते असे गृहीत धरले जावे.

(दोन) प्रतिष्ठा आणि योग्यतेचा सिध्दान्त :– सर्व मनुष्यप्राणी समान प्रतिष्ठा देऊन आणि समान हक्काने वागविले जावेत.

(तीन) सहभागाचा सिध्दान्त :– प्रत्येक मुलाचे म्हणणे ऐकून घेतले जावे; हा त्याचा हक्क आहे, आणि त्याला त्याच्या हितावर परिणाम करणाऱ्या निर्णयामध्ये आणि सर्व प्रक्रियांमध्ये सहभागी करवून घेण्यात यावे आणि मुलाचे त्याच्या वयानुरुप आणि परिपक्वतेनुसार त्याचे म्हणणे विचारात घेतले जावे;

(चार) सर्वोत्तम हिताचा सिध्दान्त :– मुलाचे बाबतीत सर्व निर्णय घेतांना पायाभूत विचारसरणी अशी असावी की, ज्यामुळे आधी त्याच्या सर्वोत्तम हिताचा विचार होईल आणि ते मूल पूर्ण क्षमतेने विकसित होईल;

(पाच) कुटूंबाच्या जबाबदारीचा सिध्दान्त :– जैविक कुटूंबातील मातापिता असोत किंवा दत्तकविधानानुसार किंवा यथास्थिती संगोपनामुळे झालेले पालक असोत; मुलाची काळजी घेणे, संगोपन करणे आणि त्यास संरक्षण देणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी असेल;

(सहा) सुरक्षिततेचा सिध्दान्त :– काळजी व संरक्षण प्रणालीकडे असताना आणि त्यानंतरच्या काळात मूल हे सुरक्षित राहीलआणि त्याला कोणतीही हानी, दुर्वर्तन किंवा वाईट रीतीने वागवले जाऊ नये यासाठी सर्वतोपरी उपाय योजण्याचे सुनिश्चित केले जावे;

(सात) सकारात्मक उपाय योजण्याचा सिध्दान्त :– या अधिनियमानुसार कुटूंब आणि संप्रदाय यांसह सर्व संसाधने मुलाचे स्वास्थ्यवाढीसाठी हातभार लावणारी, त्याची ओळख विकसित करण्यास सुकर ठरणारी आणि समावेशक व समर्थदायी असे मात्र भेद्यता कमी करण्यासाठी पोषक असे वातावरण तयार करणारी असावी आणि त्यासाठी मध्यस्थीची गरज आहे;

(आठ) लांच्छनास्पद शब्दार्थ मीमांसेचा सिध्दान्त :– मुलाचा कोणताही प्रक्रियांबाबत प्रतिकूल वा आरोपात्मक शब्दांचा वापर करण्यात येऊ नये;

(नऊ) हक्काचे विसर्जन न करण्याचा सिध्दान्त :– मुलाचा कोणताही हक्क हा स्वेच्छेने सोडून देणे या गोष्टीस परवानगी नसणे किंवा तसे करणे बंधनकारक नसणे, जरी त्याचा शोध मुलाने वा त्याच्या वतीने दुसऱ्या व्यक्तीने घेतला किंवा मंडळ किंवा समितीने घेतला तरी; आणि मूलभूत हक्कांचा व्यवहारात वापर होत नसला तरी हक्काचे विसर्जन होऊ नये;

(दहा) समानता असणे आणि भेदभाव नसण्याचा सिध्दान्त :– लिंग, जात, वंश, जन्मस्थळ, असमर्थता वा तत्सम गोष्टींवरुन मुलाच्या विरोधात कोणताही भेदभाव केला जाऊ नये आणि प्रत्येक मुलास (ज्ञानाच्या वा व्यक्तीच्या) जवळ जाण्याची मोकळीक, संधी आणि त्या अनुषंगाने वागणूक दिली जावी.

(अकरा) एकान्तता आणि गोपनीयतेचा हक्क असण्याचा सिध्दान्त :– प्रत्येक मुलास त्याची एकान्तता आणि गोपनीयता संरक्षित ठेवण्याचा सर्वतोपरी आणि न्यायालयीन प्रक्रियेमध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत (साद्यंत) हक्क असणे;

(बारा) अंतिम आश्रयाचा उपाय म्हणून संस्थेत राहायला पाठवण्याचा सिध्दान्त :– पुरेशी चौकशी केल्यानंतर शेवटचा आश्रयाचा उपाय म्हणून संस्थेत राहायला पाठविण्याचे पाऊल उचलावे लागणे;

(तेरा) मातापित्यांची पुनर्भेट आणि आपल्या (कुटूंबाबरोबर) पूर्वस्थितीत राहायला मिळण्याचा सिध्दान्त :– बाल न्यायालयातील प्रणालीत असलेल्या प्रत्येक मुलाला होईल तितक्या लवकर त्याच्या कुटूंबाशी पुन्हा भेट घडवून त्याला पूर्वीप्रमाणे असलेल्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दर्जानुसार राहण्यास मिळण्याचा हक्क आहे; जर असे करणे अहिताचे नाही असे आढळले तर;

(चौदा) नव्याने सुरुवात करण्याचा सिध्दान्त :– काही विशेष परिस्थितीत अपवाद वगळता या अधिनियमान्वये बाल न्यायप्रणालीतील कोणत्याही बालकाचे पूर्वीचे सर्व अभिलेख खोडले जावेत;

(पंधरा) वळणाचा सिध्दान्त :– संपूर्ण समाजाचा वा बालकाच्या सर्वोत्तम हिताचा विचार करता, न्यायालयीन प्रक्रियेच्या आश्रयाशी आलेल्या, कायद्याशी संघर्ष करणाऱ्या मुलांच्या बाबतीत उपाययोजना करुन त्यांची उन्नती साधण्यावर भर देण्यात यावा;

(सोळा) नैसर्गिक न्यायाचा सिध्दान्त :– या अधिनियमानुसार न्यायालयीन कक्षेत काम करणाऱ्या सर्व व्यक्तींनी (संयुक्त) मंडळांनी बालकाचे, त्याच्या बाजूचे म्हणणे योग्य रीतीने ऐकून घेणे याचा हक्क, पूर्वग्रहदूषितेविरुद्धचा नियम, आणि आढावा घेण्याचा हक्क याबाबतीत नीट विचार करुन यथायोग्य अशा उचित मूलभूत प्रक्रियांच्या प्रमाणकांना धरुन न्यायनिवडा करण्यात यावा;

***

## प्रकरण तीन

## बाल न्याय मंडळ

**४. बाल न्याय मंडळ,–** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन प्रत्येक जिल्ह्यात या अधिनियमान्वये कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांच्या संबंधात अशा मंडळांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांना नेमून दिलेली किंवा त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी एक किंवा अधिक बाल न्याय मंडळे घटित करु शकेल.

(२) मंडळ हे ३ वर्षाचा अनुभव असलेला महानगर दंडाधिकारी किंवा यथास्थिती प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (जेथे मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्यायदंडाधिकारी नसेल तेथे) (यापुढे यांचा उल्लेख प्रमुख दंडाधिकारी म्हणून केला जाईल) आणि दोन सामाजिक कार्यकर्ते, ज्यापैकी किमान एक सदस्य महिला असेल, यांचे मिळून बनलेले असेल आणि त्यांचे एक न्यायपीठ तयार होईल आणि अशा प्रत्येक न्यायपीठाकडे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा

यथास्थिती, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याला प्रदान केलेले अधिकार असतील.

(३) मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यापूर्वी तो कोणताही सामाजिक कार्यकर्ता, मुलांच्या संबंधातील आरोग्य, शिक्षण, किंवा कल्याण कार्यक्रम यामध्ये किमान सात वर्षे प्रत्यक्षपणे सक्रिय सहभागी व्यवसायी व्यक्ती असल्याखेरीज आणि त्याची बालमानसशास्त्र, मानसोपचार, समाजशास्त्र किंवा कायदा यामधील पदवी असल्याखेरीज त्याची मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही;

(४) मंडळाचा सदस्य म्हणून निवड होणारी व्यक्ती, जर –

(एक) तिने मानवी वा बालहक्कांचे उल्लंघन केल्याचे पूर्वाभिलेखात आढळले तर; किंवा

(दोन) त्या व्यक्तीवर नैतिक अध:पतनाकडे झुकणारी कृत्ये केल्याचे आरोप असतील आणि तद्वत त्याची प्रवृत्ती असल्याचे आढळून आले तर किंवा अशा आरोपातून संपूर्णत: निर्दोष म्हणून त्याची सुटका झालेली नसेल तर; किंवा

(तीन) केंद्र सरकार वा राज्य शासन अंगिकृत संस्था किंवा महामंडळाची संस्था किंवा केंद्र सरकार किंवा राज्य शासनाने चालविलेल्या संस्थेमधून काढून टाकण्यात आलेली किंवा सेवेतून निलंबित केलेली असेल तर; किंवा

(चार) यापूर्वी कधीही बालकाशी दुर्व्यवहार करुन गैरवापर / अयोग्य वापर केलेला असेल किंवा बालकामगार म्हणून काम करवून घेतलेले/कामावर ठेवलेले असेल किंवा अन्य प्रकारे मानवी हक्कांचे उल्लंघन किंवा नैतिक अध:पतन झाल्याचे आढळून आले तर,

अशा व्यक्तीस मंडळावर अर्हता प्राप्त होणार नाही.

(५) राज्य शासनाने मंडळाच्या प्रमुख न्यायदंडाधिकाऱ्यासह सर्व सदस्यांना त्यांची नेमणूक केलेल्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत त्यांना बालकांसाठी बालकांची काळजी, संरक्षण, पुनर्वसन, कायदेशीर तरतुदी आणि तद्नुषंगाने विहित केलेल्या बालकांसाठी न्याय व्यवस्थादी सर्व गोष्टींचे पध्दतशीर प्रेरणा प्रशिक्षण व संवेदनशील करणे हे सर्व केल्याचे सुनिश्चित करुन घ्यावे.

(६) मंडळाच्या सभासदांचा कार्यकाळ आणि मंडळाचा कोणीही सभासद कशा पध्दतीने राजीनामा देऊ शकतील, याबाबत नियमावलीत नियम केलेले असतील.

(७) जर, मंडळाचा कोणताही सभासद

(एक) या अधिनियमान्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा गैरवापर करीत असल्याची आढळून आले; किंवा

(दोन) कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवा मंडळाच्या बैठकांना सतत तीन महिन्यापर्यंत गैरहजर राहतील; किंवा

(तीन) एका वर्षभरात तीन चतुर्थांशापेक्षा जास्त बैठकांना गैरहजर राहतील; किंवा

(चार) मंडळाच्या सभासदत्वाच्या कालावधीत, पोट कलम (४) प्रमाणे सभासदत्वासाठी अपात्र ठरतील, तर मुख्य न्यायाधीशांव्यतिरिक्त मंडळाच्या इतर सभासदांची नेमणूक राज्य शासनामार्फत चौकशी करुन रद्द करता येईल.

**५. चौकशीच्या दरम्यान व्याख्येनुसार बालक राहणार नाही अशा व्यक्तीचे स्थान. :–** या अधिनियमान्वये ज्या बालकाबाबत चौकशी करण्यास प्रारंभ करण्यात आला आहे, अशा व्यक्तीने चौकशीच्या काळातच वयाची १८ वर्षे पूर्ण केली तर, या अधिनियमात किंवा त्यावेळी प्रभावात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद केले असले तरी, मंडळामार्फत सुरु असणारी चौकशी पूर्ण केली जाईल आणि सदर व्यक्ती बालक असती तर त्याबाबत जसे आदेश दिले गेले असते तसे आदेश मंडळाकडुन दिले जातील.

**६. १८ वर्षपेक्षा कमी वय असताना एखाद्या व्यक्तीने अपराध केला असल्यास सदर व्यक्तीचे स्थान. :–** १) एखाद्या व्यक्तीने वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर, त्याने १८ वर्षे वय होण्यापूर्वी केलेल्या अपराधासाठी पकडले गेल्यास, सदर व्यक्तीस या कलमातील तरतुदीनुसार चौकशीच्या कारवाईत बालकच समजले जाईल.

(२) पोट–कलम (१) मध्ये नमूद केलेल्या व्यक्तीस जर जामिनावर मुक्त केले गेले नसल्यास, त्या व्यक्तीस चौकशीच्या

दरम्याने सुरक्षागृहातच ठेवले जावे.

(३) पोट–कलम (१) मध्ये नमूद केलेल्या व्यक्तीबाबत या अधिनियमातील तरतुदीनुसारच कारवाई केली जाईल.

**७. मंडळाची कार्यपध्दती :–** (१) मंडळाची कारवाई करतांना आणि बैठकांच्या वेळी बालकांवर दडपण येणार नाही अशा रीतीने खेळीमेळीच्या वातावरणात व नियमित न्यायालयाचे कामकाजाप्रमाणे जाणवणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल.

(२) ज्यावेळी मंडळाची कारवाई सुरु नसेल त्यावेळी कायद्याविरुध्द गेलेल्या बालकाला मंडळाच्या सभासदासमक्ष हजर करता येईल.

(३) कोणत्याही सभासदाच्या गैरहजेरीतही मंडळाचे कामकाज करता येईल आणि केवळ मंडळाचा कोणी सदस्य, कारवाईच्या कोणत्याही पायरीवर हजर नव्हता, या कारणाचे मंडळाचे निर्णय अवैध ठरणार नाहीत.

मात्र, प्रकरणाच्या अंतिम निर्गतीच्या वेळी किंवा कलम १८ च्या पोट–कलम (३) अन्वये आदेश देताना मुख्य न्यायाधीशांसह किमान दोन सदस्य हजर असणे आवश्यक आहे.

(४) कोणत्याही प्रकरणाच्या कारवाईच्या दरम्यान किंवा अंतिम निर्णयाच्या वेळी मंडळाच्या सभासदात मतभेदाच्या प्रसंगात बहुमताचा निर्णय बंधनकारक असेल, मात्र असे बहुमत नसल्यास मंडळाच्या अध्यक्षांचा निर्णय बंधनकारक असेल,

**८. मंडळाची कर्तव्य, अधिकार आणि जबाबदाऱ्या :–** (१) त्यावेळी प्रभावात असलेल्या कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद असले तरीही, तसेच या अधिनियमात स्पष्ट नमूद केलेले नसल्यास, कोणत्याही जिल्ह्यासाठी गठित केलेल्या मंडळास, त्या जिल्ह्यात या अधिनियमानुसार, कायद्याविरुध्द गेलेल्या बालकांच्या संबंधात केल्या जाणाऱ्या कोणत्याही कारवाईचे सर्व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

(२) जेव्हा या अधिनियमाच्या कलम १९ अन्वये किंवा अपीलासाठी, पुनर्विलोकनासाठी किंवा इतर कोणत्याही प्रकरणी समोर येईल त्यावेळी, या अधिनियमानुसार मंडळास प्रदान केलेले सर्व अधिकार, उच्च न्यायालयास आणि बाल न्यायालयासही आहेत.

(३) मंडळाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या खालील प्रमाणे आहेत.

(अ) कारवाईच्या प्रत्येक पायरीवर बालक, मातापिता, आणि पालक यांचा जाणीवपूर्वक सहभाग असल्याची खात्री करणे;

(ब) बालकास ताब्यात घेणे, चौकशी, संगोपन आणि पुनर्वसन यांसारख्या बालकाच्या सर्व कारवायात बालकाचे हक्क अबाधित राहतील याची खात्री करणे;

(क) कायदेविषयक सेवा संस्थांमधून बालकास आवश्यक कायदेविषयक साहाय्य मिळेल याची खात्री करणे;

(ड) कारवाईसाठी वापरण्यात येणारी भाषा बालकास अवगत नसल्यास, मंडळ आवश्यकतेनुसार प्रशिक्षित, अनुभवी, आणि ठरवून दिलेल्या मोबदल्यावर दुभाषा किंवा अनुवादक उपलब्ध करुन देईल.

(इ) परिवीक्षा अधिकाऱ्यास किंवा परिवीक्षा अधिकारी उपलब्ध नसल्यास बाल कल्याण अधिकाऱ्यास किंवा समाजसेवकास, बालकाच्या प्रकरणात सामाजिक चौकशी करुन बालकास मंडळासमक्ष सर्वप्रथम हजर केले गेले, त्या दिवसापासून १५ दिवसाच्या आत कोणत्या परिस्थितीत अपराध घडला याबाबत खात्री करणारा सामाजिक चौकशी अहवाल सादर करण्याबाबत आदेश देणे;

(फ) कायद्याविरुध्द गेलेल्या बालकाबाबत, या अधिनियमाच्या कलम १४ अन्वये ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार चौकशीमध्ये लवादाची भूमिका बजावून प्रकरणाची निर्गती करणे;

(ग) कायद्याविरोधात गेल्याचा संशय असलेल्या बालकास, कोणत्याही पायरीवर देखभाल किंवा संरक्षणाची आवश्यकता असल्यास सदर प्रकरण बाल कल्याण समितीकडे हस्तांतरित करणे व त्यायोगे कायद्याविरुध्द गेलेल्या बालकासही देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता भासू शकते व त्यामुळे त्या प्रकरणात समिती आणि मंडळ दोन्हीचाही

अंतर्भाव असण्याची आवश्यकता स्पष्ट करणे;

(ह) प्रकरणाची निर्गती करुन बालकाच्या पुनर्वसनासाठी व्यक्तिगत संगोपन योजनेचा आणि आवश्यकतेनुसार, परिवीक्षा अधिकारी किंवा जिल्हा बाल संरक्षण केंद्र किंवा अशासकीय सेवाभावी संघटनेच्या सदस्यामार्फत नियमित देखरेखीचा अंतर्भाव असलेला अंतिम आदेश देणे;

(ई) कायद्याविरुध्द गेलेल्या बालकाच्या संगोपन आणि देखभालीसाठी सुयोग्य व्यक्तीबाबत चौकशी करुन सदर व्यक्तीचे नाव जाहीर करणे;

(ज) कायद्याविरुध्द गेलेल्या बालकांसाठी निवासी व्यवस्था असलेल्या संस्थेस महिन्यातून किमान एकदा भेट देणे आणि तेथील व्यवस्था सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या सूचना अंतर्भूत असलेला अहवाल जिल्हा बाल संरक्षण केंद्रास आणि राज्य शासनास सादर करणे.

(के) देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकाच्या संदर्भात किंवा कायद्याच्या विरुध्द गेलेल्या बालकाच्या संदर्भात या अधिनियमान्वये किंवा इतर कोणत्याही अधिनियमान्वये अपराध घडलेला असल्यास त्याबाबत प्रथम खबर नोंद करण्याबाबत पोलिसांना आदेश देणे;

(ल) एखाद्या देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकाच्या संदर्भात या अधिनियमान्वये किंवा इतर कोणत्याही अधिनियमान्वये अपराध घडलेला असल्याबाबत अहवाल बाल कल्याण समितीकडून प्राप्त होताच पोलीसांना त्याबाबत प्रथम खबर नोंदविण्याचा आदेश देणे;

(म) प्रौढांसाठी असलेल्या कारागृहांना नियमितपणे भेटी देऊन तेथे कोणी बालक आढळल्यास, त्याबालकास निरीक्षणगृहात तातडीने स्थानांतरित करण्याबाबत आवश्यक कारवाई तातडीने करणे;

(न) नियमानुसार ठरवून दिलेली इतर कर्तव्ये.

**९. या अधिनियमान्वये ज्यांना अधिकार प्रदान केलेले नाहीत, अशा न्यायाधीशांनी वापरण्याची कार्यपध्दती :–** १) अपराध केल्यास संशय असल्याने त्यांच्यासमोर सादर केलेला आरोपी बालक आहे असे जेव्हा अधिनियमान्वये मंडळाचे अधिकार प्रदान केलेल्या मॅजिस्ट्रेटचे मत असेल, त्यावेळी त्यांनी विलंब न लावता त्यांचे मत अभिलिखित करुन सदर बालकास केलेल्या अभिलेखासह सदर अधिकारक्षेत्र असलेल्या मंडळाकडे पाठवावे.

(२) ज्यावेळी एखाद्या अपराधाचा आरोप असलेली व्यक्ती मंडळाव्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात सदर व्यक्ती बालक असल्याचा किंवा सदर अपराध घडला तेव्हा सदर व्यक्ती बालक होती, असा दावा करेल किंवा अपराध घडला तेव्हा सदर व्यक्ती बालक होती असे स्वत: न्यायाधीशांचे मत असेल, सदर न्यायाधीश याबाबत चौकशी करतील, सदर व्यक्तीच्या वयाबाबत आवश्यक पुरावे (यात शपथपत्र अंतर्भूत नाही) नोंदवतील आणि सदर व्यक्तीच्या वयाबाबत जास्तीत जास्त अचूक निष्कर्ष नोंदवतील;

परंतु, हा अधिनियम लागू झाल्या त्यापूर्वी सदर व्यक्ती बालक राहिलेली नव्हती अशा परिस्थितही, सुनावणीच्या कोणत्याही अवस्थेत किंवा सुनावणीच्या अंतिम निर्णयानंतरही असा दावा केला जाऊ शकेल व तो विचारात घेतला जाऊन त्यावर या अधिनियमातील तरतुदी आणि या अधिनियमाखालील नियमांनुसार चौकशी केली जाईल आणि अंतिम निष्कर्ष विचारात घेतले जातील.

(३) जर सदर व्यक्तीने अपराध केलेला आहे व अपराध घडला त्यावेळी सदर व्यक्ती बालक होती, असा न्यायालयाचा निष्कर्ष असल्यास, न्यायाधीश सदर व्यक्तीस योग्य आदेश आणि असल्यास शिक्षा सुनावण्यासाठी मंडळाकडे पाठवतील व न्यायालयाने काही आदेश दिलेले असले तरी ते प्रभावी राहणार नाहीत.

(४) जर कलमांतर्गत येणाऱ्या व्यक्तीस संरक्षित कोठडीत ठेवण्याची आवश्यकता असल्यास व सदर व्यक्तीच्या बालक असल्याच्या दाव्याबाबत चौकशी सुरु असल्यास दरम्यानच्या काळात सदर व्यक्तीला संरक्षित जागेत ठेवले जाईल.

***

## प्रकरण चौथे

## कायद्याच्या विरोधात गेलेल्या बालकांबाबत वापरण्याची क्रियारीती.

**१०. कायद्याविरुध्द गेल्याचा संशय असलेल्या बालकास ताब्यात घेणे :–**

(१) ज्यावेळी कायद्याच्या विरुध्द गेल्याचा संशय असलेल्या बालकास पोलीस ताब्यात घेतील, त्यावेळी तात्काळ सदर बालकास विशेष बाल पोलीस पथकाच्या किंवा नामनिर्देशित बाल कल्याण अधिकाऱ्याच्या ताब्यात दिले जाईल व ते वेळ न घालवता, बालकास ताब्यात घेतल्याच्या जागेपासून प्रवासाचा कालावधी वगळता २४ तासाच्या आत मंडळासमोर हजर करतील :

परंतु, कोणत्याही परिस्थितीत, कायद्याच्या विरोधात गेल्याचा संशय असलेल्या बालकास, पोलीस कोठडीत किंवा कारागृहात ठेवले जाणार नाही.

(२) राज्य शासन या अधिनियमास सुसंगत असे नियम बनवेल.

(एक) ज्यांच्या मार्फत, कायद्याविरुध्द गेल्याचा संशय असलेल्या बालकास मंडळासमोर हजर केले जाईल अशा व्यक्ती (यात नोंदणीकृत स्वयंसेवी किंवा अशासकीय संघटनांचा अंतर्भात असेल) उपलब्ध करुन देणे;

(दोन) कायद्याविरुध्द गेल्याचा संशय असलेल्या बालकास कोणत्या पध्दतीने आवश्यकतेनुसार निरीक्षणगृहात किंवा संरक्षित जागी पाठविले जाईल ते ठरवून देणे.

**११. कायद्याविरुध्द गेलेल्या बालकास ज्या व्यक्तीच्या ताब्यात सोपविले असेल, अशा व्यक्तीची भूमिका :–** ज्यांच्या ताब्यात कायद्याविरुध्द गेलेल्या बालकास सोपविले असेल, सदर आदेश कायम असेपर्यंत ते त्या बालकाचे माता पिता असल्याप्रमाणे सदर बालकाचे संगोपन ही त्या व्यक्तीची जबाबदारी असेल.

परंतु, जरी सदर बालकाच्या माता–पित्यांनी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने सदर बालकाचा ताबा मागितला तरीही मंडळाने ठरवून दिलेल्या कालावधीपर्यंत ते बालक त्या व्यक्तीच्या जबाबदारीत असेल, अपवाद जर सदर बालकाचे माता–पिता किंवा इतर कोणी व्यक्ती सदर बालकास सांभाळण्यास योग्य असल्याचे मंडळाचे मत असल्यास.

**१२. कायद्याविरुध्द गेलेला बालक असल्याचा संशय असलेल्या व्यक्तीस जामीन :–** (१) जेव्हा कोणीही व्यक्ती, जी सकृतदर्शनी बालक असेल व तिने जामिनपात्र किंवा बिगर जामीनपात्र अपराध केलेला असेल, अशा व्यक्तीस पोलिसांनी ताब्यात घेतलेले किंवा अडकवून ठेवलेले असल्यास सदर व्यक्ती मंडळासमोर आल्यास किंवा तिला मंडळासमक्ष हजर केल्यास, सदर व्यक्तीला, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये किंवा त्यावेळी प्रभावात असलेल्या कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद केलेले असले, तरी मुचलक्यासह किंवा मुचलक्याशिवाय जामिनावर मुक्त केले जाईल किंवा परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली ठेवले जाईल किंवा सुयोग्य व्यक्तीच्या निगराणीत दिले जाईल.

परंतु, सदर व्यक्तीस मुक्त केल्यास ती व्यक्ती एखाद्या ज्ञात गुन्हेगाराच्या संपर्कात येण्याची शक्यता असेल किंवा सदर व्यक्तीला शारीरिक, मनोवैज्ञानिक किंवा नैतिक धोका पोहोचण्याची शक्यता असेल किंवा मुक्त केल्याने न्यायाची बाजू लंगडी पडण्याची शक्यता असल्यास, सदर व्यक्तीला मुक्त केले जाणार नाही. अशा परिस्थितीत मंडळ जामीन नाकारण्याची कारणे नमुद करील, तसेच कोणत्या परिस्थितीत सदर निर्णय घेतला गेला ते लेखी नमूद करील.

(२) जेव्हा अशा ताब्यात घेतलेल्या व्यक्तीस पोट–कलम (१) अन्वये पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी जामीनमुक्त करणार नाही, तेव्हा सदर अधिकारी सदर व्यक्तीस, मंडळासमक्ष हजर करेपर्यंत, ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे निरीक्षण गृहात ठेवण्याची व्यवस्था करील.

(३) जेव्हा अशा व्यक्तीस पोट कलम (१) अन्वये मंडळाकडुन जामीनमुक्त केले जाणार नाही, तेव्हा मंडळ सदर व्यक्तीस, लेखी आदेशान्वये चौकशीच्या कालावधीत परिस्थितीनुरुप निरीक्षणगृहात किंवा सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करेल.

(४) जेव्हा कायद्याच्या विरुध्द गेलेले बालक, सात दिवसांच्या कालावधीत जामिनाच्या शर्ती पूर्ण करण्याच्या परिस्थितीत नसेल, तेव्हा सदर बालकास आदेशात फेरबदल करण्यासाठी पुन्हा मंडळासमोर उभे केले जाईल.

**१३. माता–पिता किंवा पालक किंवा परिवीक्षा अधिकारी यांना माहिती देणे.:–** (१) जेव्हा कायद्याविरुध्द बालकास ताब्यात घेतले जाते, पोलीस ठाण्याच्या बाल कल्याण पोलीस अधिकारी म्हणून नामनिर्देशित अधिकारी किंवा त्या बालकास जेथे आणले असेल असे विशेष बाल न्याय पोलीस केंद्र यांनी बालकास ताब्यात घेतल्यानंतर त्वरीत,

(एक) बालकाचे माता–पिता किंवा पालक याचा शोध लागत असल्यास त्यांना, बालकास मंडळासमक्ष हजर केले जाईल तेव्हा हजर राहण्याच्या सूचना द्याव्यात, आणि

(दोन) परिवीक्षा अधिकारी किंवा परिवीक्षा अधिकारी उपलब्ध नसल्यास, बाल कल्याण अधिकाऱ्यास, दोन आठवड्यांच्या आत, सदर बालकाचा पूर्वेतिहास आणि त्याची कौटूंबिक पार्श्वभूमी तसेच मंडळास सदर बालकाबाबत चौकशी करण्यास सहाय्यभूत ठरेल, अशी कोणतीही महत्वाची माहिती अंतर्भूत असलेला सामाजिक अन्वेषण अहवाल पूर्ण करुन मंडळापुढे सादर करण्याबाबत सूचना द्याव्यात.

(२) जर अशा बालकास जामिनावर मुक्त केल्यास परिवीक्षा अधिकारी किंवा बाल कल्याण अधिकाऱ्यास त्याबाबत माहिती द्यावी.

**१४. कायद्याविरुध्द गेलेल्या बालकाबाबत मंडळाकडुन चौकशी –** (१) जेव्हा, कायद्याविरुध्द गेल्याचा संशय असलेल्या बालकास मंडळासमक्ष हजर केले जाते तेव्हा मंडळ या अधिनियमातील तरतुदीनुसार त्या बालकाबाबत चौकशी करेल आणि सदर बालकाबाबत कलम १७ आणि १८ अन्वये आवश्यक आदेश पारित करेल.

(२) या कलमातील चौकशी, बालकास मंडळासमक्ष हजर केल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केली जाईल. सदर प्रकरणाची पार्श्वभूमी विचारात घेऊन व कारणे लेखी स्वरुपात नमूद करुन मंडळ सदर चौकशीची कालमर्यादा कमाल दोन महिन्यांची वाढवू शकेल.

(३) निर्घृण स्वरुपाच्या अपराधाच्या संदर्भात, कलम १५ अन्वये मंडळ प्राथमिक चौकशी, बालकास सर्वप्रथम मंडळासमक्ष हजर केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यात पूर्ण करील.

(४) जर, किरकोळ स्वरुपाच्या अपराधातील पोट–कलम (२) खालील चौकशी वाढीव कालावधीनंतरही अनिर्णित राहिल्यस, सदर चौकशी बंद केली जाईल:

परंतु, गंभीर किंवा निर्घृण स्वरुपाच्या अपराधाच्या संदर्भात, मंडळास चौकशी पूर्ण करण्यासाठी अधिक मुदतवाढ आवश्यक असल्यास परिस्थितीनुरुप मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी, कारणे लेखी स्वरुपात नमूद करुन मुदतवाढ देऊ शकतील.

(५) न्याय्य आणि शीघ्र चौकशीसाठी मंडळ खालीलप्रमाणे पावले उचलेल –

(अ) चौकशीस प्रारंभ करताना, मंडळ सदर कायद्याविरुध्द गेलेल्या बालकाविरुध्द पोलीसांनी किंवा वकील किंवा परिवीक्षा अधिकारी किंवा इतर कोणी व्यक्तीने गैरवर्तन केलेले नाही, याबाबत खात्री करुन घेईल आणि तसे गैरवर्तन झालेले असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी पावले उचलली जातील;

(ब) या अधिनियमातील सर्व प्रकरणात, कारवाई शक्य तितक्या साधेपणाने आणि ज्या बालकाविरुध्द चौकशी केली जात आहे, त्या बालकास खेळीमेळीच्या वातावरणात ठेवून केली जाईल;

(क) मंडळासमक्ष हजर केलेल्या प्रत्येक बालकास त्याची बाजू मांडण्याची आणि कारवाईमध्ये सहभागी होण्यासी संधी दिली जाईल;

(ड) किरकोळ अपराधाची प्रकरणे मंडळाकडून फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये मनूद केलेल्या समरी कारवाईप्रमाणे संपविली जातील;

(इ) गंभीर स्वरुपाच्या प्रकरणातील कारवाई मंडळ फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये नमूद केलेल्या समन्स केसच्या कार्यपध्दतीप्रमाणे संपवील.

(फ) निर्घृण स्वरुपाच्या अपराधात,

(एक) अपराध घडला तेव्हा, १६ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या बालकाच्या संदर्भात मंडळ सदर चौकशीवर नमूद खंड (इ) प्रमाणे संपवील.

(दोन) अपराध घडला तेव्हा १६ पेक्षा जास्त वय असलेल्या बालकाच्या संदर्भात, सदर कारवाई कलम १५ च्या तरतुदींप्रमाणे संपविली जाईल.

**१५. निर्घृण अपराधाबाबत मंडळामार्फत प्राथमिक पडताळणी –** (१) ज्याने वयाची १६ वर्षे पूर्ण केली आहेत किंवा जो १६ वर्षापेक्षा जास्त वयाचा आहे अशा बालकाने निर्घृण स्वरुपाचा अपराध केल्याचा संशय असल्यास, मंडळ सदर बालकाच्या अशा स्वरुपाचा अपराध करण्याच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतेबाबत, त्याच्या कृत्याच्या दुष्परिणामांबाबत त्याला असलेली जाणीव आणि ज्या परिस्थितीत त्याने सदर अपराध केल्याचा संशय आहे, त्या परिस्थितीबाबत प्राथमिक पडताळणी करेल आणि कलम १८ च्या पोट–कलम (३) अन्वये आदेश देऊ शकेल :

परंतु, अशा पडताळणीसाठी मंडळ अनुभवी मानसशास्त्रज्ञ किंवा मानसिक सामाजिक कार्यकर्ता किंवा इतर तज्ज्ञांची मदत घेऊ शकेल.

**स्पष्टीकरण –** या कलमांसाठी, सदर प्राथमिक चौकशी म्हणजे खटल्याची सुनावणी नाही तर बालकाची असा अपराध करण्याची क्षमता आणि परिणामांची जाणीव याबाबतची प्राथमिक स्वरुपाची चौकशी आहे.

(२) प्राथमिक चौकशीमध्ये, सदर प्रकरणाची निर्गती मंडळाकडूनच केली जावी असे बालमंडळाचे मत झाल्यास मंडळ शक्यतोवर, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ मधील समन्स केसच्या कार्यपध्दती वापरेल.

परंतु, सदर प्रकरणाची निर्गती मंडळामार्फत करण्याच्या निर्णयाविरुध्द कलम १०१ च्या पोट–कलम (२) अन्वये अपील करता येईल:

परंतु, या कलमांतर्गत करावयाची प्राथमिक पडताळणी, कलम १४ मध्ये नमूद केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

**१६. प्रलंबित चौकशीचे पुनर्विलोकन –** (१) मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी मंडळाकडील प्रलंबित प्रकरणांचे, दर तीन महिन्यांनी पुनर्विलोकन करतील आणि मंडळाला त्यांच्या बैठका वाढविण्याबाबत आदेश देतील किंवा अतिरिक्त मंडळाचे गठन करण्याची शिफारस करतील.

(२) मंडळासमोर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या, प्रलंबित राहण्याचा कालावधी, प्रलंबित राहण्याचे स्वरुप आणि त्याची कारणी याबाबतचे पुनर्विलोकन दर सहा महिन्यांनी उच्च पातळीवरील समिती करेल. सदर समितीमध्ये राज्य न्यायिक सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष, गृह सचिव, राज्यात या अधिनियमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी असणारे सचिव आणि स्वयंसेवी किंवा अशासकीय संघटनांचे अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी असतील.

(३) अशा प्रलंबित प्रकरणांची माहिती मंडळ, मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी यांनाही राज्य शासनाने ठरवून दिलेल्या पध्दतीने देतील.

**१७. बालकाबाबत दिलेले आदेश कायद्याशी विसंगत नसतील –** (१) मंडळासमक्ष हजर केलेल्या बालकाने अपराध केलेला नाही, याबाबत चौकशीअंती मंडळाचे समाधान झाल्यास, त्यावेळी प्रभावात असणाऱ्या इतर कोणत्याही अधिनियमात याविरुध्द

काहीही लिहिलेले असले तरी, मंडळ त्याबाबत आदेश पारित करेल.

(२) जर पोट–कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या बालकास देखरेख आणि संरक्षणाची गरज असल्याचे मंडळाचे मत झाल्यास, आवश्यक योग्य सूचनांसाठी समितीकडे पाठवतील.

**१८. बालकाबाबत दिलेले आदेश कायद्याशी विसंगत असल्यास –** (१) जर चौकशीअंती, कोणत्याही वयाच्या बालकाने किरकोळ स्वरुपाचा किंवा गंभीर स्वरुपाचा अपराध केला आहे किंवा १६ वर्षे वयापेक्षा कमी वयाच्या बालकाने निर्घृण स्वरुपाचा अपराध केला आहे, असे मंडळाचे मत झाले तर, त्यावेळी प्रभावात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमात यापेक्षा वेगळे काहीही नमूद असले तरी, अपराधाच्या स्वरुपावरुन, पर्यवेक्षण किंवा हस्तक्षेपाची विशेष गरज असल्याचे सामाजिक अन्वेषणाच्या अहवालावरुन आणि बालकाच्या भूतकाळातील वर्तनावरुन, मंडळास योग्य वाटल्यास मंडळ,

(अ) बालकास आवश्यक सल्ला किंवा समज देऊन तसेच सदर बालक व त्याचे माता–पिता किंवा पालक यांची चौकशी व समुपदेशन आदेशित करुन घरी सोडेल;

(ब) बालकास सामुदाकिय समुपदेशन किंवा तत्सम कार्यक्रमात भाग घेण्याचा सल्ला देईल;

(क) बालकास एखाद्या संस्थेच्या किंवा संघटनेच्या किंवा विशिष्ट व्यक्तीच्या किंवा व्यक्तीच्या किंवा मंडळाने ठरविलेल्या व्यक्तींच्या समूहाच्या देखरेखीखाली समाजसेवा करण्याबद्दल आदेश देईल;

(ड) बालकास, त्याच्या माता–पित्यांना किंवा पालकांना दंड भरण्याबाबत आदेश देईल;

मात्र, जर सदर बालक काम करते असेल, तर त्यावेळी प्रभावात असलेल्या कोणत्याही कामगार अधिनियमाच्या तरतुदींचा भंग होत नसल्याबाबत खात्री केली जाईल;

(इ) सदर बालकास चांगल्या वर्तणुकीच्या परिवीक्षेवर सोडण्याच्या आणि माता–पित्याच्या, पालकांच्या किंवा एखाद्या सुयोग्य व्यक्तीच्या देखभातील मुचलक्यासह किंवा मुचलक्याशिवाय बंधपत्रासह देण्याचे आदेश देतील. सदर चांगल्या वर्तणुकीच्या बंधपत्राची मुदत तीन वर्षापेक्षा जास्त नसेल;

(फ) बालकाला चांगल्या वर्तणुकीच्या परिवीक्षेवर सोडण्याचे आणि चांगल्या वर्तणुकीची आणि बालकाच्या कल्याणाची खात्री करण्यासाठी एखाद्या योग्य संस्थेच्या संगोपन आणि देखरेखीखाली, तीन वर्षांपेक्षा जास्त नाही, अशा वास्तव्याच्या कालावधीसाठी शिक्षणासह सुधारणात्मक सेवा, कौशल्य विकास, समुपदेशन, वर्तणूक परिवर्तन उपचार आणि मानसशास्त्रीय आधार पुरविण्यासाठी पाठविण्याचे आदेश देतील;

परंतु, जर बालकाची वर्तणुक, त्याच्या स्वत:च्या आणि सदर बालगृहातील इतर बालकाच्या कल्याणासाठी योग्य नसल्यास मंडळ अशा बालकास सुरक्षागृहात पाठविण्याचे आदेश देईल.

(२) जर पोट–कलम (१) मधील खंड (अ) ते (ग) मधील आदेश देण्यात आला असल्यास, मंडळ त्याव्यतिरिक्त खालील बाबतीत आदेश देऊ शकेल.

(एक) शाळेत जाण्याबाबत.

(दोन) व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात जाण्याबाबत.

(तीन) उपचार केंद्रात जाण्याबाबत.

(चार) एखाद्या ठराविक जागी जाण्यास, तेथे दिसण्यास किंवा वावरण्यास प्रतिबंध, किंवा

(पाच) एखादा व्यसनमुक्तीचा उपचार पूर्ण करणे.

(३) जेव्हा कलम १५ खालील प्राथमिक पडताळणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, मंडळ सदर बालक प्रौढ झाल्याचा अभिप्राय देऊन खटल्याच्या सुनावणीची आवश्यकता असल्याचे नमूद करुन प्रकरण अपराधाच्या सुनावणीचे अधिकार असलेल्या बाल

न्यायालयाकडे हस्तांतरित करेल.

**१९ बाल न्यायालयाचे अधिकार –** (१) कलम १५ अन्वये प्राथमिक चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यावर, बाल न्यायालय खालील बाबतीत निर्णय घेईल.

(एक) सदर बालक प्रौढ असल्याप्रमाणे त्याचेविरुध्द फौ.दं.प्र.संहिता, १९७३ अन्वये खटला चालविणे आवश्यक आहे व बालकाच्या गरजा, न्याय्य सुनावणीची तत्वे विचारात घेऊन, बालकास योग्य वातावरणात आणि कलम २१ अन्वये, योग्य तो आदेश देणे आवश्यक आहे.

(दोन) सदर बालकाविरुध्द, तो प्रौढ असल्याप्रमाणे, खटल्याच्या सुनावणीची आवश्यकता नाही आणि मंडळ आवश्यक चौकशी करुन या अधिनियमाच्या कलम १८ अन्वये योग्य ते आदेश देईल.

(२) कायद्याविरुध्द गेलेल्या बालकाच्या संदर्भात, अंतिम आदेशात, बालकाच्या पुनर्वसनाची व्यक्तीगत संगोपन योजना, त्याबाबत परिवीक्षा अधिकारी किंवा जिल्हा बाल कल्याण केंद्र किंवा सामाजिक कार्यकर्त्यांकडून पाठपुरावा याबाबतचा तपशील उल्लेखित असल्याबाबत बाल न्यायालय खात्री करुन घेईल.

(३) कायद्याविरुध्द गेलेल्या बालकास वयाची २१ वर्षे पूर्ण करेपर्यंत सुरक्षागृहात ठेवले जाईल. याबाबत बाल न्यायालय खात्री करुन घेईल. त्यानंतर सदर व्यक्तीस कारागृहात पाठविले जाईल.

परंतु, शैक्षणिक सेवा, कौशल्य विकास आणि समुपदेशन, वर्तन सुधारणा उपचार आणि मानसोपचारासारख्या इतर अवांतर सुविधा बालकास तो सुरक्षागृहात असे पर्यंत पुरविल्या जातील.

(४) सुरक्षागृहात असलेल्या बालकाच्या प्रगतिबाबत आवश्यक असलेल्या प्रगती अहवालाबाबत दरवर्षी नियमितपणे जिल्हा बाल संरक्षण केंद्र किंवा सामाजिक कार्यकर्ता यांचेमार्फत पाठपुरावा सादर केला जात आहे व त्यायोगे बालकास कोणत्याही प्रकारची गैरवर्तणूक दिली जात नसल्याबाबत बाल न्यायालय खात्री करेल.

(५) पोट–कलम ४ खालील अहवाल अभिलेखासाठी आणि आवश्यक पाठपुराव्यासाठी बाल न्यायालयास अग्रेषित केला जाईल.

**२०. ज्या बालकाने वयाची २१ वर्षे पूर्ण केली आहेत मात्र सुरक्षा गृहातील वास्तव्याचा कालावधी पूर्ण केला नसल्यास –** (१) जेव्हा कायद्याच्या विरुध्द गेलेले बालक वयाची २१ वर्षे पूर्ण करेल, पण त्याचा सुरक्षागृहातील वास्तव्याचा कालावधी पूर्ण झालेला नसल्यास, बाल न्यायालय, परिवीक्षा अधिकारी किंवा जिल्हा बाल सुरक्षा केंद्र किंवा सामाजिक कार्यकर्ता किंवा स्वत: पाठपुरावा करुन बालकात सुधारणात्मक बदल घडुन आलेले असल्याबाबत आणि सदर बालक समाजात योगदान देणारी घटक म्हणुन राहण्यायोग्य झाले असल्याबाबत खात्री करुन घेईल व त्यासाठी कलम १९ मधील पोट–कलम (४) अन्वये सादर झालेले अहवाल आणि संबंधित तज्ज्ञांचा अभिप्राय विचारात घेईल.

(२) पोट–कलम (१) मध्ये नमूद क्रियारीती पूर्ण केल्यानंतर आवश्यक असल्यास बाल न्यायालय–

(एक) वास्तव्याच्या उर्वरित कालावधीसाठी नियंत्रण अधिकाऱ्याची नेमणूक करणे किंवा न्यायालयास योग्य वाटतील अशा अटींवर बालकाची मुक्तता करील;

(दोन) बालक आदेशातील उर्वरित कालावधी कारागृहात जाऊन पूर्ण करेल, अशा आशयाचा आदेश देईल.

परंतु, प्रत्येक राज्य शासन नियंत्रण अधिकाऱ्यांची यादी तयार करतील आणि नियंत्रणाची पध्दतही ठरवून देईल.

**२१. कायद्याविरुध्द गेलेल्या बालकाबाबत देता येणार नाही असा आदेश –** कायद्याविरुध्द गेलेल्या कोणत्याही बालकाबाबत या अधिनियमान्वये किंवा भारतीय दंड संहिता किंवा त्यावेळी प्रभावात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमान्वये मृत्युदंड किंवा मुक्ततेची शक्यता नाही, अशा जन्मठेपेचा आदेश देता येणार नाही.

**२२. फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ मधील प्रकरण ८ वे बालकाविरुध्द लागू होणार नाही –**

फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ किंवा त्यावेळी प्रभावात असणाऱ्या कोणत्याही प्रतिबंधात्मक स्थानबध्दता अधिनियमात काहीही नमूद केलेले असले तरी, कोणत्याही बालकाविरुध्द फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या प्रकरण ८ अन्वये कारवाई सुरु करता येणार नाही आणि कोणताही आदेश देता येणार नाही.

**२३. कायद्याविरुध्द गेलेला बालक आणि बालक नसलेल्या व्यक्तीविरुध्द संयुक्त कारवाई करता येणार नाही –**

(१) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २२३ मध्ये किंवा त्यावेळी प्रभावात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमामध्ये काहीही नमूद असले तरी, कायद्याच्या विरोधात गेल्याचा संशय असलेला बालक आणि बालक नसलेल्या व्यक्तीच्याविरुध्द संयुक्त कारवाई करता येणार नाही.

(२) जर मंडळापुढील किंवा बाल न्यायालयातील चौकशीच्या दरम्याने, कायद्याविरुध्द गेलेला बालक असल्याचा संशय असलेली व्यक्ती बालक नाही, असे निष्पन्न झाल्यास सदर व्यक्तीविरुध्द एखाद्या बालकासोबत संयुक्तपणे कारवाई करता येणार नाही.

**२४. अपराधाच्या तपासातील पुराव्यांच्या आधारे अपात्रता दूर करणे –**

(१) त्यावेळी प्रभावात असलेल्या कोणत्याही अधिनियमात दोषसिध्दीनंतर अपात्रतेबाबत काहीही नमूद असले तरी, बालकाने केलेला अपराध या अधिनियमातील तरतुदीनुसार नोंदविला गेलेला असल्यास, अशा बालकास अपात्र ठरविले जाणार नाही :

परंतु, ज्या बालकाने वयाची १६ वर्षे पूर्ण केलेली आहेत किंवा जो बालक १६ वर्षापेक्ष जास्त वयाचा असेल आणि कायद्याविरुध्द वागल्याचा निर्णय बाल न्यायालयाने कलम १९ मधील पोट–कलम (१) च्या खंड (एक) अन्वये दिलेला असेल त्यास हे पोट–कलम (१) लागू होणार नाही.

(२) अपीलाचा कालावधी उलटून गेल्यानंतर, किंवा पूर्वी ठरविलेली विवक्षित मुदत उलटून गेल्यावर मंडळ पोलिसांना किंवा बाल न्यायालय, न्यायालय अधिष्ठाता यांना, सदर दोषसिध्दीचा अभिलेख नाश करण्याबाबत आदेश देतील,

परंतु, जर अपराध निर्घृण स्वरुपाचा असल्यास आणि सदर बालक कायद्याविरुध्द वागल्याचा निर्णय बाल न्यायालयाने कलम १९ मधील पोट–कलम (१) च्या खंड (एक) अन्वये दिलेला असेल तर बाल न्यायालय सदर अभिलेख राखून ठेवेल.

**२५. प्रलंबित प्रकरणांबाबत विशेष तरतूद –** या अधिनियमात काहीही नमूद असले तरीही, हा अधिनियम अस्तित्वात आला त्यावेळी कोणत्याही मंडळासमोर किंवा न्यायालयासमोर प्रलंबित असलेले प्रकरण, हा अधिनियम अस्तित्वात आला नसता तर ज्याप्रमाणे हाताळले गेले असेल, तसेच हाताळले जाईल.

**२६. कायद्याविरुध्द वर्तन केलेल्या व पलायन केलेल्या बालकाबाबत तरतूद –**

(१) त्यावेळी प्रभावात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद केलेले असले तर, कायद्याच्या विरुध्द वागत असलेल्या आणि या अधिनियमानुसार त्याला सोपविण्यात आलेल्या कोणत्याही विशेष अभिगृहातून किंवा निरीक्षण केंद्रातून किंवा सुरक्षागृहातून किंवा कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेच्या अभिरक्षेतून पलायन केलेल्या कोणत्याही बालकास, कोणताही पोलीस अधिकारी ताब्यात घेऊ शकेल.

(२) पोट–कलम (१) मध्ये नमूर करण्यात आलेल्या व ताब्यात घेतलेल्या बालकास, ताब्यात घेतल्यापासून २४ तासाच्या आत, ज्या मंडळाने त्या बालकाच्या संबंधात मूळ आदेश पारित केलेला असेल, त्या मंडळासमोर किंवा तसे शक्य नसल्यास जेथे सदर बालक सापडला असेल, त्याच्या नजीकच्या मंडळासमक्ष हजर केले जाईल.

(३) सदर मंडळ बालकाच्या पलायनाच्या कारणांची पडताळणी करुन, मंडळास योग्य वाटेल, त्याप्रमाणे त्या बालकास, ज्या विशेष अभिगृहातून किंवा संस्थेतून किंवा व्यक्तीच्या अभिरक्षेतून त्याने पलायन केलेले असेल, त्या अभिगृह किंवा संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या किंवा तत्सम इतर अभिगृह किंवा संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या ताब्यात सोपवतील,

परंतु, सदर मंडळ सदर बालकाच्या बाबतीत योग्य असतील अशी आणखीही कारवाई करण्याबाबत आदेश पारीत करु शकेल.

(४) अशा बालकाच्या बाबतीत याव्यतिरिक्त इतर काहीही कारवाई केली जाणार नाही.

***

## प्रकरण पाचवे

## बाल कल्याण समिती

**२७. बाल कल्याण समिती –** (१) राज्य शासनाकडून शासकीय अधिपत्रात, अधिकृत अधिसूचना प्रसिध्द करुन प्रत्येक जिल्ह्यासाठी या अधिनियमानुसार अभिरक्षेची किंवा संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांसंबंधात प्रदान केलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि कर्तव्यपालनासाठी आवश्यकतेनुसार एक किंवा अधिक बाल कल्याण समिती स्थापन केली जाईल किंवा केल्या जातील आणि अधिसूचना जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या कालावधीत अशा समितीच्या किंवा समित्यांच्या सर्व सभासदांसाठी प्रारंभिक प्रशिक्षण आणि संवेदनशीलतेबाबत तरतूद केली जाईल.

(२) अशा समितीची रचना एक अध्यक्ष आणि चार सदस्य – त्यातील किमान एक सदस्य महिला आणि एक बालकांच्या समस्यांबाबत तज्ज्ञ असलेली व्यक्ती असेल.

(३) जिल्हा बाल संरक्षण केंद्राकडून सदर समितीच्या कार्यक्षम कामकाजासाठी एक सचिव आणि सचिवांच्या कामकाजात सहाय्य करण्यासाठी मनुष्यबळाची तरतूद केली जाईल.

(४) सदर समितीवर नेमणूक करण्यात आलेले सदस्य किमान सात वर्षे बालकांचे आरोग्य, शिक्षण आणि कल्याणासंबंधी क्षेत्राशी संबंधित असतील किंवा अशा क्षेत्रात बाल मानसशास्त्र किंवा मानसोपचार किंवाविधी व न्यायक्षेत्रातील पदवीधर क्रियाशिल असतील किंवा समाजसेवा किंवा समाजशास्त्र किंवा मनुष्यविकास क्षेत्राशी संबंधित असतील.

(५) वर नमूद किंवा इतर शासनामान्य गुणवत्ता असल्याशिवाय कोणत्याही सदस्याची अशा समितीवर नेमणूक केली जाणार नाही.

(६) समितीच्या कोणत्याही सदस्यास तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी बालकल्याण समितीवर नेमले जाणार नाही.

(७) (एक) जर कोणत्याही सदसय, या अधिनियमानुसार त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा गैरवापर करत असल्याचे सिद्ध झाल्यास,

(दोन) त्याला नैतिक अध:पतनाच्या कोणत्याही अपराधातील दोषसिद्ध अपराधी जाहीर केले गेले असल्यास व सदर न्यायनिर्णय बदलला न गेल्यास किंवा सदर अपराधातून त्यास संपूर्णपणे माफी न दिली गेल्यास,

(तीन) कोणत्याही सबळ कारणाशिवाय सदर सदस्य समितीच्या कामकाजात सलग तीन महिने गैरहजर राहिल्यास किंवा वर्षभरातील बैठकांमध्ये तीन चतुर्थांशापेक्षा जास्त गैरहजर राहिल्यास,

राज्य शासनाकडून अशा सदस्याचे सदस्यत्व, चौकशीनंतर रद्द केले जाईल.

(८) जिल्हा दंडाधिकारी दर तीन महिन्यांनी सदर समितीच्या कामकाजाचे पुनर्विलोकन करतील.

(९) सदर समिती न्यायमंडळाप्रमाणे (बेंच) कार्य करेल आणि फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये महानगर दंडाधिकाऱ्यास किंवा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार सदर समितीस प्राप्त असतील.

(१०) बाल कल्याण समितीसाठी, जिल्हा दंडाधिकारी हे तक्रार निवारण अधिकारी असतील आणि बालकाशी संबंधित कोणीही व्यक्ती जिल्हा दंडाधिकाऱ्यांसमोर याचिका सादर करु शकतील आणि जिल्हा दंडाधिकारी सदर याचिकेबाबत विचार करुन योग्य ते आदेश देतील.

**२८. बाल कल्याण समितीची कारवाई :–** (१) सदर समिती दर महिन्यातून किमान २० दिवस कार्यरत असेल आणि

पूर्वी ठरवून दिलेल्या नियम आणि क्रियारीतीनुसार कामकाज करेल.

(२) कार्यरत बाल अभिरक्षा संस्थेच्या कारभाराची आणि बालकल्याणाच्या कामकाजाची पाहाणी करण्यासाठी समिती सदस्यांनी दिलेली भेट ही समितीची बैठक असल्याची समजले जाईल.

(३) बाल कल्याण समिती कार्यरत नसेल तेव्हा, काळजी, देखभाल आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकास बाल सुरक्षागृहात ठेवण्यापूर्वी वैयक्तिकरित्या समितीच्या कोणत्याही सदस्यासमक्ष किंवा इतर योग्य व्यक्तीसमक्ष हजर केले जाईल.

(४) समितीच्या सदस्यांमध्ये मतभेद निर्माण झाल्यास, योग्य निर्णय होईपर्यंत बहुमताच्या निर्णयाप्रमाणे आणि असे बहुमत होत नसल्यास समितीच्या अध्यक्षांच्या आदेशानुसार कारवाई केली जाईल.

(५) पोट–कलम (१) मधील तरतुदींच्या अधीन राहून, कोणत्याही समिती सदस्याच्या अनुपस्थितीत समितीमधील इतर सदस्य कामकाज पाहतील आणि केवळ कामकाजाच्या काळात एखाद्या सदस्याच्या गैरहजेरीच्या कारणावरुन समितीचा निर्णय अवैध ठरणार नाही :

परंतु, अंतिम निर्णयासाठी किमान तीन सदस्य हजर असणे आवश्यक असेल.

**२९. समितीचे अधिकार :–** (१) देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांच्या देखभाल, संरक्षण, उपचार, विकास आणि पुनर्वसनाबाबत तसेच अशा बालकांच्या प्राथमिक गरजा आणि संरक्षणाबाबतच्या प्रकरणांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार समितीला असतील.

(२) जर कोणत्याही विभागासाठी समितीचे गठण झालेले असल्यास, त्यावेळी प्रभावात असलेल्या कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद असले तरी सदर समितीला देखभाल आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकाच्या काळजी आणि संरक्षणाबाबत या अधिनियमान्वये जर काही विशिष्ट संबंधात विशिष्ट आदेश दिलेले नसल्यास, या अधिनियमान्वये कारवाईचे सर्व अधिकार असतील.

**३०. समितीची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या :–** बाल कल्याण समितीच्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांमध्ये,

(एक) त्यांच्या समक्ष हजर करण्यात आलेल्या बालकांची दखल घेणे आणि त्यांचा स्वीकार करणे;

(दोन) बालकांच्या संबंधातील आणि या अधिनियमान्वये बालकाच्या संरक्षण आणि कल्याणावर परिणाम करतील अशा सर्व प्रकरणात चौकशी करणे;

(तीन) बाल कल्याण अधिकारी आणि बाल परीविक्षा अधिकारी तसेच जिल्हा बाल संरक्षण केंद्र किंवा अशासकीय सेवाभावी संघटना यांना सामाजिक चौकशी व तपास करुन अहवाल सादर करण्याबाबत आदेश देणे;

(चार) चौकशी करुन, देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांच्या देखभालीसाठी एखादी व्यक्ती योग्य असल्याबाबत जाहीर करणे;

(पाच) एखाद्या बालकास अभिरक्षेसाठी देण्याबाबत आदेश देणे;

(सहा) बालकांच्या, बालकाची देखभाल, संरक्षण, योग्य पुनर्वसन याची आवश्यकता असलेल्या बालकाच्या व्यक्तीगत काळजीच्या योजनेसंबंधात खात्री करणे आणि बालकचे मातापिता, पालक किंवा सुयोग्य व्यक्ती किंवा सुरक्षा गृह यांची पुनर्योजना करणे.

(सात) संस्था सहाय्याची आवश्यकता असलेल्या बालकाचे वय, लिंग, शारीरिक कमतरता आणि गरजा याबाबत लक्ष पुरवून, योग्य संस्थेची सदस्यक्षमता विचारात घेऊन नोंदणीकृत संस्थेच्या ताब्यात बालकास सोपविणे;

(आठ) देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांची निवास व्यवस्था असलेल्या संस्थांना महिन्यातून किमान दोनवेळा भेटी देऊन व पाहणी करुन आवश्यक सुधारणांसंबंधात जिल्हा बाल सुरक्षा केंद्राकडे आणि राज्य शासनाकडे शिफारसी सादर करणे;

(नऊ) बालकांना अभिरक्षेत्र सोपविण्याबाबत मातापित्यांनी पालकांनी दिलेली पत्रे प्रमाणित करणे व तत्पूर्वी मातापित्यांना

पुनर्विचाराची पुरेशी संधी देऊन कुटूंब एकसंध राहील याबाबत जास्तीत जास्त प्रयत्न करणे;

(दहा) सोडून दिलेल्या किंवा हरवलेल्या बालकांना आवश्यक कारवाई करुन कुटूंबाकडे पुन्हा सोपविण्यासाठी सर्व प्रयत्न केले गेल्याची खात्री करणे;

(अकरा) आवश्यक त्या चौकशीनंतर अनाथ, ताब्यास दिलेली किंवा सोडून दिलेली बालके दत्तक देण्यायोग्य असल्याबाबत जाहीर करणे;

(बारा) देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या परंतु समितीसमक्ष हजर न केलेल्या बालकांबाबत स्वयंस्फूर्तपणे निर्णय घेणे व अशा बालकांपर्यंत पोहोचणे, मात्र असा स्वयंस्फूर्त निर्णय किमान तीन सदस्यांनी घेणे आवश्यक आहे.

(तेरा) लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या आणि देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेले बालक म्हणून समितीसमक्ष हजर केलेल्या बालकाबाबत कारवाई करुन अशा बालकांबाबत बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, २०१२ (२०१२ चा ३२ वा) अन्वये परिस्थितीनुरुप विशेष बालरक्षा पोलीस किंवा स्थानिक पोलिसांच्या संरक्षणात देऊन पुनर्वसन करणे;

(चौदा) कलम १७ च्या पोट–कलम (२) अन्यये मंडळाकडून पाठविण्यात आलेल्या प्रकरणात आवश्यक कारवाई करणे;

(पंधरा) पोलीस, श्रम विभाग आणि बालकांची काळजी आणि संरक्षण या संदर्भात जिल्हा बाल संरक्षण केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने काम करणाऱ्यास इतर संस्थांशी समन्वय राखणे;

(सोळा) कोणत्याही बाल संगोपन केंद्रातील बालकाबाबत झालेल्या दुर्व्यवहाराबाबत तक्रार आल्यास समितीने चौकशी करावी आणि पोलीस, जिल्हा बाल संरक्षण केंद्र किंवा श्रम विभाग किंवा बालरक्षा संस्था यांना आवश्यक ते आदेश द्यावेत;

(सतरा) बालकांसाठी आवश्यक त्या विधी व न्याय सेवा उपलब्ध करुन देणे;

(अठरा) वेळोवेळी दिलेल्या आदेशांप्रमाणे इतर आवश्यक कर्तव्ये करणे.

***

## प्रकरण सहावे

## देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकाबाबत करावयाची कारवाई

**३१. समिती समक्ष हजर करणे :–** (१) ज्या बालकाला देखभाल आणि संरक्षणाची गरज आहे, अशा बालकास खालीलपैकी कोणीही व्यक्ती बाल कल्याण समिती समक्ष हजर करु शकेल;

(एक) कोणीही पोलीस अधिकारी किंवा विशेष बाल सुरक्षा पोलीस युनिट किंवा अधिकृत बाल कल्याण पोलीस अधिकारी किंवा जिल्हा बाल संरक्षण केंद्राचा अधिकारी किंवा त्यावेळी प्रभावात असलेल्या कामगार अधिनियमान्वये नेमणूक झालेला निरीक्षक दर्जाचा अधिकारी;

(दोन) कोणताही लोकसेवक;

(तीन) बाल संरक्षा सेवा किंवा कोणतीही अशासकीय स्वयंसेवी संस्था किंवा राज्य शासनानी नोंद घेतलेली कोणतीही संस्था;

(चार) बाल कल्याण अधिकारी किंवा परिवीक्षा अधिकारी;

(पाच) कोणीही सामाजिक कार्यकर्ता;

(सहा) कोणतेही बालक स्वत:

(सात) कोणतीही नर्स, डॉक्टर, प्रसूतिगृह, रुग्णालयाचे व्यवस्थापन,

परंतु सदर बालकास वेळ वाया न घालवता तसेच प्रवासास लागणारा कालावधी वगळून २४ तासांच्या आत समितीसमक्ष हजर केले पाहिजे.

(२) राज्य शासन, कोणत्या पद्धतीने समितीस अहवाल सादर केला जावा आणि चौकशीच्या कालवधीत, कोणत्या पद्धतीने बालकास बाल सुरक्षागृहात किंवा सुयोग्य संस्थेत किंवा सुयोग्य व्यक्तीकडे सोपविले जावे याबाबत, या अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असे नियम करु शकेल.

**३२. पालकांपासून विभक्त झालेले बालक आढळल्यास माहिती देणे बंधनकारक :–** (१) कोणत्याही व्यक्तीस किंवा पोलीस अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही संघटनेत किंवा रुग्णालयात किंवा प्रसूतीगृहात काम करणाऱ्या व्यक्तीस जे बालक हरवले आहे किंवा सोडून दिले आहे किंवा अनाथ असल्याचे दिसते आहे असे बालक आढळल्यास किंवा माहिती मिळाल्यास किंवा सापडल्यास किंवा अशा बालकाचा ताबा मिळाल्यास, कौटुंबिक आधार नसलेल्या त्या बालकाबाबतची माहिती (प्रवासासाठी लागणारा कालावधी वगळून २४ तासांच्या आत) बाल सुरक्षा संस्था किंवा नजीकच्या पोलीस ठाण्यात किंवा बाल कल्याण समितीला किंवा जिल्हा बाल सुरक्षा केंद्रात देतील किंवा सदर बालकास, या अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या बाल संगोपन केंद्रोत पोहोचवतील.

(२) पोट–कलम (१) अन्वये मिळालेली बालकाची माहिती केंद्र शासनाने किंवा जिल्हा बाल सुरक्षा केंद्राने, बाल संगोपन संस्थेच्या ठरवून दिलेल्या पोर्टलवर नोंदवीली जाणे बंधनकारक आहे.

**३३. माहिती न कळविण्याचा अपराध :–** वर नमूद कलम ३२ अन्वये संबंधित अधिकाऱ्यांना २४ तासात न कळविल्यास हे कृत्य अपराध समजले जाईल.

**३४. माहिती न दिल्यास शिक्षा :–** ज्या व्यक्तीने कलम ३३ अन्वये अपराध केलेला आहे अशा व्यक्तीस सहा महिन्यांपर्यंत कैद किंवा रुपये दहा हजार पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा केल्या जाऊ शकतील.

**३५. बालकास सोपविणे :–** (१) मातापिता किंवा पालक यांना त्यांच्या नियंत्रणापलीकडील शारीरिक, भावनिक किंवा सामाजिक कारणांमुळे, बालकाला सोपवावयाचे असेल तर ते त्या बालकास समिती समक्ष हजर करतील.

(२) ठरवून दिलेल्या चौकशी आणि समुपदेशाच्या कारवाईनंतर, समितीचे समाधान झाल्यावर बालकाच्या सोपवणूकाची कागदपत्रे तयार करुन मातापिता किंवा पालक समितीसमोर सादर करतील.

(३) बालकास सोपविणारे मातापिता किंवा पालक यांना त्यांच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी दिला जाईल. दरम्यानच्या कालावधीत, आवश्यक त्या चौकशीनंतर समितीला योग्य वाटल्यास ते त्या बालकास त्याचे मातापिता किंवा पालक यांच्यासोबत देखरेखीखाली राहण्यास परवानगी देतील किंवा बालक सहा वर्षापेक्षा कमी वयाचे असल्यास विशेष दत्तक संस्थेकडे सोपवतील किंवा बालक सहा वर्षापेक्षा जास्त वयाचे असल्यास बाल सुधार गृहात ठेवतील.

**३६. चौकशी :–** (१) एखादे बालक हजर केले गेल्यास किंवा कलम ३१ अन्वये सादर केलेला अहवाल प्राप्त झाल्यास, समिती त्या संदर्भात ठरवून दिलेल्या पद्धतीने चौकशी करील आणि सदर समिती स्वयंस्फूर्तीने किंवा एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेकडून कलम ३१ च्या पोट कलम (२) अन्वये सादर झालेल्या अहवालानुसार सदर बालकास एखाद्या बालगृहात किंवा योग्य संस्थेकडे किंवा योग्य व्यक्तीकडे सोपविण्याबाबत आणि त्वरीत एखाद्या समाजसेवकामार्फत किंवा बाल कल्याण अधिकारी किंवा बाल कल्याण पोलीस अधिकाऱ्यांमार्फत सामाजिक चौकशी करण्याबाबत आदेश करीत.

परंतु, सहा वर्षे वयापेक्षा कमी असलेली आणि अनाथ असलेली बालके, सोपवलेली किंवा सोडून दिलेली बालके जेथे उपलब्ध असेल तेथे विशेष दत्तक संस्थेकडे सोपविली जातील.

(२) बालकाला प्रथम सोपविले गेल्यापासून चार महिन्यांच्या कालावधीत अंतिम निर्णय देता यावा म्हणून सामाजिक चौकशी १५ दिवसांच्या कालावधीत पूर्ण केली जाईल.

परंतु, अनाथ, सोडून दिलेल्या किंवा सोपविलेल्या बालकांच्या संदर्भात चौकशी पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी कलम

३८ मधील तरतुदीनुसार ठरवला जाईल.

(३) चौकशी पूर्ण झाल्यानंतर, सदर बालकास कोणतेही कुटूंब किंवा सकृतदर्शनी आधार नसल्याचे किंवा बालकास कायम देखभालीची किंवा संरक्षणाची गरज असल्यास समितीचे मत झाल्यास, आणि सदर बालक सहा वर्षापेक्षा कमी असल्यास, सदर बालकाच्या पुनर्वसनासाठी योग्य मार्ग मिळेपर्यंत सदर समिती सदर बालक वयाची १८ वर्षे पूर्ण करेपर्यंत त्यास विशेष दत्तक संस्थेकडे किंवा सुयोग्य संस्थेकडे किंवा योग्य व्यक्तीकडे सोपविण्याचा आदेश देऊ शकेल.

(४) प्रकरणांच्या निर्गतीच्या पद्धतीबाबत आणि प्रलंबित प्रकरणांबाबत बाल कल्याण समिती ठराविक मसुद्यात जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे, प्रलंबित प्रकरणांच्या पुनर्विलोकनासाठी तिमाही अहवाल सादर करील.

(५) पोट कलम (४) अन्वये पुनर्विलोकन करतांना, जिल्हा दंडाधिकारी समितीला आवश्यकता वाटल्यास प्रलंबित प्रकरणांबाबत उपाययोजनेच्या स्वरुपाची पाऊले उचलण्याबाबत सूचना देतील आणि आवश्यक असल्यास पुनर्विलोकनाचा अहवाल राज्य शासनासही सादर करतील व आवश्यकता असल्यास राज्य शासन दुसरी बाल कल्याण समिती तयार करण्याची कारवाई करील,–

मात्र, तीन महिन्यानंतरही प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत योग्य पावले उचलल्याचे न दिसल्यास, राज्य शासन सदर समिती विसर्जित करुन नवीन समिती गठित करण्याचे आदेश देईल.

(६) सदर समितीच्या विसर्जनाची शक्यता विचारात घेऊन, नवीन समिती निर्माण करण्याच्या प्रक्रियेत कालापव्यय होऊ नये म्हणून राज्य शासन, ज्यांची नवीन समितीत नेमणूक केली जाऊ शकेल, अशा लायक व्यक्तीचे एक स्थायी स्वरुपाचे मंडळ तयार ठेवेल.

(७) पोट कलम (५) अन्वये नवीन समिती निर्माण करण्यास विलंब होत असल्यास दरम्यानच्या काळात नजीकच्या जिल्ह्याची बाल कल्याण समिती कामकाजाची जबाबदारी उचलेल.

**३७. देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकाबाबत आदेश :–** (१) चौकशीअंती समितीसमोर आलेले बालक देखभाल आणि संरक्षणाची गरज असलेले बालक असल्याबाबत समितीचे समाधान झाल्यास, बाल कल्याण अधिकाऱ्यांनी सादर केलेला सामाजिक चौकशीचा अहवाल आणि सदर बालक पुरेसे विचारक्षम असल्यास बालकाची इच्छा विचारात घेऊन खालीलपैकी एक किंवा अधिक आदेश देतील, म्हणजे,

(अ) बालकास देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असल्याचे जाहीर करणे;

(ब) बाल कल्याण अधिकाऱ्यांच्या किंवा नेमणूक केलेल्या समाजसेवकाच्या देखरेखीखाली किंवा देखरेखीशिवाय बालकास माता पिता किंवा पालकांच्या ताब्यात पुन्हा सोपविणे.

(क) बालकास बालगृहात किंवा योग्य संस्थेमध्ये किंवा सदर संस्थेची सदस्य संख्या मर्यादा विचारात घेऊन आणि सदर बालकाच्या कुटूंबाचा शोध लागण्याची शक्यता नसल्याचा किंवा शोध लागला तरी त्या कुटूंबात बालकाचे पुनर्वसन बालकासाठी योग्य नसल्यास निर्णय झाल्यास विशेष दत्तक संस्थेत दीर्घ कालावधीसाठी किंवा तात्पुरत्या सुरक्षेसाठी व देखभालीसाठी ठेवणे.

(ड) सदर बालकास दीर्घ कालावधीसाठी किंवा काही काळासाठी योग्य व्यक्तीच्या अभिरक्षेत ठेवणे.

(इ) कलम ४४ अन्वये संगोपन गृहात ठेवणे.

(फ) कलम ४५ अन्वये प्रायोजकत्वाबाबत आदेश.

(ग) ज्यांच्या देखभालीत असे बालक ठेवले आहे अशा व्यक्ती किंवा संस्थेस सदर बालकाची काळजी, देखभाल, संरक्षण आणि पुनर्वसन तसेच बालकास तातडीने आवश्यक असलेला निवारा, वैद्यकीय सुविधा, मानसोपचार आणि गरजेचे समुपदेशन, व्यावसायिक उपचार, वर्तन सुधारणात्मक उपचार, व्यावसायिक कौशल्य, कायदेविषयक सहाय्य,

शैक्षणिक सुविधा आणि जिल्हा बाल सुरक्षा केंद्राच्या, राज्य शासनाच्या आणि इतर संस्थांच्या समन्वयातून इतर विकासात्मक आवश्यक कारवाई व पाठपुरावा याबाबत आदेश.

(२) बाल कल्याण समिती खालील संदर्भातही आदेश देऊ शकेल.

(एक) बालकाच्या सुरक्षा संगोपनासाठी योग्य व्यक्ती,

(दोन) या अधिनियमाच्या कलम ४६ अन्वये संगोपनोत्तर आधार देण्याबाबत.

(तीन) इतर काही बाबतीत आवश्यकता असल्यास आदेश.

**३८. सदर बालक कायदेशिरपणे दत्तक जाण्यासाठी योग्य असल्याचे जाहीर करणे :–** (१) अनाथ आणि सोडून दिलेल्य बालकाच्या बाबतीत समिती सदर बालकाचे मातापिता किंवा पालक यांना शोधण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करेल आणि चौकशीअंती जर सदर बालक अनाथ असल्याचे किंवा सोडून दिलेले असल्याचे निष्पन्न झाल्यास, सदर बालक कायदेशिररीत्या दत्तक जाण्यास योग्य असल्याचे जाहीर करेल :

परंतु, हजर केलेले बालक दोन वर्षापर्यंत वयाचे असल्यास, जाहीर करण्याचा कालावधी दोन महिन्यांपर्यंत असेल आणि दोन वर्षापेक्षा जास्त वयाच्या बालकांच्या बाबतीत सदर कालावधी चार महिन्यांचा असेल.

त्याचप्रमाणे, या संदर्भात त्यावेळी प्रभावात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद असले तरी, सोडून दिलेल्या बालकांच्या या अधिनियमाखालील चौकशीच्या दरम्यान बालकाच्या जन्मदात्या मातापित्यांविरुद्ध कोणतीही प्रथम खबर दाखल केली जाणार नाही.

(२) समितीसमोर मातापिता/पालकांनी आणून दिलेल्या बालकांच्या संदर्भात समितीने बालकास ज्या संस्थेत ठेवले असेल, त्या संस्थेकडून कलम ३५ मध्ये नमूद केलेला कालावधी समाप्त होताच सदर प्रकरण, बालकास कायदेशीरपणे दत्तक जाण्यास योग्य जाहीर करण्यासाठी समितीसमोर सादर केले जाईल.

(३) त्यावेळी प्रभावात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात काहीही नमुद असले तरी, मतीमंद मातापित्यांचे बालक किंवा लैंगिक अत्याचारातून जन्मलेले नको असलेले बालक, या अधिनियमात नमूद केलेल्या पद्धतीने दत्तक जाण्यास योग्य असल्याचे जाहीर केले जाईल.

(४) अनाथ, सोडून दिलेले किंवा हजर केलेले बालक कायदेशीररीत्या दत्तक जाण्यास योग्य असल्याचा निर्णय समितीमधील किमान तीन सदस्य घेतील.

(५) समिती राज्य पातळीवरील अधिकाऱ्यांना आणि विभागाला किती बालकांना कायदेशीररीत्या दत्तक जाण्यास योग्य असल्याचे जाहीर केले गेले आहे आणि किती प्रकरणे प्रलंबित आहेत, त्याबाबत मासिक अहवाल सादर करेल.

***

## प्रकरण सात

## पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्एकात्मीकरण

**३९. पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्एकात्मीकरणाची कार्यपद्धती :–** (१) प्रत्येक बालकाच्या व्यक्तीगत संगोपन योजनेनुसार सदर बालकाच्या पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्एकात्मीकरणाचे काम या अधिनियमान्वये केले जाईल. सदर पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्एकात्मीकरण काम आवश्यकतेनुसार देखरेखीखाली किंवा देखरेखीशिवाय कुटूंबात किंवा पालकांच्या ताब्यात देऊन किंवा संगोपनगृहात किंवा दत्तक देऊन करण्याचा प्रयत्न केला जाईल.

परंतु, असे प्रयत्न करताना भावंडांना दूर ठेवणे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने योग्य असल्याच्या परिस्थितीशिवाय अन्यथा संगोपनगृहात किंवा संस्थेत एकत्र ठेवून करण्याचा प्रयत्न केला जाईल.

(२) कायद्याच्या विरोधात गेलेल्या बालकांच्या बाबतीत पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्एकात्मीकरणाचे काम निरीक्षणगृहात केले जाईल. जर सदर बालकास जामिनावर मुक्त केले न गेल्यास किंवा विशेष संस्थेत किंवा योग्य संस्थेत किंवा योग्य व्यक्तीच्या ताब्यात या आदेशानुसार सदर प्रयत्न केले जातील.

(३) देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेले बालकास कोणत्याही कारणाने कुटूंबात ठेवलेले नसल्यास, या अधिनियमान्वये नोंदणीकृत संस्थेत किंवा योग्य व्यक्ती किंवा योग्य संस्थेत तात्पुरते किंवा दीर्घ काळासाठी ठेवले जाईल व अशा ठिकाणी त्या बालकाच्या पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्एकात्मीकरणाचे प्रयत्न केले जातील.

(४) देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेले बालक जेव्हा, वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्याने काळजीवाहू संस्था सोडत असेल किंवा कायद्याच्या विरोधात गेलेले बालक विशेष गृह किंवा सुरक्षेचे ठिकाण सोडत असेल तेव्हा त्या बालकास कलम ४६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे समाजाच्या मूळ प्रवाहात सामील होण्यासाठी सहाय्यक होईल आर्थिक स्थैर्य दिले जाईल.

**४०. देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकाची पुन:स्थापना :–** (१) बालकाची सामाजिक पुन:स्थापना हे प्रत्येक बाल सुधारगृह, विशेष दत्तक संस्था किंवा मुक्त आश्रयस्थानाचे मुख्य उद्दिष्ट असेल.

(२) सर्व बाल सुधारगृह, विशेष दत्तक संस्था, मुळ आश्रयस्थान, कौटूंबिक वातावरणास वंचित झालेल्या बालकास तात्पुरते किंवा दीर्घकाळासाठी कौटूंबिक वातावरणात ठेवण्याचा प्रयत्न करतील.

(३) देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकास, त्याचे मातापिता, पालक किंवा योग्य व्यक्ती यांच्या योग्यतेची खात्री केल्यानंतर त्यांच्या ताब्यात बालकास सोपविण्याचे आणि त्यांना आवश्यक सूचना देण्याचे अधिकार समितीस आहेत.

**स्पष्टीकरण :–** या कलमासाठी बालकाचे पुनर्स्थापन आणि संरक्षण म्हणजे, सदर बालकास

(अ) मातापिता,

(ब) दत्तक मातापिता,

(क) उसने मातापिता,

(ड) पालक, किंवा

(इ) सुयोग्य व्यक्ती, यांच्या जवळ सोपविणे.

**४१. बाल संगोपन संस्थेची नोंदणी :–** (१) त्यावेळी प्रभावात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद असले तरी, संगोपन आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या किंवा कायद्याच्या विरोधात गेलेल्या बालकांची निवासी व्यवस्था हे मुख्य किंवा दुय्यम उद्दिष्ट असलेल्या सर्व संस्था – ज्यामध्ये राज्य शासनाने स्थापन केलेल्या तसेच खाजगी आणि अशासकीय स्वयंसेवी संघटनांनी स्थापन केलेल्या संस्थांची या अधिनियमान्वये नोंदणी, हा अधिनियम प्रभावात आल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीत केली जाईल. सदर संस्थांना राज्य शासन किंवा केंद्रीय शासनाकडून अनुदान मिळत असले तरीही सदर नोंदणीची अट बंधनकारक आहे.

परंतु, ज्या संस्थांनी हा अधिनियम प्रभावात येण्याच्या तारखेस बाल न्याय (बालकांची देखभाल आणि संरक्षण) अधिनियम, २००० अन्वये वैध नोंदणी केलेली असेल त्यांनी या अधिनियमान्वये नोंदणी केलेली असल्याचे समजले जाईल.

(२) या कलमान्वये नोंदणी करतांना, राज्य शासन प्रत्येक संस्थेची मर्यादा आणि उद्देश ठरवून सदर संस्थेची बाल सुधारगृह किंवा मुक्त आश्रयकेंद्र किंवा विशेष दत्तक संस्था किंवा विशेष गृह किंवा सुरक्षा गृह, अशी नोंद करेल.

(३) पोट–कलम (१) अन्वये, सध्या कार्यरत असलेल्या किंवा नव्याने कार्यान्वित होणाऱ्या, देखभाल आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या किंवा कायद्याच्या विरुद्ध गेलेल्या बालकांच्या निवासी संस्थेच्या नोंदणीचा अर्ज प्राप्त झाल्यावर राज्य शासन अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्यात व जास्तीत जास्त सहा महिन्यांच्या कालावधीत सदर संस्था या अधिनियमाच्या कक्षेत येण्यासाठी संस्थेची मर्यादा ठरवून तशी नोंद नोंदणीच्या कागदपत्रात करेल.

परंतु, जर त्या संस्थेनी नोंदणीच्या अटींची पूर्तता पोट–कलम (१) मध्ये नमूद कालमर्यादेत न केल्यास, तात्पुरती नोंदणी रद्द

होईल आणि सदर संस्थेला पोट–कलम (५) च्या तरतूदी लागू होतील.

(४) नोंदणी अर्ज दाखल केल्यापासून एक महिन्याच्या आत राज्य शासनाने तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र न दिल्यास, सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत सदर संस्था चालविण्यासाठी, अर्ज स्वीकारल्याची पावती हीच तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र समजले जाईल.

(५) संस्थेच्या नोंदणीकरिता केलेल्या अर्जावर सहा महिन्यांच्या कालावधीत कारवाई न झाल्यास, राज्य शासनाच्या संबंधित अधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्यांनी कर्तव्यात हयगय केली असल्याचे समजले जाईल व त्यांच्या वरिष्ठांकडून त्या अधिकाऱ्यांविरुद्ध खातेनिहाय कारवाई सुरु केली जाईल.

(६) कोणत्याही संस्थेच्या नोंदणीचा कालावधी पाच वर्षाचा असेल आणि दर पाच वर्षांनी नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक असेल.

(७) एखाद्या संस्थेनीकलम ५३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे बालकाचे पुनर्वसन किंवा सामाजात पुन:स्थापन सेवा राबविली नाही तर राज्य शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीची पूर्तता करुन राज्य शासन सदर संस्थेची नोंदणी रद्द किंवा स्थगित करु शकेल. सदर संस्थेच्या नोंदणीच्या नूतनीकरणाच्या दिनांकापर्यंत सदर संस्था राज्य शासनाकडून चालविली जाईल.

(८) या कलमान्वये नोंदणी झालेल्या बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थेवर संस्थेच्या सदस्यसंख्येच्या मर्यादेच्या अधीन राहून, समितीच्या आदेशानुसार बालकांना दाखल करुन घेणे बंधनकारक असेल. सदर संस्थेला केंद्र शासनाकडून किंवा राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होते किंवा नाही याचा सदर निर्णयावर कोणताही परिणाम होणार नाही.

(९) त्यावेळी प्रभावात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद असले तरी, कलम ५४ अन्वये नेमण्यात आलेल्या तपासणी, बालकांसाठी निवास व्यवस्था असणाऱ्या कोणत्याही संस्थेची तेथे देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांची निवासाची सोय केली जात आहे याबाबत, ती संस्था या अधिनियमान्वये नोंदणीकृत नसली तरी, तपासणी करण्याचे अधिकार आहेत.

**४२. बाल कल्याण संस्थेची नोंदणी न करण्याबाबत शिक्षा :–** देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांच्या आणि कायद्यविरुद्ध गेलेल्या बालकांच्या निवासाची व्यवस्था करणाऱ्या संस्थेचे प्रभारी असलेल्या व्यक्तीने किंवा व्यक्तीने कलम ४१ च्या पोट–कलम (१) ची पूर्तता केलेली नसल्यास त्यांना एक वर्षापर्यंत कैद किंवा रुपये एक लाखापेक्षा कमी नाही एवढा दंड किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतील :

परंतु, नोंदणी न केलेल्या कालावधीतील प्रत्येक महिन्याचा कालखंड हा स्वतंत्र अपराध समजला जाईल.

**४३. मुक्त आश्रयस्थान (शेल्टर) :–** (१) राज्य शासन आवश्यकतेनुसार स्वत: किंवा स्वयंसेवी आणि सेवाभावी अशासकीय संस्थांमार्फत आवश्यक तेवढी मुक्त आश्रयस्थाने निर्माण करील आणि सदर मुक्त आश्रयस्थानांची नोंदणी ठरवून दिलेल्या क्रियारीतीप्रमाणे केली जाईल.

(२) पोट–कलम (१) मध्ये उल्लेख केलेली मुक्त आश्रयस्थाने निवाऱ्याची आवश्यकता असलेल्या बालकांसाठी सामाजिक संस्थेप्रमाणे बालकांचे गैरव्यवहारांपासून संरक्षण करणे आणि त्यांना आश्रय देणे किंवा रस्त्यावरील आयुष्यापासून दूर ठेवणे, या उद्देशाने तात्पुरत्या स्वरुपात कार्य करतील.

(३) सदर मुक्त आश्रयस्थाने, ठरवून दिलेल्या पद्धतीने, जिल्हा बाल संरक्ष केंद्राला आणि बाल कल्याण समितीला, किती बालकांनी सदर सेवेचा लाभ घेतला याबाबत मासिक अहवाल सादर करतील.

**४४. उसने संगोपन (फॉस्टर केअर) :–** (१) संगोपन आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांना उसन्या संगोपनासाठी व सामुदायिक उसन्या संगोपनासाठी ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीची अंमलबजावणी करुन बाल कल्याण समितीच्या सूचनेप्रमाणे जन्मदाते माता–पिता किंवा पालक ज्या कुटूंबाचा भाग नाहीत अशा कुटूंबात किंवा सर्वस्वी भिन्न मात्र उसन्या संगोपनास राज्य शासनाकडून योग्य ठरविलेल्या कुटूंबात काही काळासाठी किंवा दीर्घ काळासाठी ठेवता येईल.

(२) उसन्या संगोपनासाठीच्या कुटूंबाची निवड कुटूंबाची क्षमता, हेतू, मर्यादा आणि बालकांच्या संगोपनाचा पूर्वानुभव यावरुन केली जाईल.

(३) त्यांच्या भल्यासाठी विभक्त ठेवण्याची आवश्यकता नसल्यास भावंडांना शक्यतोवर एकाच कुटूंबात उसन्या संगोपनासाठी ठेवले जाईल.

(४) राज्य शासन, ठराविक कार्यपद्धतीनुसार बालकाच्या योग्य संगोपनासाठी आवश्यक तपासणीची तजवीज करुन संगोपनासाठी दिलेल्या बालकांची संख्या विचारात घेऊन जिल्हा बाल संरक्षण केंद्रामार्फत मासिक तत्त्वावर निधी पुरवेल.

(५) ज्या प्रकरणात बालकाचे माता–पिता बालकाचे संगोपन करण्यास अपात्र किंवा असमर्थ असतील, असल्याचे बाल कल्याण समितीस आढळले असेल म्हणून बालकास उसन्या संगोपनात ठेवलेले असेल त्या प्रकरणात समितीला अशा भेटी बालकाच्या दृष्टीने योग्य नाहीत, असे वाटत नाहीत, असे वाट नसल्यास बालकाचे माता–पिता बालकाला उसन्या संगोपनाच्या ठिकाणी जाऊन नियमितपणे भेटू शकतील. जर अशा भेटी बालकाच्या दृष्टीने योग्य नाहीत असे समितीचे मत असल्यास त्याबाबत कारणांसह लेखी स्वरुपात नोंद केली पाहिजे आणि जेव्हा माता–पिता बालकाचे योग्यरित्या संगोपन करु शकतील असे समितीला आढळल्यास त्यावेळी उसन्या संगोपनावरुन बालक माता–पित्यांकडे परतू शकेल.

(६) उसन्या संगोपनातील कुटूंबावर बालकाच्या शिक्षण, आरोग्य आणि पालनपोषणाची जबाबदारी असेल आणि सदर उसने कुटूंब बालकाच्या संगोपनाची दिलेल्या सूचनांप्रमाणे काळजी घेईल.

(७) बालकांना कोणत्या पद्धतीने उसने संगोपन पुरविले जाईल याची क्रियारीती, पात्रता, निकष आणि पद्धत ठरविण्यासाठी राज्य शासन नियमावली तयार करु शकेल.

(८) समिती ठराविक पद्धतीने, उसन्या संगोपनात दिलेल्या बालकांच्या संगोपनाबाबत दरमहा उसन्या कुटूंबाची तपासणी करील. जर बालकाच्या संगोपनात काही कमतरता आढळल्यास बालकास सदर उसन्या कुटूंबातून काढून घेऊन दुसऱ्या कुटूंबात पाठविले जाईल.

(९) दत्तक देण्यास योग्य असलेल्या कोणत्याही बालकास दीर्घ काळासाठी उसन्या संगोपनात दिले जाणार नाही.

**४५. प्रायोजकता :–** (१) व्यक्तिगत बालकांचे – व्यक्तिगत प्रायोजकत्व, सामूहिक प्रायोजकत्व अशा बालकांच्या विविध प्रकारचे प्रायोजकत्व स्विकारण्याच्या योजनांबाबत राज्य शासन आवश्यक नियम तयार करील.

(२) बालकांच्या प्रायोजकत्वाच्या निकषांमध्ये खालील निकषांचा समावेश असेल.

(एक) जेथे माता विधवा, घटस्फोटित किंवा परित्यक्ता महिला असेल.

(दोन) जेथे मुले अनाथ असतील व दूरच्या नातेवाईकांच्या आश्रयाला असतील.

(तीन) जेथे माता–पित्यांना जीवघेणा दुर्धर आजार असेल.

(चार) जेथे माता–पिता अपघातामुळे अपंग झालेले असतील आणि शारीरिक व आर्थिकदृष्ट्या बालकांचे संगोपन करण्यास असमर्थ असतील.

(३) प्रायोजकत्वाचा कालावधी ठरवून दिल्याप्रमाणे असेल.

(४) प्रायोजकत्व योजनांच्या अंतर्गत कुटूंबांना, बालकगृहांना, विशेष आश्रयगृहांना, बालकांच्या वैद्यकीय, आहार, शैक्षणिक आणि इतर गरजा पूर्ण करण्यासाठी व बालकांचा जीवनदर्जा सुधारण्याच्या दृष्टीने अतिरिक्त आधार दिला जाऊ शकेल.

**४६. बाल संगोपनगृह सोडणाऱ्या बालकांच्या मदतीचा पाठपुरावा :–** वयाची १८ वर्षे पूर्ण केल्याने बाल संगोपन गृह सोडणाऱ्या कोणत्याही बालकास, समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे आर्थिक सहाय्य केले जाईल.

**४७. निरीक्षण गृहे :–** (१) राज्य शासन, प्रत्येक जिल्ह्यात किंवा जिल्ह्यांच्या समूहात, शासनामार्फत किंवा स्वयंसेवी, अशासकीय सेवाभावी संघटनांमार्फत बाल निरीक्षण गृहांची निर्मिती व व्यवस्थापन करील. कायद्याविरुद्ध गेलेल्या बालकांचा, त्यांच्या प्रकरणातील या अधिनियमाखालील चौकशीसाठी प्रलंबित असतांन तात्पुरता स्वीकार, संगोपन आणि पुनर्वसनासाठी सदर निरीक्षण गृहे या अधिनियामाच्या कलम ४१ अन्वये नोंदणीकृत असतील.

(२) जेव्हा राज्य शासनास, वर नमूद उपकलम १ अन्वये स्थापन झालेल्या किंवा वापरात असलेल्या संस्थेव्यतिरिक्त इतर संस्था, कायद्याविरुद्ध गेलेल्या बालकाबाबत या अधिनियमान्वये चौकशी सुरु असतांना, तात्पुरते स्वीकृती गृहे म्हणून योग्य वाटेल, तेव्हा राज्य शासन सदर संस्थेची या अधिनियमान्वये निरीक्षणगृह म्हणून नोंदणी करु शकेल.

(३) या अधिनियमान्वये नियम तयार करुन राज्य शासन निरीक्षण गृहांचे व्यवस्थापन आणि नियंत्रण ज्यामध्ये कायद्याविरुद्ध गेल्याचा संशय असलेल्या बालकाचे पुनर्वसन व सामाजिक एकजीवीकरण यासाठी किमान उपलब्ध सेवा आणि सेवांचे प्रकार आणि कोणत्या परिस्थितीत निरीक्षणगृहाची नोंदणी स्वीकृत होईल किंवा रद्द होईल याबाबत नियमावली करेल.

(४) कायद्याविरुद्ध गेल्याचा संशय असलेल्या बालकास त्याचे माता–पिता किंवा पालक यांचे ताब्यात न ठेवता निरीक्षण गृहात ठेवलेले असल्यास अशा सर्व बालकांची त्यांचेवर असलेले आरोप आणि त्यांची शारीरिक व मानसिक अवस्था विचारात घेऊन वय आणि लिंग यानुसार वर्गवारी केली जाईल.

**४८. विशेष गृहे :–** (१) राज्य शासन, प्रत्येक जिल्ह्यात किंवा जिल्ह्यांच्या समूहात, शासनामार्फत किंवा स्वयंसेवी, अशासकीय सेवाभावी संघटनांमार्फत आवश्यकतेनुसार, कायद्याविरुद्ध गेल्याचा संशय असलेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठी बाल न्याय मंडळाने कलम १८ अन्वये दिलेल्या आदेशानुसार ठेवण्यासाठी विशेष गृहांची निर्मिती व व्यवस्थापन करील.

(२) अशा विशेष गृहांचे व्यवस्थापन आणि नियंत्रण तसेच तेथे बालकाच्या सामाजिक एकजीवीकरणासाठी आवश्यक उपलब्ध सेवांचे प्रकार आणि सर्वसामान्य निकष तसेच कोणत्या पद्धतीने नोंदणी मंजूर केली जाईल किंवा रद्द केली जाईल, याबाबत राज्य शासन नियम ठरवून देईल.

(३) पोट–कलम (२) मध्ये नमूद केलेले नियम करताना, सर्व बालकांची त्यांचेवर असलेले आरोप आणि त्यांची शारीरिक व मानसिक अवस्था विचारात घेऊन वय आणि लिंग यानुसार वर्गवारी आणि विभागणी करण्याबाबत नियम करतील.

**४९. सुरक्षा गृह :–** (१) राज्य शासन, प्रत्येक राज्यात या अधिनियमातील कलम ४१ अन्वये, १८ वर्षावरील व्यक्ती किंवा १६ ते १८ वर्षे वयाच्या दरम्याने असलेल्या कायद्याविरुद्ध गेलेल्या आणि निर्घृण स्वरुपाच्या अपराधाचा आरोप किंवा दोषसिद्धी असलेल्या बालकासाठी किमान एक सुरक्षागृह स्थापन करील.

(२) चौकशी सुरु असलेल्या अशा व्यक्ती किंवा बालके आणि अशा आरोपासाठी दोषसिद्धी असलेल्या व्यक्ती किंवा बालकांच्या वास्तव्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असेल.

(३) राज्य शासन, नियम करुन उपकलम १ मधील सुरक्षा गृह कसे असावे आणि तेथे कोणत्या सेवा आणि सुविधा उपलब्ध असतील हे ठरवून देईल.

**५०. बाल गृह :–** (१) राज्य शासन, प्रत्येक जिल्ह्यात किंवा जिल्ह्यांच्या समूहात, शासनामार्फत किंवा स्वयंसेवी, अशासकीय सेवाभावी संघटनांमार्फत आवश्यकतेनुसार, निवारा, देखभाल आणि संरक्षण, उपचार, शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन आणि विकासाची आवश्यकता असलेल्या बालकांना वास्तव्यास ठेवण्यासाठी बाल गृह निर्माण करील आणि त्याची नोंदणी करील.

(२) राज्य शासन, विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी आवश्यकतेनुसार विशेष सेवा पुरविणारे बाल गृह ठरवून देईल.

(३) राज्य शासन, नियम करुन बाल गृहाचे व्यवस्थापन आणि नियंत्रण कसे असावे आणि तेथे कोणत्या सेवा आणि सदर सेवांचे निकष बालकांच्या व्यक्तिगत संगोपन योजनांप्रमाणे कसे असतील हे ठरवून देईल.

**५१. योग्य ठिकाण :–** (१) शासकीय किंवा स्वयंसेवी, अशासकीय सेवाभावी संघटनेमार्फत त्यावेळी प्रभावात असणाऱ्या

कोणत्याही अधिनियमाद्वारे नोंदणीकृत अस्थापना तात्पुरत्या स्वरुपात बालकची ठरवून दिलेल्या पद्धतीने जबाबदारी घेण्यास योग्य असल्याबाबत, आवश्यक त्या चौकशीनंतर मंडळ किंवा समिती ठरवील.

(२) एखाद्या आस्थापनेस, पोट–कलम (१) अन्वये दिलेली मान्यता, त्यासाठीची कारणे लेखी स्वरुपात नोंदवून मंडळ किंवा समिती रद्द करु शकेल.

**५२. सुयोग्य व्यक्ती :–** (१) एखाद्या व्यक्तीच्या पात्रतेबाबत आवश्यक त्या चौकशीनंतर सदर व्यक्ती तात्पुरत्या स्वरुपात बालकाच्या संगोपन, संरक्षण आणि उपचारासाठी ठराविक कालावधीसाठी स्वीकारण्यास सुयोग्य असल्याबाबत मंडळ किंवा समिती ठरवून दिलेल्या पद्धतीने मान्यता देतील.

(२) एखाद्या व्यक्तीस पोट–कलम (१) अन्वये दिलेली मान्यता, त्यासाठीची कारणे लेखी स्वरुपात नोंदवून मंडळ किंवा समिती रद्द करु शकेल.

**५३. या अधिनियमान्वये नोंदणीकृत संस्थेमध्ये पुरविल्या जाणाऱ्या बालकाचे पुनर्वसन आणि सामाजिक एकजीवीकरणासंबंधी सेवा व त्यांचे व्यवस्थापन :–** (१) या अधिनियमान्वये बालकाच्या पुनर्वसन आणि सामाजिक एकजीवीकरणासाठी, या अधिनियमान्वये नोंदविल्या गेलेल्या संस्थांमध्ये ठरावीक पद्धतीने पुरविल्या जाणाऱ्या सेवांमध्ये खालील सेवा अंतर्भूत असतील.

(एक) ठरवून दिलेल्या दर्जाच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय मूलभूत गरजा.

(दोन) विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी व्हिल चेअर, विकलांग आधार साहित्य, श्रवणयंत्र, ब्रेल लिपी संच आणि इतर कोणतेही आवश्यक साहित्य व अवजारे.

(तीन) विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी योग्य शिक्षण, त्यात पूरक शिक्षक, विशेष शिक्षण यांचाही समावेश असेल.

मात्र, सहा ते चौदा वर्षांमधील वयाच्या बालकांसाठी, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतुदी लागू होतील.

(चार) कौशल्य विकास.

(पाच) व्यावसायिक उपचार आणि जीवन कौशल्य शिक्षण.

(सहा) बालकाच्या गरजेनुसार समुपदेशन आणि आवश्यक मानसिक आरोग्य हस्तक्षेप.

(सात) खेळाचे साहित्य आणि खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम.

(आठ) आवश्यकतेनुसार कायदेविषयक साहाय्य.

(नऊ) शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण, आवश्यकतेनुसार व्यसनमुक्ती आणि रोगांवरील उपचार.

(दहा) व्यक्तिगत संगोपन योजनेसारखे आवश्यक व्यक्तिगत व्यवस्थापन.

(अकरा) जन्म नोंदणी.

(बारा) ओळखपत्रासाठी आवश्यक नोंदी करण्यासाठी सहाय्य.

(तेरा) बालकाच्या कल्याणासाठी आवश्यक असलेल्या व सामान्यरीत्या परस्पर राज्य शासन, नोंदणीकृत किंवा योग्य व्यक्ती किंवा संस्था किंवा संपर्क सेवा यांच्यामार्फत पुरवल्या जातील अशा सेवा.

(२) प्रत्येक संस्थेमध्ये, संस्थेच्या व्यवस्थापनासाठी व प्रत्येक बालकाच्या प्रगतीवर देखरेख करण्यासाठी ठरवून दिलेल्या पद्धतीने नेमलेली एक व्यवस्थापन समिती असेल.

(३) सहा वर्षावरील बालकांची निवासी व्यवस्था असलेल्या संस्थेचे प्रभारी अधिकारी, संस्थेमार्फत बालकांचे कल्याण आणि सुरक्षितता यामध्ये सहभाग घेण्यासाठी ठरवून दिलेल्या पद्धतीने एक बाल समिती निर्माण करतील.

**५४. या अधिनियमान्वये नोंदलेल्या संस्थांची तपासणी :–** (१) या अधिनियमान्वये नोंदविण्यात आलेल्या किंवा सुयोग्य संस्था म्हणून मान्यता मिळालेल्य सर्व संस्थांची तपासणी करण्यासाठी परिस्थितीनुरुप राज्यासाठी किंवा जिल्ह्यासाठी तपासणी समिती राज्य शासन तयार करील.

(२) नेमून दिलेल्या परिसरात असलेल्या व बालकांच्या निवासी व्यवस्था असलेल्या संस्थेस सदर समितीच्या किमान एक महिला सदस्य आणि एक वैद्यकीय अधिकारी असलेले किमान तीन सदस्यांचे पथक, किमान तीन महिन्यातून एकदा सक्तीने भेट देतील व आवश्यक तपासणी करतील आणि तपासणीचा अहवाल, भेटीनंतर एक सप्ताहात आवश्यकतेनुसार जिल्हा बाल संरक्षण केंद्र किंवा राज्य शासनास पुढील कारवाईसाठी सादर करतील.

(३) निरीक्षण समितीने, निरीक्षणानंतर एक आठवड्याच्या आत सादर केलेल्या अहवालानंतर, एक महिन्याच्या आत जिल्हा बाल संरक्षण केंद्र किंवा राज्य शासन आवश्यक ती कारवाई करेल आणि अनुपालन अहवाल राज्य शासनास सादर केला जाईल.

**५५. आस्थापना व व्यवस्थापनांच्या कामकाजाचे मूल्यमापन :–** (१) केंद्र शासन किंवा राज्य शासन स्वतंत्रपणे या अधिनियमान्वये नोंदलेली मंडळे, समित्या, विशेष बाल पोलीस केंद्रे, नोंदणीकृत संस्था, सुयोग्य संस्था किंवा व्यक्ती म्हणून मान्यताप्राप्त संस्था किंवा व्यक्ती शासनाने ठरवून दिलेल्या पद्धतीने, कालावधीत आणि व्यक्तीमार्फत कामकाजाचे मूल्यमापन करतील.

(२) जर केंद्र शासन व राज्य शासनाने अशा प्रकारचे मूल्यमापन स्वतंत्रपणे केलेले असेल तर केंद्र शासनाचा मूल्यमापन अहवाल बंधनकारक असेल.

***

## प्रकरण आठवे

## दत्तकविधान

**५६. दत्तक देणे :–** (१) अनाथ, सोडून दिलेल्या किंवा जमा केलेल्या बालकंचा कुटूंबाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी हा अधिनियम व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमावलीच्या आणि दत्तकविधान नियंत्रण नियमाच्या अधीन राहून दत्तकविधानाची कारवाई होईल.

(२) कोणत्याही धर्माच्या एका व्यक्तीचे मूल दुसऱ्या नातेवाईकांनी दत्तक घेण्याची कारवाई, या अधिनियमातील तरतूदी आणि दत्तकविधान नियंत्रण नियमावलीनुसार होईल.

(३) या अधिनियमातीन तरतुदी, हिंदी दत्तक आणि निर्वाह अधिनियम, १९५६ अन्वये झालेल्या बालकांच्या दत्तकविधानास लागू होणार नाहीत.

(४) देशांतर्गत झालेल्या सर्व दत्तकविधानास या अधिनियमातील तरतुदी आणि दत्तकविधान नियंत्रण नियमावली लागू होईल.

(५) कोणतीही व्यक्ती जी, न्यायालयाच्या आवश्यक आदेशाशिवाय, परदेशातून बालकास आणते किंवा बालकास परदेशात पाठविते किंवा परदेशातील व्यक्तीकडे बालकाचे संगोपन व ताबा सोपविण्याच्या प्रक्रियेत सहभागी होते ती व्यक्ती या अधिनियमाच्या कलम ८० अन्वये शिक्षेस पात्र ठरेल.

**५७. दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या माता–पित्यांची पात्रता :–** (१) बालकास दत्तक घेऊ इच्छिणारे माता–पिता शारीरिक, आर्थिक आणि मानसिक दृष्टीने सक्षम आणि बालकाचा चांगला विकार करण्याची प्रबळ इच्छा असलेले असावेत.

(२) दत्तक घेऊ इच्छिणाऱ्यास जोडप्यास, दत्तक घेण्याची दोघांचीही मान्यता असणे आवश्यक असेन.

(३) एकटी किंवा घटस्फोटित व्यक्ती ही, दत्तकासाठी आवश्यक निकषांवर आणि दत्तकविधान नियंत्रण नियमाच्या आधारे योग्य असल्यास बालकास दत्तक घेऊ शकेल.

(४) एकट्या पुरुष व्यक्तीस मुलगी दत्तक घेता येणार नाही.

(५) दत्तकविधान नियंत्रण प्राधिकरणाने तयार केलेल्या नियमाच्या आधारे योग्य.

**५८. भारतात राहणाऱ्या आणि बालकास दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या माता–पित्यांसाठी दत्तकाची कार्यपद्धती :–**

(१) भारतात राहणाऱ्या, बालकस दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही धर्माच्या भारतीय मातापित्यांस जर अनाथ, सोडून दिलेले किंवा ताब्यात दिलेले बालक दत्तक घ्यावयाचे असल्यास, त्यांनी विशेष दत्तकविधान संस्थेकडे दत्तकविधान नियंत्रण नियमावलीनुसार विनंती अर्ज सादर करावा.

(२) विशेष दत्तकविधान संस्था, बालकास दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या माता–पित्यांचा गृह निरीक्षण अहवाल तयार करील व दत्तक घेण्यास लायक आढळल्यास, दत्तक जाण्यास योग्य ठरविलेल्या बालकाचा, बालक निरीक्षक अहवाल व वैद्यकीय अहवाल दत्तकविधान नियंत्रण नियमावलीनुसार विचारात घेतील.

(३) बालकास दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या माता–पित्यांनी दत्तक घ्यावयाचे बालक, त्या बालकाचा बालक निरीक्षण अहवाल आणि वैद्यकीय अहवालास स्वीकृती दिल्यावर, सदर दत्तकविधान संस्था सदर बालकास सदर प्रस्तावित माता–पित्यांकडे दत्तकपूर्वक उसन्या पालकत्वात सोपवील व न्यायालयात दत्तकविधान मंजुरी आदेशासाठी दत्तकविधान नियंत्रण नियमावलीनुसार अर्ज सादर करील.

(४) न्यायालयाच्या आदेशाची प्रमाणित प्रत प्राप्त झाल्यावर, विशेष दत्तकविधान नियंत्रण संस्था सदर प्रत प्रस्तावित माता–पित्यांकडे पाठवील.

(५) दत्तक नियंत्रण नियमावलीतील नमूद केल्याप्रमाणे दत्तक बालकाचे, दत्तक घरातील कल्याण आणि प्रगती यांचा पाठपुरावा केला जाईल.

**५९. अनाथ, सोडलेल्या किंवा ताब्यात दिलेल्या बालकाच्या आंतरराष्ट्रीय दत्तकविधानाची क्रियारीती :–** (१) बालक दत्तक देण्यास योग्य असल्याचे जाहीर झाल्यानंतर साठ दिवसांच्या आत जर, विशेष दत्तकविधान संस्था आणि राज्य संस्थेच्या संयुक्त प्रयत्नानंतरही भारतीय किंवा अनिवासी भारतीय माता–पित्यांना दत्तक देता न आल्यास, सदर बालक आंतरराष्ट्रीय दत्तकविधानास मुक्त हेईल.

मात्र, मानसिक किंवा शारीरिक विकलांगता असलेले बालक, भावंडे किंवा पाच वर्षापेक्षा जास्त वयाची मुले यांना प्राधान्याने दत्तकविधान नियंत्रण नियमावलीनुसार आंतरराष्ट्रीय दत्तकविधानासाठी दिले जाईल.

(२) भारतीय बालकांच्या आंतरराष्ट्रीय दत्तकविधानासाठी, अनिवासी भारतीय किंवा परदेशस्थ भारतीय किंवा भारतीय वंशाच्या व्यक्तींना प्राधान्य दिले जाईल.

(३) कोणत्याही धर्माच्या अनिवासी भारतीय किंवा परदेशस्थ भारतीय किंवा भारतीय वंशाच्या प्रस्तावित व्यक्तीस भारतातील अनाथ, सोडून दिलेले किंवा ताब्यात दिलेले बालक दत्तक घेण्याची इच्छा असल्यास ते परदेशी दत्तकविधान संस्था किंवा केंद्रीय अधिकारी किंवा त्यांचे वास्तव्य असलेल्या देशातील संबंधित शासकीय कार्यालयाशी संपर्क साधून दत्तकविधान नियंत्रण संस्थेने घालून दिलेल्या नियमानुसार कारवाई करतील.

(४) परिस्थितीनुरुप अधिकृत परदेशी दत्तकविधान संस्था किंवा केंद्रीय अधिकारी किंवा संबंधित शासकीय संस्था, त्या प्रस्तावित दत्तक माता–पित्यांचा गृह निरीक्षण अहवाल तयार करतील व ते पात्र असल्याचे आढळल्यास, त्यांच्या अर्जाची भारतीय दत्तकविधान संस्थेकडे नियंत्रण संस्थेने घालून दिलेल्या नियमानुसार दत्तक देण्याबाबत शिफारस करतील.

(५) अशा दत्तकास उत्सुक माता–पित्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर दत्तक नियंत्रण संस्था सदर अर्जाची तपासणी करतील व सदर अर्ज पात्र असल्याबाबत आढळल्यास सदर अर्ज विशेष दत्तक देण्यास योग्य असलेली बालके ज्यांचेकडे असतात अशा दत्तक नियंत्रण संस्थेकडे पाठवतील.

(६) सदर विशेष दत्तक विधान संस्था उत्सुक माता–पित्यांच्या तपशिलाबरोबर योग्य बालकाचा तपशील जुळवून, बालकाचा बालक निरीक्षण अहवाल आणि वैद्यकीय अहवाल बालकासोबत उत्सुक माता–पित्यांकडे पाठवतील, त्यांना मान्य असल्यास ते सदर

अहवाल स्वीकृतीसह संस्थेकडे परत पाठवतील.

(७) दत्तकास उत्सुक मातापित्यांकडून सदर बालकाची स्वीकृती कळविल्यानंतर सदर विशेष दत्तकविधान संस्था न्यायालयाकडे दत्तक आदेशासाठी नियमानुसार अर्ज सादर करतील.

(८) न्यायालयाकडून दत्तकाबाबत प्रमाणित आदेश प्राप्त झाल्यावर सदर दत्तक नियंत्रण संस्था सदर आदेश संबंधित अधिकारी, राज्य संस्था आणि उत्सुक माता–पित्यांकडे पाठवतील व बालकासाठी पारपत्र मिळवतील.

(९) अधिकारी सदर बालकाच्या दत्तकविधानाबाबत भारताच्या व ज्या देशात बालक जाणार आहे त्या देशाच्या देशांतरण (इमिग्रेशन) अधिकाऱ्यांना कळवतील.

(१०) बालकास पारपत्र आणि व्हिसा मिळाल्यावर दत्तकास उत्सुक माता–पिता, विशेष दत्तकविधान संस्थेकडून बालकास व्यक्तिश: ताब्यात घेतील.

(११) अधिकृत विदेशी बालक दत्तकविधान संस्था, किंवा केंद्रीय प्राधिकरण किंवा संबंधित शासकीय विभागावर परिस्थितीनुरुप, दत्तक माता–पित्यांकडील बालकाचा प्रगती अहवाल सादर करण्यास बंधनकारक असेल. जर काही अडचणी निर्माण झाल्यास सदर विदेशी बालक दत्तकविधान संस्था प्राधिकरण आणि संबंधित भारतीय राजनैतिक दूतावासाच्या सल्ल्याने दत्तक नियंत्रण नियमावलीच्या अधीन राहून पर्यायी व्यवस्था.

(१२) परदेशी व्यक्ती किंवा भारतीय वंशाची व्यक्ती किंवा परेदशस्थ भारतीय नागरिक जे वारंवार भारतात वास्तव्यास असतात ते बालक दत्तक घेण्यास उत्सुक असल्यास, त्यासाठी त्यांचे वास्तव्य असलेल्या देशाच्या वकिलातीतून प्राप्त केलेल्या ना–हरकत प्रमाणपत्रासह दत्तक नियंत्रण संस्थेकडे दत्तम नियंत्रण संस्थेच्या नियमावलीच्या अधीन राहून योग्य त्या कारवाईसाठी अर्ज सादर करु शकतील.

**६०. नात्यामध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय दत्तकविधानाची क्रियारीती :–** (१) परदेशात वास्तव्य करणाऱ्या एखाद्या व्यक्तीस भारतात वास्तव्यास असलेल्या नातेवाईकाचे मूल दत्तक घ्यावयाचे असल्यास, त्याने न्यायालयात त्याबाबत अर्ज सादर करुन न्यायालयाचा आदेश घ्यावा. दत्तक नियंत्रण प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या नियमानुसार ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

(२) दत्तक नियंत्रण संस्थेचे अधिकारी, पोट–कलम (१) अन्वये देण्यात आलेला आदेश आणि बालकाचे जन्मदाते माता–पिता किंवा दत्तक घेणारे माता–पिता यांच्याकडून अर्ज प्राप्त झाल्यावर भारतीय आणि बालक जाणार असलेल्या देशाच्या अप्रवास (देशांतरण) अधिकाऱ्यांना सूचना देऊन ना–हरकत प्रमाणपत्र देतील.

(३) दत्तक घेणारे माता–पिता, उपकलम २ अन्वये ना–हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, जन्मदात्यांकडून बालकास ताब्यात घेतील आणि वेळोवेळी दत्तक घेतलेल्या बालकास जन्मदात्या माता–पित्यांना भेटण्यास देतील.

**६१. दत्तकाबाबत विचार करण्यासाठी पैसे दिले गेले असल्यास शिक्षा व संबंधित न्यायालयाची क्रियारीती :–** (१) दत्तकाबाबत आदेशा देण्यापूर्वी न्यायालय खालील बाबतीत खात्री करुन घेईल.

(अ) सदर दत्तकविधान बालकाच्या कल्याणासाठी आहे,

(ब) बालकाचे वय विचारात घेऊन, बालकाच्या इच्छा देखील विचारात घेतल्या गेल्या आहेत, आणि

(क) दत्तक घेणाऱ्या, माता–पिता यांना किंवा यांच्याकडून किंवा विशेष दत्तकविधान संस्था किंवा बालकाचे जन्मदाते माता–पिता किंवा पालक यांना किंवा यांच्याकडून दत्तक नियंत्रण संस्थेच्या नियमावली व्यतिरिक्त इतर कोणताही आर्थिक लाभ किंवा लाभाचे आश्वासन किंवा दत्तकविधानाचा मोबदला किंवा दत्तकविधानाच खर्च किंवा आर्थिक सेवालाभ किंवा बालकाचा मोबदला किंवा बालकाचा संगोपनखर्च दिला किंवा घेतला गेला नाही.

(२) दत्तकविधानाची सर्व कारवाई बंद खोलीत (इन कॅमेरा) होईल आणि न्यायालय अर्ज दाखल झाल्यापासून दोन महिन्यांत प्रकरणाची निर्गती करील.

**६२. अतिरिक्त कारवाईची आवश्यकता आणि अभिलेखनिर्मिती :–** (१) अनाथ, सोडून दिलेले किंवा जमा केलेले बालक यांना दत्तक घेणारे भारतीय मातापिता, किंवा अनिवासी भारतीय किंवा परदेशस्थ भारतीय नागरिक किंवा भारतीय वंशाचे किंवा परदेशी नागरिकांच्या दत्तकविधानाच्या कारवाईत, या अधिनियमात उल्लेख केलेला नसलेल्या अभिलेखनिर्मिती आणि कारवाईच्या गरजा दत्तकविधान नियंत्रण प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार असतील.

(२) विशेष दत्तक संस्था, दत्तक घेणाऱ्या पालकांच्या दत्तक प्रकरणाची निर्गती अर्ज प्राप्त झाल्यापासून चार महिन्यांत पूर्ण करतील आणि अधिकृत परदेशी दत्तक संस्था, प्राधिकरण आणि राज्य संस्था दत्तक प्रकरणाच्या प्रगतीचा पाठपुरावा करतील आणि समयबद्ध निर्गतीसाठी आवश्यकता भासल्यास हस्तक्षेप करतील.

**६३. दत्तकविधानाचे परिणाम :–** ज्या बालकाच्या संदर्भात न्यायालयाने दत्तकविधानाचा आदेश दिलेला आहे, ते बालक दत्तक दिलेल्या माता–पित्यांनी दिलेला असल्याप्रमाणे, दत्तकविधानाच्या दिनांकापासून वारसा अधिकारासह सर्व बाबतीत दत्तक दिलेल्या मातापित्यांचे होईल आणि त्याच्या जन्मदात्या माता–पित्याबरोबरचे सर्व संबंध संपुष्टात येतील.

परंतु, दत्तकविधानाचा आदेश होण्याच्या वेळेपूर्वी दत्तक घेतलेल्या बालकाच्या नावे केलेली मालमत्ता, त्या मालमत्तेवर मालकी हक्कासंबंधात काही जबाबदाऱ्या असल्यास, जन्मदात्या कुटूंबातील नातेवाईकांच्या सांभाळासारख्या त्या जबाबदाऱ्यांसह त्या बालकाच्या नावावरच राहील.

**६४. दत्तकविधानाबाबत माहिती देणे :–** त्यावेळी प्रभावात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद असले तरी, संबंधित न्यायालयाकडून देण्यात येणाऱ्या दत्तकविधानाच्या आदेशाबाबत, दत्तकविधान नियंत्रण प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या पद्धतीने दत्तकविधान प्राधिकरणास, दत्तक आदेशांबाबत माहिती संकलित करण्यासाठी मासिक अहवालापर्यंत पाठविली पाहिजे.

**६५. विशेष दत्तकविधान संस्था :–** (१) राज्य शासन, प्रत्येक जिल्ह्यात एक किंवा जास्त संस्था किंवा संघटनांना, अधिकृतरित्या दत्तकविधान नियंत्रण नियमावलीत ठरवून दिलेल्या पद्धतीने अनाथ, सोडून दिलेल्या किंवा ताब्यात दिलेल्या बालकांच्या, दत्तकविधान व संस्थाविरहित पुनर्वसनाच्या उद्देशाने विशेष दत्तकविधान संस्था म्हणून जाहीर करील.

(२) राज्य संस्था अशा विशेष दत्तकविधान संस्थेला मान्यता दिल्यावर किंवा मान्यतेचे नूतनीकरण केल्यावर त्वरित सदर संस्थेचे नाव, पत्ता आणि संपर्काचा तपशील, मान्यतेचे पत्र किंवा प्रमाणपत्राच्या प्रतीसह प्राधिकरणास माहिती देईल.

(३) राज्य शासन वर्षातून किमान एकदा सर्व विशेष दत्तकविधान संस्थांची तपासणी करील व आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत आदेश देईल.

(४) जर एखादी विशेष दत्तम संस्था, या अधिनियमात नमूद केलेली पावले उचलण्यात किंवा अधिकृत दत्तकविधान नियंत्रण संस्थेच्या नियमांची अंमलबजावणी करण्यात कमी पडल्यास किंवा एखादे अनाथ, सोडलेल्या किंवा ताब्यात दिलेल्या बालकास दत्तकविधानासाठी मुक्त करु शकली नाही किंवा प्रस्तावित दत्तक पालकांचा गृह निरीक्षण अहवाल पूर्ण करु शकली नाही किंवा ठराविक मुदतीत न्यायालयाकडून दत्तक आदेश मिळवू शकली नाही, तर अशा विशेष दत्तक संस्थेस रुपये पन्नास हजार पर्यंत दंडाची शिक्षा केली जाऊ शकेल, आणि दंडाची रक्कम न भरल्यास राज्य शासन विशेष दत्तक संस्थेची मान्यता रद्द करील.

**६६. दत्तकविधान संस्था म्हणून नोंदणीकृत नसलेल्या संस्थेतून बालकास दत्तक घेणे :–** (१) या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेल्या सर्व संस्था, विशेष दत्तक संस्था म्हणून मान्यताप्राप्त नसल्या तरी, त्यांच्या संगोपनात असलेल्या सर्व अनाथ, सोडून दिलेल्या किंवा ताब्यात दिलेल्या बालकांना समितीकडून या अधिनियमातील कलम ३८ च्या तरतुदीनुसार दत्तकविधानास योग्य म्हणून जाहीर करुन घेतले जाईल, याची खात्री करतील.

(२) उपकलम १ मध्ये नमुद केलेल्या सर्व संस्था नजीकच्या विशेष दत्तकविधान संस्थेसोबत औपचारिक संबंध प्रस्थापित करतील व त्यांच्याकडील कायद्याने दत्तकविधानास योग्य असलेल्या सर्व बालकंचा तपशील आवश्यक अभिलेखासह, सदर बालकांना दत्तक दिले जावे, अशा उद्देशाने ठरवून दिलेल्या पद्धतीने त्या विशेष दत्तकविधान संस्थेस पुरवतील.

(३) जर कोणत्याही संस्थेने पोट–कलम (१) किंवा (२) च्या तरतुदींचा भंग केल्यास त्या संस्थेला प्रत्येक प्रकरणात रुपये पन्नास हजारपर्यंत दंडाची शिक्षा दिली जाऊ शकेल व सदर भंगाची पुनरावृत्ती झाल्यास सदर संस्थेची नोंदणी रद्द होऊ शकेल.

६७. **राज्य दत्तकविधान सहाय्य संस्था :–** (१) दत्तकविधान व त्यासंबंधी सर्व कारवाईत सहाय्य करण्यासाठी राज्य शासन प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली राज्य दत्तकविधान सहाय्य संस्था निर्माण करील.

(२) जेथे अशी राज्यसंस्था यापूर्वीच अस्तित्वात असेल, ती या अधिनियमातील तरतुदीनुसार स्थापन झालेली आहे असे मानले जाईल.

६८. **केंद्रीय दत्तकविधान सहायता संस्था :–** हा अधिनियम प्रभावात येण्यापूर्वी अस्तित्वात असलेली केंद्रीय दत्तकविधान सहायता संस्था, या अधिनियमातील तरतुदीनुसार केंद्रीय दत्तकविधान सहायता संस्था असल्याचे मानले जाईल व सदर संस्थेकडून खालील नमूद कर्तव्ये बजावली जातील.

(अ) देशांतर्गत दत्तकविधानांना प्रोत्साहन देणे आणि राज्य संस्थेच्या समन्वयाने आंतरराज्य दत्तकविधानांना सहाय्य करणे.

(ब) आंतरदेशीय दत्तकविधानांवर नियंत्रण ठेवणे.

(क) आवश्यकतेनुसार, वेळोवेळी दत्तकविधाने व त्यासंबंधी कारवाईसंदर्भात नियमावली तयार करणे.

(ड) बाल संरक्षणासंदर्भात हेग परिषदेत संमत झालेली केंद्रीय संस्थेची सर्व कर्तव्ये पूर्ण करणे आणि आंतरराष्ट्रीय दत्तकविधानांना सहाय्य करणे.

(इ) ठरवून दिलेली इतर सर्व कर्तव्ये बजावणे.

६९. **प्राधिकरणाची सुकाणू समिती :–** (१) प्राधिकरणाच्या सुकाणू समितीत खालील नमुद सभासद असतील.

(अ) सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार हे मानद अध्यक्ष असतील.

(ब) सह सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार, अधिकारांबाबत कर्तव्ये; मानद नेमणूक.

(क) सह सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार, आर्थिक व्यवहाराबाबत मानद नेमणूक.

(ड) एक राज्य दत्तकविधान सहायता संस्था आणि दोन विशेष दत्तकविधान संस्था.

(इ) एक दत्तक घेणारे पालक आणि एक दत्तक;

(फ) एक वकील किंवा कौटुंबिक कायद्याचा किमान १० वर्षाचा अनुभव असलेले प्राध्यापक.

(ग) सभासद सचिव, जे संघटनेचे मुख्य कार्यकारीही असतील.

(२) वरील खंड (ड) ते (फ) मधील सदस्यांचे नामांकन किंवा निवड, त्यांचा कार्यकाल व त्यांच्या अटी व तरतुदी ठरवून दिल्याप्रमाणे असतील.

(३) सदर सुकाणू समितीची कर्तव्ये खालीलप्रमणे असतील –

(अ) प्राधिकरणाच्या कामकाजावर देखरेख करणे आणि त्यांचे कामकाज परिणामकारक व्हावे म्हणून वेळोवेळी त्यांच्या कामकाजाचे पुनर्विलोकन करणे.

(ब) प्राधिकरणाच्या वार्षिक अंदाजपत्रकास, वार्षिक ताळेबंदास व वार्षिक हिशोब तपासणीस तसेच कृती आराखड्यास व वार्षिक अहवालास मान्यता देणे.

(क) केंद्रीय शासनाच्या मंजुरीने भरतीचे नियम, सेवा नियम, आर्थिक नियम ठरविणे, त्याचप्रमाणे प्राधिकरणातील प्रशासकीय आणि योजनात्मक अधिकार याबाबत नियंत्रण ठेवणे;

(ड) केंद्र शासनाकडून वेळोवेळी सोपविली जाणारी इतर अतिरिक्त कर्तव्ये बजावणे.

(४) सदर सुकाणु समितीची महिन्यातून एकदा सभा ठरवून दिलेल्या नियमांनुसार होईल.

(५) प्राधिकरण त्यांच्या मुख्यालयातून आणि कामकाजाच्या गरजांनुसार निर्माण केलेल्या त्यांच्या प्रादेशिक कार्यालयातून कर्तव्य बजावतील.

**७०. प्राधिकरणाचे अधिकार :–** (१) त्यांची कर्तव्ये परिणामकारक रीतीने बजावण्यासाठी प्राधिकरणास खालील नमूद अधिकार प्रदान केलेले आहेत.

(अ) कोणत्याही विशेष दत्तकविधान संस्थेस किंवा बालगृहास किंवा जेथे अनाथ, सोडून दिलेल्या किंवा ताब्यात दिलेल्या बालकांची निवासव्यवस्था केलेली आहे, अशा कोणत्याही बाल संगोपन गृहास किंवा राज्य संस्थेस किंवा कोणत्याही अधिकृत परदेशी दत्तकविधान संस्थेस सूचना देता येतील व सदर सूचनांची सदर संस्थेस अंमलबजावणी करावी लागेल.

(क) कोणत्याही अधिकारी, कर्मचारी, संस्थांकडून दिलेल्या सूचनांची वारंवार पूर्तता न करण्याची प्रकरणे, अशा प्रकरणांची सुनावणी करण्याचे अधिकार असलेल्या न्यायाधीशांकडे पाठविणे. अशा पाठविलेल्या प्रकरणांची सदर न्यायाधीश फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ च्या ३४६ व्या कलमानुसार सुनावणी करतील;

(ड) केंद्र शासनाकडून दिले जाऊ शकतील असे इतर कोणतेही अधिकार.

(२) प्रस्तावित दत्तक पालकांची पात्रता किंवा दत्तक जाणाऱ्या बालकाची योग्यता यासारख्या कोणत्याही बाबतीत दत्तक विधानाच्या प्रकरणात मतभेद निर्माण झाल्यास, प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

**७१. प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल :–** (१) प्राधिकरण केंद्र सरकारला ठरवून दिलेल्या पद्धतीने वार्षिक अहवाल सादर करील.

(२) केंद्र सरकार, प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल संसदेसमोर सादर करील.

**७२. केंद्र शासनाकडून अनुदान :–** (१) या संबंधातील कायद्यानुसार संसदेने आवश्यक निधी मंजूर केल्यानुसार, केंद्र शासन प्राधिकरणाच्या या अधिनियमानुसार कामकाजासाठी आवश्यक तो निधी मंजूर करील.

(२) प्राधिकरण त्यांच्या या अधिनियमानुसार कामकाजासाठी आवश्यक तो खर्च सदर उप कलम १ मध्ये नमूद केलेल्या निधीमधून करील.

**७३. प्राधिकरणाचा ताळेबंद आणि लेखा परीक्षण :–** (१) प्राधिकरण केलेल्या आवश्यक खर्चाचा योग्य पद्धतीने हिशोब आणि इतर संबंधित अभिलेख केंद्र शासनाच्या पद्धतीने ठेवेले आणि सदर खर्चाचा वार्षिक ताळेबंद नियंत्रक आणि भारताचे महालेखाकार यांच्या सल्ल्यानुसार मांडेल.

(२) प्राधिकरणाच्या ताळेबंदाचे लेखापरिक्षण लेखा नियंत्रक आणि भारताचे महालेखाकार त्यांनी ठरवून दिलेल्या कालबद्धतेने करतील आणि अशा लेखापरिक्षणासाठी आलेला खर्च प्राधिकरणाकडून लेखा नियंत्रक आणि महालेखाकार यांना दिल जाईल.

(३) लेखा नियंत्रक आणि महालेखाकार आणि त्यांनी प्राधिकरणाच्या लेखापरीक्षणासाठी या अधिनियमातील तरतुदींन्वये नेमलेली कोणीही व्यक्ती, यांना शासनाच्या लेखापरीक्षणासाठी दिलेले सर्व अधिकार आणि सवलती असतील. विशेषत: हिशोब पुस्तकांची मागणी करणे, हजर करुन घेणे व तपासणे, त्यासंबंधीच्य पावत्या आणि इतर अभिलेख व प्राधिकरणाची कोणतीही कार्यालये तपासणे.

(४) लेखा नियंत्रक आणि महालेखाकार आणि त्यांनी यासंबंधात नेमलेली कोणीही व्यक्ती यांनी तपासलेले आणि प्रमाणित केलेले प्राधिकरणाचे ताळेबंद प्राधिकरणाकडून दरवर्षी केंद्र शासनास सादर केले जातील.

(५) केंद्र शासन प्राधिकरणाचा सादर केलेला प्रमाणित ताळेबंद संसदेच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करील.

## प्रकरण नववे

## बालकांविरुद्ध इतर अपराध

**७४. बालकाचा तपशील उघड करण्यावर बंदी :–** (१) कोणत्याही वृत्तपत्रात, मासिकात, वार्तापत्रात किंवा दृकश्राव्य माध्यमात किंवा प्रसारणाच्या कोणत्याही इतर माध्यमातून कोणतीही चौकशी, पोलीस तपास किंवा न्यायालयीन सुनावणीच्या वृत्तांत, बालकाचे नांव, पत्ता, शाळा किंवा कायद्याच्या विरोधात गेलेल्या किंवा ज्याला संगोपन आणि संरक्षणाची गरज आहे किंवा बळी पडलेला बालक आहे, अपराधाचा साक्षीदार आहे किंवा त्यावेळी प्रभावात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या प्रकरणात संबंधित आहे अशा कोणत्याही बालकाची ओळख पटेल, असा तपशील प्रसिद्ध करता येणार नाही :

परंतु, चौकशी करणारी समिती किंवा मंडळ, जर त्यांना असा तपशिल उघड करणे हे बालकाच्या कल्याणाचे आहे असे वाटत असल्यास, त्यासंबंधीची करणे नमूद करुन असा तपशील उघड करण्यास परवानगी देऊ शकेल.

(२) जी प्रकरणे बंद करण्यात आलेली आहेत किंवा त्यांची निर्गती झालेली आहे, अशा कोणत्याही प्रकरणातील बालकाचा तपशील चरित्र प्रमाणपत्र देतांना पोलीस करणार नाहीत.

(३) कोणत्याही व्यक्तीने उपकलम १ मधील तरतुदीचा भंग केल्यास त्या व्यक्तीस सहा महिनेपर्यंत कैद किंवा रुपये दोन लाखपर्यंत दंड किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतील.

**७५. बालकास क्रुरतेनी वागविण्यासाठी शिक्षा :–** जी कोणी व्यक्ती बालकाचा प्रत्यक्ष ताबा असतांना किंवा बालक त्याच्या नियंत्रणाखाली असताना, बालकावर हल्ला करील, सोडून देईल, गैरकृत्य करील, जाणीवपूर्वक उघड्यावर टाकील, बालकास अनावश्यक शारीरिक किंवा मानसिक कष्ट होतील, अशाप्रकारे दुर्लक्ष करील, त्या व्यक्तीस तीन वर्षापर्यंत कैद किंवा रुपये एक लाख पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतील :

परंतु, जर बालकास त्याच्या जन्मदात्या माता–पित्यांनी त्यांच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे सोडून दिले होते असे उघडकीस आल्यास ते सोडून देणे जाणीवपूर्वक नव्हते असे समजले जाईल व त्यांना शिक्षेची तरतूद लागू होणार नाही :

परंतु, सदर बालकास सोडून दिले ती व्यक्ती, बालकास संगोपनासाठी आणि संरक्षणासाठी ज्या संघटनेच्या ताब्यात सोपवले होते, अशी संघटना चालविणारी किंवा अशा संघटनेत नोकरी करणारी असल्यास सदर व्यक्तीला पाच वर्षापर्यंत कैद आणि रुपये पाच लाख पर्यंत दंड अशी शिक्षा होऊ शकेल :

परंतु, सदर क्रूर वर्तणुकीमुळे बालकास शारीरिक अपंगत्व आल्यास किंवा मानसिक आजारामुळे दैनंदिन व्यवहार करणे अशक्य झाल्यास किंवा बालकाच्या जीवितास किंवा अवयवास धोका निर्माण झाल्यास सदर व्यक्तीस किमान तीन वर्षे ते दहा वर्षे सश्रम कारावास आणि रुपये पाच लाख पर्यंत दंड होऊ शकेल.

**७६. बालकास भिक मागणास वापरणे :–** (१) जी व्यक्ती बालकास भीक मागण्यासाठी वापरेल किंवा बालकास भीक मागायला लावील त्या व्यक्तीस किमान सात ते दहा वर्षापर्यंत सश्रम कारावास आणि रुपये पाच लाखपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकेल :

परंतु, भीक मागण्यासाठी कोणी व्यक्ती बालकाचा अवयव कापेल किंवा बालकास अपंग करील तर त्या व्यक्तीस सात वर्षापेक्षा कमी नाही, पण दहा वर्षांपर्यंत वाढू शकेल एवढी सश्रम कारावास आणि रुपये पाच लाख पर्यंत दंड एवढी शिक्षा होऊ शकेल.

(२) जर एखादी व्यक्ती तिच्या प्रत्यक्ष ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या बालकाच्या संदर्भात पोट–कलम (१) मध्ये नमूद अपराधास सहाय्य करील तर सदर व्यक्ती ही पोट–कलम (१) मध्ये नमूद शिक्षेस पात्र ठरेल आणि सदर व्यक्ती कलम २ च्या खंड (१४) च्या उपखंड (पाच) अन्वये अपात्र समजली जाईल :

परंतु, सदर बालक, कोणत्याही परिस्थितीत कायद्याच्या विरोधात गेलेले बालक समजले जाणार नाही आणि सदर इसमाच्या ताब्यातून किंवा नियंत्रणातून काढून घेतले जाईल आणि योग्य पुनर्वसनासाठी समितीसमोर हजर केले जाईल.

**७७. बालकास गुंगीकारक मद्य किंवा अंमली पदार्थ किंवा मनोव्यापरावर परिणाम करणारा पदार्थ देणाऱ्यास शिक्षा :–** जो कोणी एखाद्या बालकास गुंगीकारक मद्य किंवा अंमली पदार्थ किंवा तंबाखूजन्य पदार्थ किंवा मनोव्यापारावर परिणाम करणारा पदार्थ, मान्यताप्राप्त वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याशिवाय देईल किंवा देववील, त्या व्यक्तीस सात वर्षापर्यंत सश्रम कारावार आणि रुपये एक लाख पर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकेल.

**७८. बालकास गुंगीकारक मद्य, अंमली पदार्थ किंवा मनोव्यापारावर परिणाम करणारा पदार्थ विक्री, तस्करी, पुरवठा किंवा बाळगण्यासाठी वापरणाऱ्यास शिक्षा :–** जो कोणी एखाद्या बालकाचा गुंगीकारक मद्य, अंमली पदार्थ किंवा मनोव्यापारावर परिणाम करणारा पदार्थ विक्री, तस्करी, पुरवठा किंवा बाळगण्यासाठी वापर करील त्याला सात वर्षापर्यंत सश्रम कारावार आणि रुपये एक लाख पर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकेल.

**७९. बाल कामगारांची पिळवणूक :–** त्यावेळी प्रभावात असलेल्या कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद असले तरी, जरे कोणी बालकास नोकरीत ठेवील आणि वेठबिगारीत ठेवून त्याची मिळकतीची रक्कम स्वत:च्या ताब्यात स्वत:साठी ठेवून घेईल, त्याला पाच वर्षापर्यंत सश्रम कारावार आणि रुपये एक लाख पर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकेल.

**स्पष्टीकरण –** या कलमाकरता, नोकरीत या संज्ञेत, वस्तुंची विक्री करणे आणि आर्थिक फायद्यासाठी सार्वजनिक करमणुकीच्या जागी सेवा देणेही अंतर्भूत आहे.

**८०. विहित कार्यपद्धती पूर्ण न करता बालकास दत्तक घेण्यास शिक्षा :–** जर कोणी व्यक्ती किंवा संस्था, एखादे अनाथ, सोडून दिलेले किंवा ताब्यात दिलेले बालक, या अधिनियमातील तरतुदी पूर्ण न करता दत्तकविधानासाठी देऊ करील, देईल किंवा स्विकारील तर सदर व्यक्ती किंवा संस्था तीन वर्षापर्यंत कोणत्याही प्रकारची कैद किंवा रुपये एक लाख पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षेस पात्र ठरेल.

तर सदर अपराधा एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेनी केलेला असल्यास, सदर संस्थेचा प्रमुख आणि सदर दत्तकविधान संस्थेच्या दैनंदिन कामकाजास जबाबदार असलेल्या व्यक्तीस वर नमूद शिक्षेव्यतिरिक्त, किमान एक वर्षासाठी सदर संस्थेची कलम ४१ अन्वये केलेली नोंदणी रद्द केली जाईल आणि सदर संस्थेस कलम ६५ अन्वये दिलेली मान्यता रद्द केली जाईल.

**८१. कोणत्याही उद्देशाने बालकांची विक्री आणि खरेदी :–** कोणीही व्यक्ती कोणत्याही उद्देशाने बालकाची खरेदी किंवा विक्री केल्यास सदर व्यक्तीस पाच वर्षापर्यंत सश्रम कारावास आणि रुपये एक लाखपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

परंतु, जर असा अपराध ज्या व्यक्तीकडे बालकाचा प्रत्यक्ष ताबा आहे, अशा व्यक्तीने, रुग्णालय, प्रसूतीगृह किंवा शुश्रुषागृहात नोकरी करणारी व्यक्ती असल्यास शिक्षेचा कालावधी तीन वर्षापेक्षा कमी नाही, मात्र सात वर्षांपर्यंत असेल.

**८२. शारीरिक शिक्षा :–** (१) बाल संगोपन केंद्राचा प्रभारी असलेली किंवा सदर केंद्राम काम करणारी व्यक्ती, जर बालाकला शिस्त लावण्याच्या उद्देशाने बालकास शारीरिक इजा होईल अशी शिक्षा देईल तर ती व्यक्ती पहिल्या दोषसिद्धीसाठी रुपये दहा हजार दंडाच्या व त्यानंतरच्या प्रत्येक दोषसिद्धीला तीन महिन्यांपर्यंतच्या कैदेच्या किंवा दंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांना पात्र ठरेल.

(२) जर कोणीही पोट–कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या संस्थेत नोकरी करणाऱ्या व्यक्तीस या उपकलमात दोषसिद्धी झाल्यास, तो सदर नोकरीतून बडतर्फीसही पात्र ठरेल आणि कोणत्याही बालकांशी प्रत्यक्ष संपर्क असणाऱ्या संस्थेत काम करण्यास अपात्र ठरेल.

(३) जेव्हा पोट–कलम (१) मध्ये नमूद कोणत्याही संस्थेत शारीरिक शिक्षा देत असल्याची माहिती मिळाल्यास व तेथील व्यवस्थापनाने चौकशीत सहकार्य केले नाही किंवा समितीने किंवा मंडळाने किंवा न्यायालयाने किंवा राज्य शासनाने दिलेल्या आदेशांचे पालन केले नाही तर सदर संस्थेचा प्रमुख व्यक्ती, किमान तीन वर्षे कैद आणि रुपये एक लाख पर्यंतच्या दंडास पात्र ठरेल.

**८३. अतिरेकी गटाने किंवा इतर प्रौढ व्यक्तींनी बालकाचा वापर करणे :–** (१) केंद्र शासनाने दहशतवादी म्हणून जाहीर केलेल्या व फुटिरतावादी कारवाया करणाऱ्या, कोणत्याही कारणाने बालकास कोणत्याही कामासाठी भरती केले, तर त्यास सात

वर्षेपर्यंत सश्रम कारावासाची आणि रुपये पाच लाखपर्यंतच्या शिक्षेस पात्र ठरेल.

(२) कोणाही प्रौढ व्यक्तीने किंवा प्रौढ व्यक्तींच्या गटाने एखाद्या बालकास, एकट्याने किंवा गटाने करावयाच्या बेकायदेशीर कृत्यांसाठी वापरले तर ते सात वर्षेपर्यंत सश्रम कारावासाची आणि रुपये पाच लाखापर्यंतच्या शिक्षस पात्र ठरतील.

८४. **बालकाचे अपहरण व पालकाच्या रखवालातून घेऊन जाणे :–** या अधिनियमासाठी, भारतीय दंड संहितेच्या कलम ३५९ व ३६९ मधील तरतुदी आवश्यक ते फेरबदल करुन बालकास किंवा १८ वर्षाखालील अल्पवयीन मुलास लागू होतील व सर्व संबंधित तरतुदी त्यानुसारच विचारात घेतल्या जातील.

८५. **विकलांग बालकाविरुद्ध केलेले अपराध :–** या प्रकरणात नमूद केलेला कोणताही अपराध कोणीही, ज्याला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विकलांग म्हणून घोषित केलेले आहे, अशा बालकाविरुद्ध केल्यास दोषी व्यक्तीस सदर अपराधासाठी दिलेल्या शिक्षेच्या दुप्पट शिक्षा दिली जाईल.

**स्पष्टीकरण –** या अधिनियमासाठी, विकलांगता या संज्ञेचा अर्थ, विकलांगता असलेल्या व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ च्या कलम २ मधील मुद्दा १ प्रमाणेच आहे.

८६. **अपराधांचे वर्गीकरण आणि विशेष न्यायालये :–** (१) या अधिनियमातील ज्या अपराधांना सात वर्षापेक्षा जास्त कैदेची शिक्षा आहे, असे सर्व अपराध दखलपात्र, अजामीनपात्र आणि सदर खटल्याची सुनावणी बाल न्यायालयात केली जाईल.

(२) या अधिनियमातील ज्या अपराधांना तीन वर्षापेक्षा जास्त पण सात वर्षापेक्षा कमी शिक्षेची तजवीज केली आहे ते अपराध दखलपात्र, अजामीनपात्र आणि त्यांची सुनावणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर होईल.

(३) या अधिनियमातील ज्या अपराधांना तीन वर्षापेक्षा कमी कैदेची किंवा फक्त दंडाच्या शिक्षेची तजवीज केली आहे, असे अपराध दखलपात्र, अजामीनपात्र आणि त्यांची सुनावणी कोणत्याही दर्जाच्या न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर होईल.

८७. **संगनमत व सहाय्य करणे :–** जी कोणी व्यक्ती या अधिनियमाखालील अपराधांना सहाय्य व संगनमत करील, त्या संगनमत व सहाय्यानंतर तो अपराध घडल्यास त्या व्यक्तीला अपराधास जेवढी शिक्षेची तजवीज केली आहे तेवढीच शिक्षा दिली जाईल.

**स्पष्टीकरण –** जेव्हा दिलेल्या चिथावणीमुळे किंवा केलेल्या कटाच्या अनुषंगाने, किंवा सहाय्याने सदर अपराध घडल्यास, तो अपराध संगनमत व सहाय्याने घडला असे समजले जाईल.

८८. **शिक्षेची निवड :–** जेव्हा एखादे कृत्य करणे किंवा करावयाचे टाळणे हे या अधिनियमान्वये आणि त्यावेळी प्रभावात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमान्वये अपराध समजले गेले असेल, तेव्हा अशा कोणत्याही अधिनियमात काहीही नमूद असले तरी, अपराध्यास दोषसिद्धीनंतर दोन तरतुदींपैकी जी जास्त मोठी शिक्षा असेल ती दिली जाईल.

८९. **या प्रकरणातील अपराध बालकाने केल्यास :–** या प्रकरणातील कोणताही अपराध एखाद्या बालकाने केल्यास, त्या बालकास कायद्याविरुद्ध गेलेले बालक समजले जाईल.

***

## प्रकरण दहावे
## संकीर्ण

९०. **बालकाचे माता–पिता किंवा पालकांची हजेरी :–** या अधिनियमातील तरतुदीनुसार, समिती किंवा मंडळासमक्ष बालकास हजर केल्यावर, जेव्हा जेव्हा समिती किंवा मंडळास आवश्यक वाटेल, तेव्हा ते बालकाच्या माता–पिता किंवा पालकांना कारवाईच्या वेळी हजर राहण्यास सांगतील.

९१. **बालकास हजर न ठेवण्याची मुभा देणे :–** (१) चौकशी कोणतीही असताना बालकाची हजेरी चौकशीसाठी आवश्यक नाही असे मंडळ किंवा समितीस वाटल्यास ते बालक हजर न ठेवण्यास मुभा देतील. मंडळ किंवा समिती बालकाची हजेरी त्याच्या जबाब नोंदणीपुरती सीमित ठेवू शकतील व बाकी चौकशी, बालकाच्या गैरहजेरीत चालविली जाईल.

(२) जेव्हा जेव्हा मंडळ किंवा समितीसमोर बालकाने हजर राहण्याची आवश्यकता असेल, तेव्हा तेव्हा बालक त्याच्यासमोर सुरक्षितेसाठी एक व्यक्तीचा प्रत्यक्ष प्रवास भाडे खर्च मंडळ किंवा समिती किंवा जिल्हा बाल संरक्षण केंद्राकडून देय असेल.

**९२. दीर्घकालीन वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या व्याधीने पीडित बालकास मान्यताप्राप्त जागी ठेवण्याबाबत :–** जेव्हा समिती किंवा मंडळासमोर आणलेले बालक दीर्घकालीन वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या शारीरिक किंवा मानसिक व्याधीने पीडित असेल तेव्हा समिती किंवा मंडळ बालकस मान्यताप्राप्त योग्य जागी उपचारास जो कालावधी आवश्यक असेल तेवढ्या कालावधीकरिता दाखल करण्याचा आदेश देईल.

**९३. मानसिकदृष्ट्या ग्रस्त असलेल्या किंवा अल्कोहोल किंवा इतर अंमली पदार्थांच्या व्यसनी बालकास स्थलांतरीत करणे :–** (१) या अधिनियमातील तरतुदीनुसार विशेष गृहात किंवा निरीक्षण गृहात किंवा बालगृहात किंवा संस्थेत ठेवलेले बालक, मानसिक आजाराने ग्रस्त किंवा अल्कोहोल किंवा वर्तनावर परिणाम करणाऱ्या इतर अंमली पदार्थांचे व्यसनी असल्याचे समिती किंवा मंडळाच्या निदर्शनास येईल, तेव्हा सदर समिती किंवा मंडळ सदर बालकास मानसिक आरोग्य अधिनियम, १९८७ मधील तरतुदीनुसार मानसोपचार रुग्णालय किंवा मानसिक उपचार केंद्रात दाखल करण्याचे आदेश देईल.

(२) पोट–कलम (१) अन्वये मानसोपचार केंद्रात किंवा मानसिक उपचार केंद्रात दाखल केलेल्या बालकाबाबत उपचार समाप्ती प्रमाणपत्र दिलेल्या सल्ल्यानुसार, व्यसनींकरिता असलेल्या एकत्रित पुनर्वसन केंद्रात किंवा राज्य शासनाने चालविलेल्या मानसिक आजाराने ग्रस्त व अंमली पदार्थांच्या व्यसनींसाठी असलेल्या पुनर्वसन केंद्रात आवश्यक तेवढ्या कालावधीसाठी बालकास स्थानांतरीत करण्याचे आदेश समिती किंवा मंडळ देईल.

**स्पष्टीकरण –** या पोट–कलमासाठी,

(अ) व्यसनींसाठी एकत्रित पुनर्वसन केंद्र या संज्ञेस केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाच्या केंद्रीय विभागीय दारुबाजी व अंमली पदार्थ व्यसन प्रतिबंध योजनेमध्ये दिलेला अर्थ अभिप्रेत आहे.

(ब) मानसिकदृष्ट्या ग्रस्त व्यक्ती या संज्ञेचा अर्थ, मानसिक आरोग्य अधिनियम, १९८७ च्या कलम २ पोट–कलम (ल) मध्ये दिलेला अर्थ अभिप्रेम आहे.

(क) मानसोपचार रुग्णालय आणि मानसिक उपचार केंद्र ही संज्ञा मानसिक आरोग्य अधिनियम, १९८७ च्या कलम २ मधील पोट–कलम (क्यु) मध्ये दिलेल्या अर्थाची आहे.

**९४. गृहितक आणि वय निश्चिती :–** (१) साक्ष नोंदविण्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणाने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार समिती किंवा मंडळासमोर आलेली व्यक्ती सकृतदर्शनी बालक दिसत असेल तर समिती किंवा मंडळ त्यांची निरीक्षणे नोंदवून बालकाचे अंजाचे वय नमूद करतील आणि वयाबाबत जास्त खात्री करण्याची वाट न पाहता, कलम १४ किंवा कलम ३६ अन्वये चौकशी पुढे सुरु ठेवतील.

(२) जर समिती किंवा मंडळास, त्यांच्यापुढे आणलेली व्यक्ती बालक आहे किंवा नाही, याबाबत रास्त शंका असल्यास, समिती किंवा मंडळ वय निश्चिती करण्यासाठी खालील संदर्भात पुरावे हजर करुन घेईल.

(एक) शाळेमधून जन्मतारखेचे प्रमाणपत्र, किंवा शालांत परीक्षेचे किंवा त्यासारखे परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास, मात्र ते उपलब्ध नसल्यास;

(दोन) महानगरपालिकेचे किंवा नगरपालिका प्रशासनाचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र;

(तीन) केवळ पोट–कलम (१) किंवा (२) मधील प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास, समिती किंवा मंडळाच्या आदेशाने ऑसिफिकेशन चाचणीने किंवा दुसऱ्या अद्ययावत वैद्यकीय वय निश्चिती चाचणीच्या सहाय्याने;

सममिती किंवा मंडळाच्या आदेशाने केलेली वय निश्चिती चाचणी आदेश दिल्यापासून १५ दिवसाच्या आत केली गेली पाहिजे.

(३) समिती किंवा मंडळाने नोंदविलेले वय या अधिनियमातील तरतुदीनुसार, त्या व्यक्तीचे खरे वय समजले जाईल.

**९५. बालकाचे निवासस्थानी स्थलांतरण :–** (१) जर चौकशीच्या दरम्यान, सदर बालक समिती किंवा मंडळाच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाले तर आणि सदर चौकशी बालकाच्या वास्तव्याच्या परिसरात करण्यात बालकाचे कल्याण आहे याबाबत समिती किंवा मंडळाचे समाधान झाल्यास, बालकाच्या वास्तव्याच्या परिसरातील समिती किंवा मंडळाची चर्चा करुन, लवकरात लवकर सदर चौकशी बालकासह, बालकाच्या वास्तव्याच्या परिसरातील समिती किंवा मंडळाकडे पाठविली जाईल:

परंतु, कायद्याविरुद्ध गेलेल्या बालकाच्या संदर्भात असा बालकाच्या स्थानांतरणाच आदेश चौकशी पूर्ण झाल्यावरच मंडळाच्या अंतिम आदेशासोबत दिला जाईल.

परंतु तसेच, आंतरराज्य स्थानांतरणासंदर्भात, जर सोयिस्कर असल्यास, बालकास त्याच्या वास्तव्याच्या परिसरातील समिती किंवा मंडळाकडे हस्तांतरित केले जाईल किंवा राज्याच्या राजधानीच्या समिती किंवा मंडळाकडे हस्तांतरित केले जाईल.

(२) जर हस्तांतरणाचा निर्णय निश्चित झाला तर, समिती किंवा मंडळ, आदेश केल्यापासून १५ दिवसांच्या आत बालकास मार्ग सुरक्षा पुरविण्याचा आदेश विशेष बाल सुरक्षा पोलीस केंद्रास देईल;

परंतु, सदर बालक मुलगी असल्यास, तिच्या सुरेक्षेसाठी महिला पोलीस अधिकारी नेमली जाईल.

परंतु, जेथे विशेष बाल संरक्षण पोलीस केंद्र उपलब्ध नसल्यास समिती किंवा मंडळ ज्या संस्थेत बालक तात्पुरत्या पद्धतीने राहात असेल त्या संस्थेस किंवा जिल्हा बाल संरक्षण केंद्रास, बालकाला प्रवासादरम्यान सुरक्षा पुरविण्यासाठी सोबत पाठविण्याचे आदेश देईल.

(३) राज्य शासन, सदर बालकास प्रवासादरम्यान सुरक्षा पुरविणाऱ्या पथकास अग्रीम प्रवासभत्ता देण्याबाबत नियम तयार करील.

(४) स्थानांतरीत केलेल्या बालकास स्वीकारणारी समिती किंवा मंडळ, या अधिनियमानुसार बालकास घरी पोहोचविणे किंवा त्याचे पुनर्वसन करणे किंवा समजात पुनर्सम्मीलन करण्याची जबाबदारी पूर्ण करील.

**९६. बालकचे भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशातील बालगृहांमध्ये किंवा विशेष गृहांमध्ये किंवा सुयोग्य स्थळांमध्ये किंवा योग्य व्यक्तीकडे स्थानांतरण :–** (१) राज्य कोणत्याही वेळी, समिती किंवा मंडळाच्या शिफारशीनुसार, या अधिनियमात काहीही नमूद असले तरी, बालकाचे हित विचारात घेऊन, बालकाचे राज्यामधील कोणत्याही बालक गृहातून किंवा विशेष गृहातून किंवा सुयोग्य स्थळांमध्ये किंवा योग्य व्यक्तीमध्ये संबंधित समित्यांच्या पूर्वसंमतीने किंवा त्यांना माहिती देऊन स्थानांतरण करण्याचा आदेश देऊ शकेल ;

परंतु, बालकाचे स्थानांतरण त्याच जिल्ह्यातील सारख्याच गृहात किंवा संस्थेत किंवा व्यक्तीकडे करण्याचे अधिकार समिती किंवा मंडळास आहेत.

(२) जर राज्य शासन दुसऱ्या राज्यातील एखाद्या संस्थेकडे स्थानांतरण करणार असेल, तर संबंधित राज्य शासनाच्या सल्ल्यानेच सदर कारवाई केली जाईल.

(३) अशा बदल्यांमुळे बालकाचा बालक गृहातील एकूण कालावधी वाढणार नाही.

(४) पोट–कलम (१) किंवा (२) अन्वये दिलेले आदेश ज्या प्रदेशात बालकास स्थानांतरित करण्यात आले आहे तेथील समिती किंवा मंडळाकडे प्रभावात असतील.

**९७. एखाद्या संस्थेमधून बालकाची सुटका :–** (१) जेव्हा एखाद्या बालकास बालक गृहात किंवा विशेष गृहात ठेवलेले असेल तर, परीविक्षा अधिकाऱ्यांच्या किंवा सामाजिक कार्यकर्त्यांच्या किंवा शासनाच्या किंवा सेवाभावी स्वयंसेवी अशासकीय संस्थेच्या अहवालावर समिती किंवा मंडळ बालकास पूर्णपणे किंवा त्यांना योग्य वाटतील अशा शर्तीवर बालकाला माता पित्यांसोबत किंवा पालकांसोबत किंवा आदेशात नामनिर्देशित केलेल्या, बालकाचा ताबा, शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षणाची जबाबदारी घेणाऱ्या अधिकृत

व्यक्तीकडे राहण्यासाठी मुक्त करण्याचे आदेश देऊ शकेल :

परंतु, या कलमान्वये काही शर्तीवर मुक्त केलेले बालक किंवा ज्याच्या ताब्यात बालकास सोपविले आहे अशा व्यक्तीने शर्तीचा भंग केल्यास, आवश्यक वाटल्यास समिती किंवा मंडळ बालकास पुन्हा ताब्यात घेण्याचे व मूळ संस्थेत परत पाठविण्याचे आदेश देऊ शकेल.

(२) जर बालकास तात्पुरत्या स्वरुपात मुक्त केलेले असेल, तेव्हा पोट–कलम (१) मधील आदेशाच्या अनुषंगाने जेवढा काळ सदर बालक संबंधित संस्थेत नसेल तेवढा काळ तो बाल गृहात किंवा विशेष गृहात ठेवण्यात पात्र ठरेल :

परंतु, कायद्याविरुद्ध गेलेले बालक, पोट–कलम (१) अन्वये मंडळाने घातलेल्या शर्तीचा भंग करील तर आणखी जेवढा काळ तो संस्थेत व्यतित करण्यास बांधील असेल तो काळ मंडळाच्या आदेशाने, जेवढ्या काळासाठी तो मुक्त होता, तेवढा काळ वाढवला जाईल.

**९८. संस्थेमध्ये ठेवलेल्या बालकास गैरहजर राहण्याची संमती :–** (१) समिती किंवा मंडळ, एखादी परीक्षा किंवा नातेवाईकांचे लग्न, जवळच्या नातेवाईकाचा मृत्यु किंवा अपघात किंवा मातापित्यांचा गंभीर आजार किंवा नैसर्गिक आपत्ती या कारणांसाठी प्रवासाचा कालावधी वगळून सात दिवसांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीसाठी संस्थेमध्ये ठेवलेल्या बालकास संस्था सोडण्याची परवानगी देऊ शकेल.

(२) वर नमूद आदेशाच्या अनुषंगाने जेवढ्या कालावधीसाठी बालक संस्थेतून गैरहजर असेल तेवढा काळ जास्त तो संस्थेत ठेवण्यास लायक ठरेल.

(३) रजेचा कालावधी संपल्यावर जर बालकाने पुन्हा हजर होण्यास नकार दिला किंवा तो वेळेवर पुन्हा हजर राहू शकला नाही तर समिती किंवा मंडळ त्याला ताब्यात घेऊन संस्थेत पुन्हा हजर करण्यास लायक ठरवू शकेल :

परंतु, कायद्याविरुद्ध गेलेला बालक रजेचा कालावधी संपल्यावर किंवा रजा रद्द केल्यावरही विशेष गृहात हजर झाला नाही, त्याला संस्थेत ठेवण्याचा कालावधी, जितका काळ तो गैरहजर होता तेवढ्या काळाने वाढविण्यचा आदेश मंडळ देऊ शकेल.

**९९. सर्व अहवाल गोपनिय समजण्याबाबत :–** (१) बालकासंबंधी असलेले आणि मंडळ किंवा समितीने विचारात घेतलेले सर्व अहवाल गोपनीय समजले जाईल :

परंतु, समिती किंवा मंडळ, त्यांना योग्य वाटल्यास अहवालाचा तपशिल दुसऱ्या समिती किंवा मंडळास किंवा बालकाचे माता पिता किंवा पालकास देऊ शकतील किंवा अहवालाच्या विषयाबाबत साक्ष देतांना सांगू शकतील.

(२) या अधिनियमात काहीही नमूद असले तरी, अपराधातील बळीत व्यक्तीस प्रकरणाच्या तपशिलापासून, त्यातील आदेश आणि इतर संबंधित अभिलेखपासून वंचित ठेवले जाणार नाही.

**१००. ईमानाने केलेल्या कारवाईसाठी संरक्षण :–** केंद्र शासन, राज्य शासन किंवा केंद्र किंवा राज्य शासनाच्या आदेशाने कर्तव्य करणारी व्यक्ती यांनी इमानाने केलेल्या आणि या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या अनुषंगाने कारवाईसाठी कोणताही दावा किंवा खटला किंवा न्यायिक कारवाई दाखल करता येणार नाही.

**१०१. अपीले :–** (१) या अधिनियमाच्या अनुषंगाने, समितीने दिलेल्य उसन्या संगोपनाच्या किंवा प्रायोजित संगोपन पाठपुराव्याच्या आदेशाव्यतिरिक्त कोणत्याही आदेशामुळे प्रतिकूल परिणाम झालेली व्यक्ती, समितीने दिलेल्या आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसात बाल न्यायालयात अपील सादर करु शकेल. उसन्या संगोपनाच्या किंवा प्रायोजित संगोपन पाठपुराव्याच आदेशाबाबतचे अपील मात्र जिल्हा न्यायाधिशांकडे सादर करावे लागेल :

परंतु, सत्र न्यायालय किंवा जिल्हा न्यायालयात जर सदर अपील मुदतीत सादर न करु शकल्याबाबत दिलेल्या कारणांनी न्यायालयाचे समाधान झाल्यास मुदतीनंतरही दाखल करुन सदर अपीलावर तीस दिवसांच्या आत निर्णय दिला जाईल.

(२) मंडळाने निर्घृण स्वरुपाच्या अपराधाबाबत या अधिनियमाच्या कलम १५ अन्वये प्राथमिक पडताळणी नंतर दिलेल्या आदेशाविरुद्धचे अपील सत्र न्यायालयात दाखल करावे लागेल आणि न्यायालय सदर अपीलावर निर्णय घेताना, मंडळाने साहाय्य घेतलेल्या तज्ज्ञांव्यतिरिक्त अनुभवी मानसशास्त्रज्ञांची तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची मदत घेऊ शकेल.

(३) (अ) वयाची १६ वर्षे पूर्ण केलेल्या किंवा १६ वर्षावरील वयाच्या बालकाने केलेल्या निर्घृण स्वरुपाच्या अपराधाव्यतिरिक्त इतर अपराधा केल्याचा आरोप असलेल्या बालकाच्या मुक्ततेच्या आदेशाविरुद्ध किंवा

(ब) एखादी व्यक्ती देखभाल किंवा संरक्षणाची आवश्यकता असलेले बालक नसल्याबाबत समितीने दिलेल्या आदेशाविरुद्ध कोणतेही अपील दाखल करता येणार नाही.

(४) या कलमाखाली अपीलात सत्र न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध दुसरे अपील सादर करता येणार नाही.

(५) बाल न्यायालयाच्या आदेशाने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती फौजदारी दंड प्रक्रिया संहितेमधील क्रियारीतीप्रमाणे उच्च न्यायालयात अपील सादर करु शकेल.

**१०२. पुनर्विलोकन :–** उच्च न्यायालय कोणत्याही वेळी स्वत: होऊन किंवा या संदर्भात दाखल झालेल्या अर्जावरुन, समिती किंवा मंडळाच्या किंवा बाल न्यायालयाने आदेश दिलेल्या कोणत्याही कारवाईचा अभिलेख सदर आदेशाची न्याय्यता किंवा योग्यता याबाबत आपले समाधान करुन घेण्यासाठी मागवू शकेल आणि त्या संदर्भात योग्य तो आदेश देऊ शकेल :

परंतु, उच्च न्यायालय या कलमान्वये कोणत्याही व्यक्तीस त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय प्रतिकूल आदेश देणार नाही.

**१०३. चौकशी, अपीले आणि पुनर्विलोकन कारवाईची क्रियारीती :–** (१) काही वेगळी स्पष्ट तरतूद केलेली नसल्यास या अधिनियमान्वये स्पष्ट तरतूद केल्याप्रमाणे समिती किंवा मंडळ, या अधिनियमान्वये चौकशी करतांना, सर्वसाधारणपणे फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ मधील समन्स केसच्या सुनावणीची क्रियारीती वापरतील.

(२) काही वेगळी स्पष्ट तरतूद केलेली नसल्यास या अधिनियमान्वये अपील किंवा पुनर्विलोकनाची कारवाई करतांना शक्यतोवर फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ ची क्रियारीती अंमलात आणली जाईल.

**१०४. समिती किंवा मंडळाला स्वत:च्या आदेशात फेरबदल करण्याचे अधिकार :–** (१) या अधिनियमत अपील किंवा पुनर्विलोकनाच्या नमूद केलेल्या क्रियारीतीला बाधा न आणता, समिती किंवा मंडळ, या संदर्भात प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने, स्वत: केलेल्या बालकाला कोणत्या संस्थेत पाठवायचे किंवा कोणत्या व्यक्तीच्या संगोपनात किंवा देखदेखीखाली बालकाला ठेवायचे याबाबतच्या आदेशात फेरबदल करु शकतील :

परंतु, आदेशातील फेरबदलासाठी केलेल्या सुनावणीच्या दरम्यान, मंडळाचे किमान दोन सदस्य त्यातील एक मुख्य दंडाधिकारी असतील आणि समितीचे किमान तीन सदस्य आणि सर्व संबंधीत व्यक्ती किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर असतील आणि सदर आदेशात फेरबदल करण्यापूर्वी सर्वांना बाजू मांडण्याची संधी दिली जाईल.

(२) समितीनी किंवा मंडळाने संमत केलेल्या आदेशातील लिपीकाच्या चुका किंवा अपघाताने किंवा नजरचुकीने झालेल्या चुका समिती किंवा मंडळाकडून कधीही स्वत: होऊन किंवा दाखल झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने दुरुस्त केल्या जातील.

**१०५. बाल न्याय मंडळ :–** (१) राज्य शासन, या अधिनियमान्वये कारवाई करण्यात येणाऱ्या बालकांच्या हितासाठी आणि पुनर्वसनासाठी आवश्यक असलेल्या योग्य त्या निधीची तजवीज करील.

(२) कोणत्याही व्यक्तीनी किंवा संस्थेनी दिलेल्या स्वयंस्फूर्त देणग्या, निधी किंवा जमा होणारी रक्कम वर नमूद निधीमध्ये जमा केली जाईल.

(३) पोट–कलम (१) प्रमाणे निर्माण केलेला निधी या अधिनियमाखालील प्रकरणे हाताळणाऱ्या राज्य शासनाच्या विभागाकडे सोपविलेला असेल व ठरवून दिलेल्या कामासाठी वापरला जाईल.

**१०६. राज्य बाल संरक्षण सोसायटी :–** प्रत्येक राज्य शासन राज्यासाठी एक बाल संरक्षण सोसायटी आणि प्रत्येक जिल्ह्यासाठी बाल संरक्षण केंद्र स्थापन करील. सदर सोसायटी किंवा केंद्रात आवश्यक ते अधिकारी आणि कर्मचारी नेमले जातील. बालकांसंबंधी सर्व प्रकरणे या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने हाताळली जातील. त्यामध्ये या अधिनियमाखाली संस्था निर्माण करणे व चालविणे, बालके, त्याचे पुनर्वसन व शासकीय आणि बिन शासकीय संस्थांमध्ये समन्वय याकरिता अधिसूचना काढून सक्षम अधिकाऱ्यांची पदे निर्माण केली जातील.

**१०७. बाल कल्याण पोलीस अधिकारी आणि विशेष बाल न्याय केंद्र :–** (१) प्रत्येक पोलीस ठाण्यात, किमान साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दर्जाचा किमान एक आवड असलेला अधिकारी योग्य प्रशिक्षण आणि जाणीव निर्माण करुन बाल कल्याण पोलीस अधिकारी म्हणून नेमला जाईल. सदर अधिकारी बळीत बालके, आणि कायद्याच्या विरोधात गेलेली बालके आणि पोलीस, स्वयंसेवी सेभाभावी अशासकीय संस्था यांच्यात समन्वय साधण्याचे काम हा अधिकारी करील.

(२) बालकांच्या संबंधातील पोलीसांची सर्व कर्तव्ये यात समन्वय ठेवण्यासाठी राज्य शासन एक प्रत्येक जिल्हा व शहरासाठी एक बाल सहाय्य पोलीस केंद्र स्थापित करील व त्याचे प्रभारी अधिकारी पोलीस उप अधिक्षक दर्जापेक्षा कमी नसलेले अधिकारी असतील. या केंद्रातील सर्व पोलीस अधिकारी उपकलम १ अन्वये नामनिर्देशित असतील आणि दोन बाल कल्याणाच्या क्षेत्रात कामाचा अनुभव असलेले समाजसेवक व त्यातील किमान एक महिला असेल.

(३) पोलीस बाल न्याय केंद्रातील सर्व पोलीसांना त्यांचे कर्तव्य योग्य रीतीने बजावण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

(४) विशेष बाल पोलीस केंद्रात बालकांची प्रकरणे हाताळणारे लोहमार्ग पोलीसही असतील.

**१०८. या अधिनियमातील तरतुदीबाबत जनजागृती अभियान :–** केंद्र शासन व सर्व राज्य शासने खालीलबाबत आवश्यक ती पावले उचलतील –.

(अ) या अधिनियमातील तरतुदींबाबत दूरदर्शन, वृत्तपत्रे, आकाशवाणी सर्व प्रसारमाध्यमातून मोठ्या प्रमाणावर जनजागृती अभियान चालवून सर्वसाधारण जनता, बालके, त्यांचे माता पिता आणि पालक यांना सदर तरतुदींबाबत जास्तीत जास्त माहिती देणे.

(ब) केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे सर्व अधिकारी आणि सर्व संबंधितांना या अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत कालबद्ध प्रशिक्षण देणे.

**१०९. अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीवर देखरेख :–** (१) कलम ३ अन्वये निर्माण करण्यात आलेल्या राष्ट्रीय बाल हक्क आयोग किंवा बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ च्या कलम १७ मधील तरतुदींअन्वये निर्माण करण्यात आलेले राज्य पातळीवरील बाल हक्क संरक्षण आयोग (यापुढे त्यांना परिस्थितीनुरुप राष्ट्रीय आयोग आणि राज्य आयोग असे संबोधले जाईल) त्यांना बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार नेमून दिलेल्य कर्तव्यांसह या अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवतील.

(२) राष्ट्रीय आयोग किंवा राज्य आयोग या अधिनियमातील कोणत्याही अपराधाबाबत चौकशी करतानाच बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ अन्वये त्यांना प्रदान करणत आलेले सर्व हक्कही अबाधित आहेत.

(३) राष्ट्रीय आयोग किंवा राज्य आयोग त्यांच्या वार्षिक अहवालात या कलमासोबतच बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ च्या कलम १६ अन्वये केलेल्या कारवाईचाही अंतर्भाव करतील.

**११०. नियम तयार करण्याचे हक्क :–** (१) राज्य शासन अधिकृत राजपत्रात अधिसूचना प्रकाशित करुन या अधिनियमातील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आवश्यक ते नियम करतील :

परंतु, केंद्र शासन या संदर्भात तसेच राज्य शासनांनीही ज्या संदर्भात नियम करणे आवश्यक आहे त्याबाबत आदर्श नियमावली करेल आणि केंद्र शासनानी तयार केलेल्या सर्व नियमातील तरतुदींबाबत आवश्यक ते बदल करुन राज्य शासनांवर बंधनकारक असतील.

(२) विशेषत: आणि सर्वसाधारण हक्कांना बाधा न आणता, हे नियम खालील सर्व किंवा काही बाबतीत लागू असतील.

(१) हरवलेल्या किंवा घरातून पळालेल्या ज्या बालकाचे माता पिता सापडत नाहीत, त्याचे संदर्भात कलम २ च्या खंड (१४) मधील उपखंड (सात) अन्वये केलेली चौकशी.

(२) बाल गृहात नेमण्यात आलेल्या बाल कल्याण अधिकाऱ्याच्या, कलम २, उपकलम (१८) अन्वये सोपविलेल्या जबाबदाऱ्या.

(३) मंडळाच्या सभासदांची कलम ४ च्या पोट–कलम (२) अन्वये पात्रता.

(४) कलम ४ च्या पोट–कलम (५) अन्वये प्रारंभिक प्रशिक्षण आणि संवेदनशीलता.

(५) कलम ४ च्या पोट–कलम (६) अन्वये मंडळाच्या सभासदांचा कार्यकाल आणि राजीनामा देण्याची क्रियारीती.

(६) कलम ७ च्या पोट–कलम (१) अन्वये मंडळाच्या सभांचा कालावधी आणि सभांच्या दरम्यान करावयाच्या कामांची पद्धत.

(७) कलम ८ च्या पोट–कलम (३) अन्वये दुभाषा किंवा भाषांतरकारांची पात्रता, अनुभव आणि त्यांना देय मेहनताना.

(८) कलम ८ च्या पोट–कलम (३) मधील खंड (एन) प्रमाणे मंडळाची इतर काही कर्तव्ये.

(९) कायद्याच्या विरोधात गेल्याचा संशय असलेल्या बालकास ज्या व्यक्ती मार्फत कोणत्या पद्धतीने हजर करुन घेता येईल व कोणत्या पद्धतीने बालकास निरीक्षण गृहात किंवा सुरक्षित ठिकाणी पाठवता येईल याची कार्यपद्धती कलम १० च्या पोट–कलम (२) अन्वये.

(१०) पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलेल्या व जामिनावर मुक्त न केलेल्या व्यक्तीला मंडळासमोर हजर करण्यापर्यंत निरीक्षणगृहात ठेवण्याबाबत कलम १२ च्या पोट–कलम (२) अन्वये.

(११) मंडळापुढे असलेल्या प्रलंबित प्रकरणांबाबत मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांना किंवा मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांना आणि जिल्हा न्यायाधिशांना सादर करावयाच्या अहवालाचा मसुदा कलम १६ च्या पोट–कलम (३) अन्वये.

(१२) नियंत्रणाची पद्धत आणि नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांची यादी कलम २० च्या पोट–कलम (२) अन्वये.

(१३) बालकासंबंधीचा अभिलेख मंडळाने, पोलिसांनी आणि न्यायालयाने नष्ट करण्याची कार्यपद्धती कलम २४ च्या पोट–कलम (२) अन्वये.

(१४) बाल कल्याण समितीवरील सभासदांची पात्रता, कलम २७ च्या पोट–कलम (५) अन्वये.

(१५) बाल कल्याण समितीच्या सभांमध्ये कामकाजाची कार्यपद्धती व नियम कलम २८ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(१६) हरवलेल्या किंवा सोडून दिलेल्या बालकांना पुन्हा त्यांच्या कुटूंबाशी मिळवण्याची कार्यपद्धती, कलम ३० च्या पोट–कलम एक्स.

(१७) समितीला अहवाल सादर करण्याची आणि बालकाला बाल गृहात किंवा योग्य जागी किंवा योग्य व्यक्तीकडे पाठविण्याची आणि सोपविण्याची कार्यपद्धती, कलम ३१ च्या पोट–कलम (२) अन्वये.

(१८) बालकल्याण समितीची चौकशी करण्याची कार्यपद्धती, कलम ३६ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(१९) जर बालक सहा वर्षपेक्षा कमी वयाचे असल्यास, त्याच्या पुनर्वसनाची योग्य सोय होईपर्यंत, बालकास विशेष दत्तकविधान संस्थेकडे, बालगृहात, सुयोग्य संस्थेत किंवा सुयोग्य व्यक्तीकडे सोपविण्याची आणि बालगृहात किंवा सुयोग्य संस्थेत किंवा सुयोग्य व्यक्तीकडे किंवा उसन्या संगोपनात ठेवलेल्या बालकाच्या परिस्थितीवर देखदेख ठेवण्याची कार्यपद्धती, कलम ३६ चे पोट–कलम (३) अन्वये.

(२०) प्रलंबीत प्रकरणांच्या पुनर्विलोकनाबाबत समितीकडून जिल्हा न्यायाधिशांना पाठवावयाच्या तिमाही अहवालाची कार्यपद्धती, कलम ३६ च्या पोट–कलम (४) अन्वये.

(२१) समितीच्या इतर कोणत्याही कामकाजाबाबत इतर कोणतेही आदेश, कलम ३७ च्या पोट–कलम (२) अन्वये.

(२२) समितीकडून राज्य शासनाच्या संस्थेस आणि अधिकाऱ्यांना मासिक तत्त्वावर, दत्तकविधानासाठी मुक्त म्हणून जाहीर झालेल्या मुलांची संख्या आणि प्रलंबित प्रकरणांची संख्या याबाबत, कलम ३८ च्या पोट–कलम (५) अन्वये माहिती देणे.

(२३) या अधिनियमाखालील सर्व संस्थांची नोंदणी कशा पद्धतीने झाली पाहिजे याबाबत, कलम ४१ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(२४) कलम ४१ च्या पोट–कलम (७) अन्वये, बालकांना पूनर्वसन आणि सामाजिक सम्मेलीकरण सेवा न देणाऱ्या संस्थांनी नोंदणी रद्द करणे किंवा निलंबित ठेवण्याची कार्यपद्धती.

(२५) मुक्त आश्रयस्थानाकडून दरमहा जिल्हा बाल संरक्षण केंद्रास आणि समितीस माहिती पुरविण्याबाबत नियम कलम ४३ च्या पोट–कलम (३) अन्वये.

(२६) बालकाल उसन्या संगोपनात आणि सामुहित उसन्या संगोपनात ठेवण्याची कार्यपद्धती, कलम ४४ च्या पोट–कलम (१) अन्वये.)

(२७) उसन्या संगोपनात ठेवलेल्या बालकांची तपासणी कलम ४४ च्या पोट–कलम (४४) अन्वये.

(२८) उसने संगोपन देणाऱ्या कुटुंबाने बालकाला शिक्षण, आरोग्यसेवा आणि आहार पुरविण्याची पद्धत कलम ४४ च्या पोट–कलम (६) अन्वये.

(२९) बालकांना उसने संगोपन पुरविण्याची पद्धत आणि निकष कलम ४४ च्या पोट–कलम (७).

(३०) बालकाच्या कल्याणाची खात्री करण्यासाठी उसन्य कुटूंबाची तपासणी करण्याचा मसुदा, कलम ४४ च्या पोट–कलम (८) अन्वये.

(३१) बालकांसाठी प्रायोजकत्वाच्या विविध कल्पना उदा., व्यक्तिगत प्रायोजकत्व, सामुहिक प्रायोजकत्व किंवा परिसर प्रायोजकत्व राबविण्याचे उद्देश कलम ४५ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(३२) प्रायोजकत्वाची कालमर्यादा, कलम ४५ च्या पोट–कलम (३) अन्वये.

(३३) वयाची १८ वर्षे पूर्ण केल्याने संस्थेचा आधार सोडून जाणाऱ्या बालकास कलम ४६ अन्वये आर्थिक आधार पुरविण्याची पद्धत.

(३४) विविध निरीक्षण गृहे व त्यांच्याकडून कायद्याविरुद्ध गेल्याचा आरोप असलेल्या बालकाच्या पुनर्वसनासाठी आणि सामाजिक सम्मिलीकरणासाठी पुरविण्यात येणाऱ्या सेवा यांचे व्यवस्थापन आणि नियंत्रण आणि निरीक्षण गृहांच्या नोंदणीस मंजुरी देण्याची किंवा काढून घेण्याची पद्धत, कलम ४७ च्या पोट–कलम (३) अन्वये.

(३५) विशेष गृहांचे व्यवस्थापन आणि नियंत्रण आणि त्यांच्याकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा, कलम ४८ च्या पोट–कलम (२) आणि (३) अन्वये.

(३६) बालगृहे व त्यांच्याकडून बालकांच्या व्यक्तिगत संगोपन योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचे स्वरुप आणि दर्जा यांचे कलम ५० च्या पोट–कलम (३) अन्वये व्यवस्थापन आणि नियंत्रण.

(३७) त्यावेळी प्रभावात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या आणि संस्थेच्या योग्यतेबाबत आवश्यक चौकशीअंती, बालकाची तात्पुरती जबाबदारी स्वीकारणाऱ्या शासकीय संस्थेकडून किंवा खाजगी स्वयंसेवी अशासकीय संस्थेस मंडळ किंवा समितीकडून कलम ५१ च्या पोट–कलम (१) अन्वये मान्यता देण्याची पद्धत.

(३८) तात्पुरत्या स्वरुपात संगोपन, संरक्षण आणि उपचार यासाठी बालकाचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तीच्या पात्रतेची पडताळणी आणि मान्यता देण्याची पद्धत, कलम ५२ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(३९) या अधिनियमान्वये कलम ५३ च्या पोट–कलम (१) अन्वये, बालकास संस्थेमार्फत पुनर्वसन आणि सामाजिक सम्मिलीकरणाची सेवा व अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय उपचार यासारख्या मूलभूत गरजा पुरविण्याची पद्धत आणि सदर संस्थेचे पात्रता निकष.

(४०) प्रत्येक संस्थेकडून, बालकाच्या प्रगतीवर देखरेख ठेवण्यासाठी व्यवस्थापन समितीची नेमणूक करण्याची पद्धत, कलम ५३ च्या पोट–कलम (२) अन्वये.

(४१) कलम ५३ च्या पोट–कलम (३) अन्वये बालक समिती प्रारंभ करु शकेल अशा सेवा.

(४२) कलम ५४ च्या पोट–कलम (१) अन्वये राज्यासाठी किंवा जिल्ह्यासाठी सर्व नोंदणी झालेल्या किंवा सुयोग्य संस्था म्हणून मान्यता दिलेल्या संस्थांवर देखरेख करण्यासाठी देखरेख समिती नेमणे.

(४३) केंद्र शासन किंवा राज्य शासनाकडून स्वतंत्रपणे, व्यक्ती किंवा मंडळे, समित्या, या संस्थांमार्फत, विशेष बाल पोलीस केंद्रे, नोंदणीकृत संस्था किंवा सुयोग्य संस्था किंवा व्यक्ती म्हणून मान्यता मिळालेल्या संस्था किंवा व्यक्ती यांचे मूल्यमापनाची पद्धत आणि त्यांचा कालावधी ठरविणे, कलम ५५ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(४४) कायदेशिरपणे दत्तकविधानासाठी योग्य ठरविण्यात आलेल्या बालकांचा तपशील विशेष दत्तकविधान संस्थेत पुरविण्याची पद्धत, कलम ६६ च्या पोट–कलम (२) अन्वये.

(४५) कलम ६८ च्या खंड (इ) अन्वये प्राधिकरणाची इतर कोणतीही कर्तव्ये.

(४६) प्राधिकरणाच्या सुकाणू समितीच्या सदस्यांची निवड किंवा नामांकन करण्याचे निकष, त्यांचा कार्यकाल किंवा नेमणुकीच्या अटी व शर्ती, कलम ६९ च्या पोट–कलम (२) अन्वये.

(४७) प्राधिकरणाच्या सुकाणू समितीच्या सभांची पद्धत, कलम ६९ च्या पोट–कलम (४) अन्वये.

(४८) प्राधिकरणाकडून केंद्रशासनास वार्षिक अहवाल सादर करण्याची पद्धत, कलम ७१ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(४९) कलम ७२ च्या पोट–कलम (२) अन्वये प्राधिकरणाची कर्तव्ये.

(५०) प्राधिकरणामार्फत योग्य जमाखर्च आणि संबंधित अभिलेख ठेवण्याची आणि जमाखर्चाचा वार्षिक अहवाल तयार करण्याची पद्धत, कलम ७३ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(५१) आजाराने ग्रस्त असल्याचे निष्पन्न झालेल्या व प्रदीर्घ शारीरिक किंवा मानसिक वैद्यकीय उपचाराची आवश्यकता असलेल्या बालकाच्या उपचारासाठी सुयोग्य संस्थेस, समिती किंवा मंडळाकडून कालावधी ठरवून देणे, कलम ९२ अन्वये.

(५२) कलम ९५ च्या पोट–कलम (१) अन्वये बालकाच्या स्थानांतराची पद्धत.

(५३) बालकास प्रवासात संरक्षण पुरविणाऱ्या पथकाम प्रवासभत्त्याची तजवीज कलम ९५ च्या पोट–कलम (३) अन्वये.

(५४) कोणतीही चौकशी, अपील किंवा पुनर्विलोकन करण्याची समिती किंवा मंडळाकडून अवलंबली जाणारी कार्यपद्धती, कलम १०३ च्या पोट–कलम (१) अन्वये.

(५५) बाल न्याय निधीचा वापर करण्याची पद्धत, कलम १०५ च्या पोट–कलम (३) अन्वये.

(५६) राज्याची बाल संरक्षण संस्था किंवा प्रत्येक जिल्ह्याचे बाल संरक्षण केंद्र यांची कार्यपद्धती, कलम १०६ अन्वये.

(५७) कलम १०९ च्या पोट–कलम (१) अन्वये राष्ट्रीय आयोग किंवा परिस्थितीनुरुप राज्य आयोग यांच्यामार्फत, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करण्याचे अधिकार.

(५८) ठरवून देणे आवश्यक असलेली इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेला प्रत्येक नियम आणि अट, तयार करण्यात आल्यावर लवकरात लवकर अधिवेशन सुरु असतांना संसदेच्या प्रत्येक सदनाच्या पटलावर तीस दिवसांसाठी एका अधिवेशनात किंवा दोन किंवा अधिक सलग

अधिवेशनात सादर केले जाईल आणि जर दोन्ही सदनातून त्या नियम किंवा अटीमधील फेरबदलाला मंजुरी मिळाल्यास किंवा सदर फेरबदल न करण्याबाबत ठराव संमत झाल्यास, सदर नियम किंवा अट यातील फेरबदल, ठरावात मंजूर झालेल्या स्वरुपात कार्यान्वित होईल. मात्र असा कोणताही फेरबदल किंवा कपात ही यापूर्वी सदर नियम किंवा अटीनुसार केलेल्या कारवाईवर परिणाम करणार नाही.

(४) राज्यशासनाकडून या अधिनियमान्वये करण्यात येणारा कोणताही नियम राज्याच्या विधिमंडळासमोर सादर करण्यात येईल.

**१११. रद्दबातल आणि संरक्षण :–** (१) बाल न्याय (बालकाची देखभाल व संरक्षण) अधिनियम २००० हा अधिनियम रद्दबातल करण्यात आलेला आहे.

(२) सदर अधिनियम रद्द झाला असला तरी सदर अधिनियमान्वये करण्यात आलेली कारवाई या अधिनियमाच्या संबंधित तरतुदीनुसार करण्यात आलेली आहे असे समजले जाईल.

**११२. अडचणी दूर करण्याचे अधिकार :–** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या अंमलबजावणीस कोणतीही अडचण आल्यास, केंद्र शासन या अधिनियमातील तरतुदीस बाधा येणार नाही अशा पद्धतीने सदर अडचण दूर करण्याचे आदेश देईल:

परंतु, हा अधिनियम अंमलात आल्यापासून दोन वर्षाच्या कालावधीनंतर असा कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(२) परंतु, या तरतुदी अन्वये देण्यात आलेला कोणताही आदेश, आदेश दिल्यावर लवकरात लवकर संसदेच्या दोन्ही सदनांसमोर सादर केला जाईल.

***